नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २१७ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




# समर्थ गांवकरी

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. १८ जुलै २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# 'लातूर पॅटर्न'चा झंझावात!

## NEET पेपरफुटीच्या चिखलातही उमलले यशाचे 'कमळ'

■ १२०० हून अधिक विद्यार्थी डॉक्टर होणार

मुंबई : (स. गांवकरी)

गेल्या काही महिन्यांपासून देशभरात गाजलेल्या 'नीट' परीक्षा घोटाळ्याच्या आणि पेपरफुटीच्या वादळात लातूरच्या शैक्षणिक प्रतिमेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न झाला. मात्र, लातूरच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या अफाट कष्टाच्या जोरावर या सर्व आरोपांना आणि बदनामीच्या डागांना चोख उत्तर दिले आहे. "लातूरची शिक्षण पंढरी ही फक्त ट्युशन बाजार नाही, तर तो प्रामाणिक मेहनतीचा 'पॅटर्न' आहे," हे यंदाच्या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

यंदाच्या 'नीट' परीक्षेत लातूर जिल्ह्यातील तब्बल 1200 ते 1500 हून अधिक विद्यार्थी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये (MBBS) प्रवेश मिळवतील, असा अंदाज शिक्षणतज्ज्ञांनी वर्तवला आहे. शाहू कॉलेजची कामगिरीः लातूर पॅटर्नचा मुख्य कणा असलेल्या राजर्षी शाहू महाविद्यालयाने यंदाही आपला दबदबा कायम राखला आहे.

महाविद्यालयाचा एकूण सहभाग: सुमारे 1400 विद्यार्थ्यांनी यंदा परीक्षा दिली



होती. निकालाचे प्राथमिक विश्लेषण: सध्या केवळ 600 विद्यार्थ्यांच्या निकालाचा डेटा समोर आला आहे, त्यापैकी 46 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी 600 हून अधिक गुणांचा टप्पा ओलांडला आहे. अजून 800 विद्यार्थ्यांच्या निकालाचे विश्लेषण बाकी असून, 600 पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्यांचा आकडा खूप मोठा असणार आहे. 530+ गुणांची कमाई: तब्बल 200 हून अधिक विद्यार्थ्यांनी 530 पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. या कामगिरीमुळे एकट्या शाहू महाविद्यालयातून 450 हून अधिक विद्यार्थी सरकारी वैद्यकीय जागांवर हक्क सांगण्यासाठी सज्ज झाले आहेत.

केवळ एकच संस्था नाही, तर लातूरमधील संपूर्ण शैक्षणिक फळीने एकत्र येऊन यशाचा झेंडा रोखला आहे. यामध्ये खालील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे:

संत तुकाराम महाविद्यालयथोडक्यात सांगायचे तर...खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जोडल्यास हा आकडा कितीतरी पटीने वाढणार आहे. पेपरफुटीच्या चिंतेत वावरणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांना या निकालाने मोठा दिलासा दिला असून, लातूरचा हा 'दणदणीत डंका' आता देशभरात घुमतो आहे.

नीट पेपरफुटीचे धागे लातूरपर्यंत पोहचले. शिवराज मोटेगावकरला अटक झाली. त्यामुळे लातूरचे नाव देशभरात बदनाम झाले. सूत्रांनुसार, मोटेगावकर आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि अभ्यासात सरासरीपेक्षा चांगले असलेल्या विद्यार्थ्यांना लक्ष्य करत असे. पालकांशी करार झाल्यानंतर त्यांना नियमित बॅचमध्ये समाविष्ट केले जात असे.

परीक्षेपूर्वी शेवटच्या 15 दिवसांत 'वन-ऑन-वन मेंटरिंग कोर्स' चालवला जात असे. पेपर मिळताच या विद्यार्थ्यांना प्रश्न-उत्तरे पाठ करून घेतली जात होती. सीबीआयला यासंबंधीचे अनेक व्हिडिओही मिळाले आहेत. सीबीआयनुसार, मोटेगावकर अनेक वर्षांपासून पुण्यातील ब्युटिशियन मनीषा वाघमारे यांच्यामार्फत प्रा. पी.व्ही. कुलकर्णी आणि मनीषा मांढरे यांच्या संपर्कात होता.

नेटवर्कमध्ये सामील असलेल्या गुरुग्रामच्या यश यादवने जयपूरच्या विकास बिवालला NEET चा पेपर विकला होता. त्याला हा पेपर नाशिकच्या शुभम खैरनारकडून मिळाला होता.लातूरचा कोचिंग संचालक आधी पार्ट-टाइम शिक्षक, आज ₹1500 कोटींची संपत्ती

NEET पेपरफुटी प्रकरणात नवीन मोठे खुलासे झाले आहेत. CBI ला सुगावा लागला आहे की, गेल्या वर्षीही NEET चा पेपर परीक्षेपूर्वी महाराष्ट्रातील लातूर येथील रेणुकाई करिअर सेंटर (RCC) पर्यंत पोहोचला होता.

## जर राम एकच लग्न करणार तर रहीम दोन-चार लग्न करणार का?

### दुसरं लग्न करणाऱ्याला राज्यात राहू दिलं जाणार नाही; भाजपच्या मुख्यमंत्र्यांचं खळबळजनक वक्तव्य

मुंबई : (स. गांवकरी)

मध्य प्रदेशमध्ये समान नागरी कायद्याबाबत मुख्यमंत्री मोहन यादव यांनी शुक्रवारी एक अत्यंत मोठं आणि खळबळजनक विधान केले आहे. "देशात सर्वांसाठी एकच कायदा असायला हवा. जर राम एकच लग्न करणार, तर रहीम दोन, तीन किंवा चार लग्ने का करणार? जो एक लग्न करेल, त्यालाच राज्यात राहण्याचा अधिकार मिळेल," अशा कडक शब्दांत मुख्यमंत्री मोहन यादव यांनी आपली भूमिका मांडली. कटनी येथील एका जाहीर कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव म्हणाले की, जेव्हा 'एक देश, एक विधान आणि एक निशाण' हे तत्व आपण मानतो, मग हिंदूंचा कायदा वेगळा आणि मुस्लिमांचा कायदा वेगळा का असावा? सर्वांसाठी एकच कायदा लागू झाला पाहिजे. या कायद्याला मंजुरी देण्यासाठी आगामी पावले उचलली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या भाषणात मुख्यमंत्र्यांनी या कायद्याच्या मंजुरीसाठीच्या विशेष नियोजनाची माहिती दिली. भोपाळजवळ असलेल्या 'जगदीशपूर' या ऐतिहासिक ठिकाणी राज्य मंत्रिमंडळाची पुढील बैठक होणार आहे. या जागेचे नाव परकीय आक्रमकांनी




बदलून 'इस्लामनगर' केले होते, जे भाजप सरकारने पुन्हा बदलून 'जगदीशपूर' केले आहे. याच ऐतिहासिक ठिकाणी समान नागरी कायद्याच्या मसुद्याला मंजुरी दिली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. सांदीपनी विद्यालयाच्या लोकार्पण सोहळ्यात बोलताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, भगवान श्रीरामाच्या आशीर्वादाने मध्य प्रदेश आता 'एक देश, एक विधान, एक निशाण आणि एक कायदा' लागू करण्याच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. विधानसभेच्या आगामी मान्सून सत्रात सर्व धर्मीयांसाठी समान नागरी संहिता (UCC) विधेयक सादर केले जाणार आहे. या सत्रापूर्वीच जगदीशपूर येथील मंत्रिमंडळ बैठकीत या मसुद्याला अंतिम मंजुरी दिली जाईल. समान नागरी कायद्यासोबतच मुख्यमंत्र्यांनी राज्यातील महिलांसाठी एक महत्त्वाची घोषणा केली.

## थोडक्यात...

### पार्थ पवारांना मंत्रिपद दिल्यास ताकद वाढेल

मुंबई (स. गांवकरी) : अर्थमंत्री पद हे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे असून ते दादांकडेच होते आणि आता ते पुन्हा आमच्याच पक्षाला मिळेल, यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे रीतसर मागणी ही करण्यात आली असल्याचे मत मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले. केंद्रातील मंत्रिमंडळ विस्तारात पार्थ अजित पवार यांना मंत्रिपद देण्याची मागणी पक्षाच्या उपाध्यक्षाकडून केली असल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे, यात गैर काय आहे. ते तरुण आहेत होतकरु आहेत. घरात राजकारणाचा वारसा आहे, त्यामुळे त्यांना केंद्रात मंत्रिपद मिळाल्यास पक्षाची ताकद वाढेल असे सूचक वक्तव्य सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे. ज्या जिल्हा बँकेच्या मुदत संपलेल्या आहेत त्या सर्व ठिकाणी निवडणुका होणार असून सोलापूर जिल्ह्यातही जिल्हा बँकेची निवडणूक होईल असे सांगत जिल्हा बँका मजबूत करण्याची तयारी आमची सुरू झाल्याचे बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. केंद्रात अमित भाई शहा यांच्याकडे सहकार खाते असून सहकार मजबुतीकरण झालेले दिसेल असेही त्यांनी सांगितले.

### पुण्यात भगवान जगन्नाथ रथयात्रा

पुणे (स. गांवकरी) : शहरात इस्कॉन मंदिराच्या वतीने रविवारी (ता. १९) भगवान जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या रथयात्रेदरम्यान शहरातील मध्यभागात रविवारी दुपारी एक ते रात्री साडेसात वाजेपर्यंत वाहतूक मार्गावर बदल करण्यात येणार आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी दिली. ही रथयात्रा स. प. महाविद्यालय येथून सुरू होईल. त्यानंतर ती लोकमान्य टिळक रस्त्याने पूरम चौक, डावीकडे वळून बाजीराव रस्त्याने शनिपार चौक, नगरकर तालीम चौक, शगुन चौक, रमणबाग चौक, ओंकारेश्वर मंदिर, बालगंधर्व, जंगली महाराज रस्त्याने खंडोजी बाबा चौक, अलका टॉकीज चौक आणि पुन्हा टिळक रस्त्याने स. प. महाविद्यालय येथे समाप्त होईल.

### दहा बेकरी, रेस्टॉरंटचे परवाने निलंबित

पुणे (स. गांवकरी) : शहरातील प्रसिद्ध गोल्डन बेकरीसह इतर बेकरी, डेअरी व हॉटेलमध्ये अस्वच्छता आढळल्याने अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पुण्यासह विभागातील हॉटेल, रेस्टॉरंट, बेकरी आणि डेअरी मिळून १० आस्थापनांचे परवाने तातडीने निलंबित केले आहेत. गुरुवारी (ता. १६) आणि शुक्रवारी (ता. १७) करण्यात आलेल्या तपासणीत मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आणि अन्न सुरक्षा मानके कायद्याचे उल्लंघन आढळल्याने ही कारवाई करण्यात आली. याबाबतच्या अस्वच्छतेची छायाचित्रेही एफडीएने प्रसिद्ध केली आहेत. त्यामध्ये हे अन्नपदार्थ किती अस्वच्छ व गलिच्छ जागेत तयार केले जातात हे यावरून दिसून येते. यामध्ये पुण्यातील मंगळवार पेठेतील मे. स्टार केटरिंग सर्व्हिस, सोमवार पेठेतील मे. अशोक बार अँड रेस्टॉरंट, येवलेवाडीतील मे. गोल्डन मॅजेस्टिक बेकरी, कोंढव्यातील मे. गोल्डन बेकरी आणि बाणेर येथील मे. बिकांगे बिर्याणी एलएलपी या आस्थापनांचा समावेश आहे. तर, जिल्ह्यातील पारगाव पेठ (ता. आंबेगाव) येथील मे. सिद्धार्थ अॅग्रो (डेअरी), सांगलीतील मे. हलद भवन कॅन्टीन, साताऱ्यातील महाबळेश्वर येथील मे. सह्याद्री रेस्टॉरंट अँड ढाबा आणि मे. सिगडी रेस्टॉरंट, तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील गडमुडशिंगी (ता. करवीर) येथील मे. व्हीबीजीओआर शाळा कॅन्टीनवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

## महान अष्टपैलू सर गॅरी सोबर्स यांचं निधन, ८९व्या वर्षी अंतिम श्वास!

मुंबई : (स. गांवकरी)

क्रिकेट जगतातून एक अत्यंत दुःखाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. क्रिकेट इतिहासातील महानतम ऑलराउंडर आणि वेस्टइंडीजचे दिग्गज खेळाडू सर गारफील्ड सोबर्स यांचे वयाच्या 89 व्या वर्षी निधन झाले आहे. येत्या 28 जुलै रोजी त्यांचा 90 वा वाढदिवस होता, परंतु त्यापूर्वीच त्यांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या निधनानंतर क्रिकेट वेस्टइंडीजने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत सोबर्स यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. सर गारफील्ड सोबर्स यांना जगभरात 'सर गॅरी सोबर्स' या नावानेही ओळखले जात असे. सर गॅरी सोबर्स यांना क्रिकेट इतिहासातील सर्वात 'संपूर्ण खेळाडू' मानले जाते. त्यांनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या



तिन्ही आघाड्यांवर असा स्तर प्रस्थापित केला, ज्याचा आदर्श आजही दिला जातो. सोबर्स यांनी अशा काळात क्रिकेट खेळले जेव्हा वेस्टइंडीजची टीम जागतिक क्रिकेटमध्ये सर्वात मजबूत आणि आक्रमक मानली जात होती. त्यांच्या अष्टपैलू कामगिरीमुळे त्यांचे नाव खेळाच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी कोरले गेले आहे. सर गारफील्ड सोबर्स यांनी सोबर्स यांनी 1954 ते 1974 या वीस वर्षांच्या प्रदीर्घ काळात विंडीजचं कसोटी क्रिकेटमध्ये प्रतिनिधित्व केलं. वेस्टइंडीजसाठी 93 कसोटी (Test) सामने खेळले. या दरम्यान त्यांनी 160 डावांमध्ये 57.78 च्या उत्कृष्ट सरासरीने 8,032 धावा केल्या. त्यांच्या काळाचा विचार करता ही सरासरी अत्यंत असाधारण मानली जाते.

## १० वर्षात १५२ पेपर फुटले, एका व्यक्तीला शिक्षा नाही

### साडे सात कोटी विद्यार्थ्यांचं नुकसान, राहुल गांधींचा हल्लाबोल

डेहराडून : (स. गांवकरी)

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशातील शिक्षण व्यवस्थेच्या स्थितीवर जोरदार हल्लाबोल केला. गांधी यांनी आकडेवारी जाहीर करत केंद्र सरकार आणि शिक्षण मंत्रालयावर हल्लाबोल केला. गेल्या दहा वर्षात 152 पेपर लीक झाले याचा थेट आणि विपरीत परिणाम साडे सात कोटी विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर झाल्याचं राहुल गांधी यांनी म्हटलं. लज्जास्पद बाब म्हणजे या प्रकरणांमध्ये एकाही व्यक्तीला शिक्षा झाली नाही. या आकडेवारीतून स्पष्ट होतं की देशातील परीक्षा यंत्रणा खिळखिळी झालीय, असं राहुल गांधींनी म्हटलं.

राहुल गांधी यांनी पेपर फुटीला महारोग असं म्हटलं. टीव्ही आणि वृत्तपत्रात येणारी पेपर फुटीची प्रकरणं हिमनगाचं टोक आहे. हा धंदा खूप खोलवर रुजलेला असून काळा असल्याची टीका राहुल गांधी यांनी केला. देशातील विविध राज्यांच्या भरती



परीक्षा आणि देशातील नीट सारख्या मोठ्या परीक्षांची खुलेआम विक्री होत आहे, त्याचे रेटकार्ड निश्चित करण्यात आले आहेत. टेलीग्राम आणि सिग्नल सारख्या ॲप चा वापर करुन हा काळा धंदा सुरु आहे. या इकोसिस्टीमध्ये कोचिंग सेंटर, पेपर सेट करणारे लोक आणि काही मोठे अधिकारी यात सहभागी असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला.

सरकारच्या संवेदनहीनतेवर देखील राहुल गांधी यांनी टीका केली. राहुल गांधी म्हणाले मॅन्युफॅक्चरिंग, आयटी ,उद्योजकता आणि खासगी क्षेत्रातील नोकऱ्या कमी होत आहेत. या स्थितीत युवकांकडे चांगलं आयुष्य जगण्यासाठी सरकारी नोकरी ही शेवटची आशा राहते. मात्र, या मार्गावर काटे पसरले आहेत.

राहुल गांधी यासंदर्भात उदाहरण देताना म्हणाले की एक कुटुंब त्यांच्या मुलाच्या पाच वर्षांच्या तयारीसाठी जवळपास 9 लाख रुपयांचा खर्च करते. देशातील जवळपास 9 कोटी तरुण सरकारी नोकरीच्या रांगेत आहेत मात्र नोकऱ्या 6 लाख आहेत. म्हणजेच 150 उमेदवारांपैकी एकाच उमेदवाराला नोकरी मिळेल, तिथं देखील पेपरफुटीचा डाग लागतो, असं राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी यांनी त्यांच्या भाषणात रिया कुमारी या 23 वर्षीय विद्यार्थिनीच्या नावाचा उल्लेख केला. जिनं नीट पेपरफुटीच्या बातमीनं डिप्रेशनमध्ये जात जीवन संपवलं. रियाचे वडील रमेश बाल राहुल गांधींसोबत मंचावर उपस्थित होते. राहुल गांधी म्हणाले की हा फक्त सरकारी बेजबाबदारपणा नसून एका कुटुंबाच्या वर्षांच्या मेहनतीचा अपमान आहे.

राहुल गांधी यांनी डेहराडूनच्या सभेत देशातील सरकारला केंद्रित व्यवस्थेऐवजी विद्यार्थी केंद्री व्यवस्थेकडे जावं लागेल, असं म्हटलं. आधुनिक टेस्टिंग मॉडेल सॅट, जीमॅट सारख्या सुरक्षित पर्यायांचा वापर करणं आवश्यक असल्याचं म्हटलं. नव्या व्यवस्थेमुळं एकाच वर्गात बसलेल्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रश्नांचे सेट मिळतील. नफा मिळवणाऱ्या खासगी कंपन्यांना आऊटसोर्स करुन सरकार जबाबदारी झटकू शकत नाही. विद्यापीठांचे कुलगुरू आणि परीक्षा यंत्रणांचे प्रमुख राजकीय पक्षांशी संबंधित नसावेत, असंही राहुल गांधी म्हणाले.

# एसटी प्रवास महागला

### एसटीच्या तिकीट दरात १३.५६ टक्क्यांची वाढ, महामंडळानं भाडेवाढीसाठी कोणती कारणं दिली?

मुंबई : (स. गांवकरी)

राज्य परिवहन प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) 13.56 टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ तसेच वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यांचा सर्वंकष विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. अर्थात, या भाडेवाढीच्या मुळे या पुर्वी केलेली साध्या बसेस ची 10 टक्के हंगामी भाडेवाढ रद्द होईल

एसटी महामंडळाच्या आर्थिक शाश्वततेसह प्रवाशांना सुरक्षित, दर्जेदार आणि अखंड सेवा देण्यासाठी ही भाडेवाढ अपरिहार्य होती. वाढत्या खर्चाचा भार सहन करत राज्यातील लाखो प्रवाशांना सेवा देणाऱ्या एसटीच्या दैनंदिन कार्यावर आर्थिक ताण निर्माण होत असल्याने, सेवा सुरळीत ठेवण्यासाठी भाडेवाढीचा निर्णय आवश्यक ठरला आहे.

ही भाडेवाढ एसटीची सेवा अधिक सक्षम आणि टिकाऊ बनविण्यासाठी करण्यात आली असून, प्रवाशांच्या सुरक्षित व विश्वासार्ह प्रवासासाठी आवश्यक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण सेवा कायम राखण्यास त्यामुळे मदत होणार आहे, एसटी महामंडळाकडून सांगण्यात आलं आहे. "राज्य परिवहन प्राधिकरणाने एसटी महामंडळाच्या 13.56 टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ तसेच वाहनांचे सुटे भाग आणि टायर यांच्या किमतीत झालेली वाढ यामुळे ही भाडेवाढ अपरिहार्य ठरली आहे. ही भाडेवाढ करताना प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडेल, याची काळजी घेण्यात आली आहे. राज्यातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित, दर्जेदार आणि अखंडित सेवा देण्यासाठी तसेच एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा आहे. प्रवाशांनी नेहमीप्रमाणे एसटीवर दाखविलेला विश्वास कायम ठेवावा, ही अपेक्षा आहे." असं परिवहन मंत्री प्रातप सरनाईक यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, एसटी महामंडळाकडून गर्दीच्या हंगामात 10 टक्के प्रवास भाडे वाढ करण्यात आली होती. ती प्रवासी भाडेवाढ 15 जुलैपर्यंत होती. मात्र, ती मुदत संपताच साध्या बसेसवरील 10 टक्के भाडेवाढ 31 जुलैपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तो निर्णय नव्यानं भाडेवाढ करण्यात आल्यानं रद्द करण्यात आला आहे. एसटी महामंडळानं प्रवासी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतल्यानं प्रवाशांना अधिक प्रवास खर्चासाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. महागाईचा सामना करणाऱ्या प्रवाशांना दरवाढीची झळ पोहोचणार आहे.



## ७३ वर्षीय महिलेला 'लिव्ह-इन'चं आमिष दाखवून ५७ लाखांना लुटलं

### भामट्यामुळे वृद्धेवर आली वृद्धाश्रमात जाण्याची वेळ!

मुंबई : (स. गांवकरी)

मॅट्रिमोनियल संकेतस्थळावर ओळख करून ज्येष्ठ महिलांशी मैत्री करायची आणि नंतर त्यांचा विश्वास संपादन करून लाखो रुपयांना गंडा घालायचा, असा धक्कादायक प्रकार डोंबिवलीत समोर आला आहे. येथील एका 73 वर्षीय वयोवृद्ध महिलेला लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचे आमिष दाखवून तब्बल 57 लाख रुपयांना लुटणाऱ्या एका सराईत भामट्याला डोंबिवलीतील विष्णूनगर पोलिसांनी अटक केली आहे. या मोठ्या आर्थिक फसवणुकीमुळे पीडित ज्येष्ठ महिलेवर चक्क वृद्धाश्रमात जाण्याची वेळ आली आहे. अनुज संतोष तिवारी उर्फ अनुज सिंग उर्फ अनुज त्रिवेदी (रा. लखनऊ, उत्तर प्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. विष्णूनगर पोलिसांनी मोठ्या शिताफीने या आरोपीला दिल्लीतून बेड्या ठोकल्या आहेत. तपासादरम्यान या भामट्याने केवळ डोंबिवलीतच नाही, तर देशभरातील अनेक महिलांना अशाच पद्धतीने लाखो रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. डोंबिवलीत राहणाऱ्या 73 वर्षीय महिलेची



आणि आरोपी अनुज तिवारीची ओळख एका मॅट्रिमोनियल साईटवर झाली होती. आरोपीने आपण एकटेच असून सोबत राहू, असे सांगत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर त्याने महिलेचा विश्वास संपादन केला आणि वेगवेगळ्या अडचणी सांगून, भावनिक साद घालत तिच्याकडून हळूहळू तब्बल 57 लाख रुपये उकळले. संपूर्ण जमापुंजी गमावल्यामुळे या ज्येष्ठ महिलेची मोठी आर्थिक हानी झाली असून, त्यांच्यावर आता वृद्धाश्रमात राहण्याची वेळ ओढावली आहे. महिलेच्या तक्रारीनंतर विष्णूनगर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा माग काढत त्याला दिल्लीतून ताब्यात घेतले. सध्या आरोपी अनुज तिवारी हा न्यायालयीन कोठडीत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## लेक्सस इंडिया ने ऑल-न्यू ईएस ३५०एच साठी बुकिंग्स सुरू केली




नवी दिल्ली (स. गांवकरी) : लेक्सस इंडिया ने ऑल-न्यू ES 350h या नव्याने सादर केलेल्या आठव्या पिढीतील एक्झिक्युटिव्ह सेडानच्या सेल्फ-चार्जिंग हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेरिएंटसाठी बुकिंग्स सुरू झाल्याची घोषणा केली आहे. ईएस ३५०एच मुळे ब्रँडचे इलेक्ट्रिफाइड पोर्टफोलिओ अधिक विस्तारले असून, नुकतेच लॉन्च झालेल्या ईएस ५००ई सोबत ग्राहकांना आकर्षक पर्याय उपलब्ध करून दिला आहे. तसेच, लेक्सस च्या कार्बन-न्यूट्रल भविष्याकडे जाणाऱ्या मल्टी-पाथवे दृष्टिकोनाला अधोरेखित केले आहे. ईएस च हे 1989 मध्ये फ्लॅगशिप LS सोबत पदार्पणापासून लेक्सस चे एक महत्त्वाचे जागतिक मॉडेल राहिले आहे. उत्कृष्ट शांतता, रायड कम्फर्ट आणि प्रशस्त इंटीरियरसाठी प्रसिद्ध असलेले ईएस आजपर्यंत जगभरातील 80 पेक्षा अधिक देश आणि प्रदेशांमध्ये विकले गेले आहे. भारतातही हे मॉडेल लेक्सस च्या लाईन-अपमधील एक महत्त्वाचा स्तंभ ठरले असून, ब्रँडची बाजारपेठेतली उपस्थिती मजबूत करण्यामध्ये याने निर्णायक भूमिका बजावली आहे. ऑल-न्यू ईएस ३५०एच भारतात तयार केले जाणार असून, ईएस ५००ई सोबत त्याचे अॅडव्हान्स्ड प्लॅटफॉर्म आणि डिझाईन फिलॉसॉफी शेअर करत लेक्सस च्या भारतीय बाजारपेठेतील दृढ बांधिलकीला अधोरेखित करते.

## अर्जुन कपूर नेटफ्लिक्सच्या लॉक अप सच या सजामध्ये जजमेंटडे साठी दाखल



नवी दिल्ली (स. गांवकरी) : नेटफ्लिक्सच्या ग्लोबली ट्रेंडिंग कॅप्टिव्ह रिॲलिटी शो लॉक अप: सच या सजा मधील कोर्टरूममध्ये आता एक दमदार आवाजाची एन्ट्री होणार आहे. जसजसे खेळाचे दांव वाढत आहेत, तसतसे अर्जुन कपूर चौथ्या जजमेंट डे साठी पब्लिक प्रॉसिक्यूटर [जनता की आवाज] म्हणून लॉक अप मध्ये दाखल होत आहेत आणि कैद्यांना त्यांच्या खेळावर बारकाईने तपासणार आहेत. कठीण प्रश्न विचारण्यासाठी ओळखले जाणारे अर्जुन कपूर कोर्टरूमची सूत्रे हाती घेतात आणि कैद्यांना त्यांच्या गेमप्लेवर, बदलत्या निष्ठांवर, तुटलेल्या वचनांवर आणि धक्कादायक खुलाशांवर सामोरे जातात. चौथ्या टर्मिनेशन एपिसोड मध्ये पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणून शोमध्ये प्रवेश करताना अर्जुन कपूर म्हणाले, “मला नेहमी अशा भूमिका आवडतात जिथे लोकांना वाचावं लागतं, त्यांना आव्हान द्यावं लागतं आणि सतत सजग ठेवावं लागतं. कैदी त्यांच्या सत्याच्या आवृत्तीसह तयार आले होते, पण माझं काम होतं प्रत्येक दाव्यावर प्रश्न विचारणं, खोलवर जाणं आणि काहीही निसटू न देणं. जेलमधली एनर्जी खूप तीव्र, अनपेक्षित आणि जबरदस्त मनोरंजक आहे. या जगाचा भाग होणं छान होतं आणि या आठवड्यात प्रेक्षकांना जे ट्विस्ट्स आणि कॉन्फ्रंटेशन्स दिसणार आहेत त्याची मला उत्सुकता आहे.” अर्जुन कपूर यांच्या चौकशीच्या रेषेत कोण येणार? लॉक अप: सच या सजा नेटफ्लिक्सवर दर शनिवार ते गुरुवार रात्री 8 वाजता स्ट्रीमिंग सुरू आहे.

## झोहो तर्फे झोहो क्लासेस २.० ची सुरुवात, शैक्षणिक एलएमएसची सुरुवात

नवी दिल्ली (स. गांवकरी) : चेन्नईत मुख्यालय असलेल्या झोहो या जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान कंपनी तर्फे आज त्यांच्या झोहो क्लासेस २.० या एआयवर आधारीत शैक्षणिक एलएमएस च्या सुरुवातीची घोषणा केली. ही भारतीय बनावटीची आणि जगभरांतील शैक्षणिक संस्थांसाठी योग्य अशा उत्पादनाची सुरुवात आहे. हा मंच भारतातील पहिला असा मंच असून याची सुरुवात जगभरांतील अन्य बाजारपेठांमध्ये पुढील काही महिन्यांमध्ये करण्यात येणार आहे, जेणेकरुन जगभरांतील स्थानिक लोकांच्या शैक्षणिक गरजा सुध्दा पूर्ण होऊ शकतील. भारतात झोहो तर्फे झोहो क्लासेस २.० हे उत्पादन कोणत्याही प्रॉडक्ट लायसन्स च्या खर्चा विना सर्व केंद्रिय आणि राज्य सरकारी शाळा, कॉलेजेस आणि विद्यापीठांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याच बरोबर १०० विद्यार्थ्यांपर्यंत प्रशिक्षण देणारे शिक्षण सुध्दा या मंचाचा उपयोग मोफत करु शकणार आहेत जेणेकरुन झोहोच्या शैक्षणिक तंत्रज्ञानाचे लोकशाही करण करण्याच्या वचनबध्दतेला चालना मिळणार आहे. झोहो क्लासेस २.० मध्ये शिक्षण, प्रशिक्षण, विद्यार्थ्यांचे यश आणि संस्थांचे प्रशासन एकत्रितपणे एआय वर आधारीत मंचावर आणण्यात आले आहे. या नवीन व्हर्जन मध्ये तीन महत्त्वपूर्ण क्षमता एकत्र आल्या असून यांत एआयवर आधारीत संपूर्ण शिक्षणाचा प्रवास, विद्यार्थ्यांशी जोडली जाणारी उपकरणे जी आजच्या डिजिटल स्थानिक विद्यार्थ्यांसाठी तर संस्थात्मक हुशारी साठी विद्यार्थी जीवनक्रम व्यवस्थापन सुविधा देण्यात आल्या आहेत.

## कुंडलवाडीत छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन

बिलोली (स. गांवकरी) : बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील शिवम मंगल कार्यालय येथे दि. २२ जुलै रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी समाधान शिबीर अभियान राबविण्यात येत आहे. या शिबीरास देगलुर व बिलोली तालुक्यातील सर्व विभागाचे विभाग प्रमुख हजर राहणार असुन सदर शिबीराच्या ठीकाणी नागरीकांचे अडीअडचणीचे निराकरनण जागेवरच करण्यात येणार आहे.तरी या शिबिराचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार गजानन शिंदे यांनी केले आहे.

# वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

लोणंद : (स. गांवकरी)

सातारा जिल्ह्यातील लोणंद येथील वारकरी शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांचे भावपूर्ण स्वागत करण्यात आले. अनेक वर्षांपासून वारकरी संप्रदायाची सेवा, संस्कार आणि समाजप्रबोधनाचे कार्य करणाऱ्या या संस्थेला भेट देत विविध सेवाभावी उपक्रम राबविण्यात आले.

यावेळी संस्थेतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन, शालेय साहित्य, हरिपाठ पुस्तिका तसेच महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. वारकरी परंपरेचे जतन आणि भावी पिढीमध्ये संस्कार रुजविण्याचे कार्य संस्थेमार्फत सातत्याने सुरू असून या कार्याची पाहणी करून उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या सेवाभावी उपक्रमांचे कौतुक केले.

यावेळी संस्थेतील... यांनी ...





### सेवाकार्यात सहकार्याचे आश्वासन!

याप्रसंगी शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांनी वारकरी शिक्षण संस्थेच्या सेवाकार्यात भविष्यात आवश्यक ती सर्वतोपरी मदत करण्याचे अभिवचन दिले. त्यांच्या या आश्वासनामुळे संस्थेच्या कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, डॉ. बाळासाहेब गोविंद खरात, सामाजिक कार्यकर्ते कांतीराम बोराडे, आळंदीचे नगरसेवक मनोहर दिवाणे, संतोष रायकर, राजेंद्र पांडे, संजय फुलसुंदर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या शिक्षण, संस्कार आणि सेवाभावाच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



# अंकशास्त्राचा आणखी एक अचूक संकेत

पुणे : (स. गांवकरी)

२०२६ हे अंकशास्त्रानुसार 'क्रमांक- १' म्हणजे १ या अंकाचा प्रभाव असलेले वर्ष असून त्यावर सूर्याचा प्रभाव आहे. वर्षाच्या सुरुवातीलाच अंकशास्त्र तज्ञ श्वेता जुमानी यांनी सांगितले होते की, या वर्षात सूर्याची ऊर्जा जगभरातील महत्त्वाच्या घटनांमध्ये ठळकपणे दिसून येईल. सूर्याशी संबंधित पिवळा, नारिंगी आणि सोनेरी रंग तसेच सूर्य किंवा सिंहाचे प्रतीक असलेल्या देशांना यश, मान-सन्मान आणि विशेष स्थान मिळण्याची शक्यता अधिक असेल. सिंह (Leo) ही सूर्याची स्वतःची रास आहे. नेतृत्व, सत्ता, धैर्य, आत्मविश्वास, कीर्ती आणि विजय हे सिंह राशीचे प्रमुख गुण आहेत. 'क्रमांक १'च्या वर्षात हे गुण अधिक प्रभावीपणे कार्यरत होतात. जुलै महिन्याच्या माझ्या भाकितांमध्येही मी याचा उल्लेख केला होता. तसेच, आरसीबीच्या विजेतेपदाच्या वेळीही सिंहाचे प्रतीक आणि सूर्याची ऊर्जा स्पष्टपणे दिसून आली होती. आता हीच ऊर्जा फिफा विश्वचषकातही पाहायला मिळत आहे. स्पर्धेतील ४८ संघांपैकी फक्त ८ संघांच्या ध्वज, चिन्ह किंवा राष्ट्रीय प्रतीकांमध्ये सूर्य किंवा सिंहाचे ठळक प्रतिनिधित्व आहे. विशेष म्हणजे त्या ८ पैकी स्पेन, इंग्लंड आणि अर्जेंटिना हे ३ संघ उपांत्य फेरीत पोहोचले. त्यानंतर स्पेनने फ्रान्सवर विजय मिळवत अंतिम फेरीत स्थान निश्चित केले.



■ फिफा विश्वचषकात सूर्याच्या ऊर्जेचा प्रभाव स्पष्ट!

# टेंभुर्णी येथील गोविंद वृद्धाश्रमात सेवाभावी कार्यक्रम

### ज्येष्ठ नागरिकांना महाप्रसाद व नामस्मरणाचा संदेश!

टेंभुर्णी : (स. गांवकरी)

दि. १३ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता टेंभुर्णी येथील गोविंद वृद्धाश्रमात अध्यक्ष श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर यांच्या हस्ते सेवाभावी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, आध्यात्मिक मार्गदर्शन आणि महाप्रसाद वितरणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. या प्रसंगी श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला), श्रीमद्भागवत कथाकार परमपूज्य नाना महाराज देशमुख, माजी महापौर राजेंद्र पारखे, अ‍ॅड. हरिश्चंद्र कांबळे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते. वृद्धाश्रमातील सुमारे ४२ ज्येष्ठ नागरिक तसेच गोविंद महाराज यांच्या परिवारातील सदस्यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. नाना महाराजांनी उपस्थितांना आशीर्वाद देत अध्यात्माचे महत्त्व पटवून दिले.



कार्यक्रमानंतर श्रीमती धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर यांच्या वतीने सर्व उपस्थितांना बुंदी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

मार्गदर्शन करताना नाना महाराज देशमुख म्हणाले की, गोविंद वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांच्या राहण्याची, जेवणाची, नाश्त्याची आणि इतर सर्व आवश्यक सुविधांची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. हा अत्यंत सेवाभावी आणि समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम असून प्रत्येकाने देवाचे नामस्मरण करावे. ते पुढे म्हणाले की, श्रीमती धनलक्ष्मीबेन आणि श्री नानजीभाई ठक्कर यांच्या वतीने गेल्या २३ वर्षांपासून हा सेवेचा वसा अखंडपणे सुरू आहे. या कार्यामुळे शेकडो ज्येष्ठ नागरिकांना आधार मिळाला असून सध्या ४१ वृद्ध येथे वास्तव्यास आहेत. उपस्थितांना नामलेखनासाठी वह्याही देण्यात आल्या असून दररोज देवाचे नाम लिहिण्याचे आवाहन त्यांनी केले. "शेवटी देवाचे नामच आपल्या सोबत येणार आहे," असा भावपूर्ण संदेश त्यांनी दिला.

नाना महाराजांनी श्री नानजीभाई ठक्कर व त्यांच्या परिवाराच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करत मनःपूर्वक आभार व्यक्त केले. तसेच उपस्थितांना कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन करत, निरोगी व अध्यात्मिक जीवन जगण्याचा संदेश दिला. आध्यात्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना आनंद, आत्मविश्वास आणि मानसिक बळ मिळाले.

# गरजू आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

खालापूर : (स. गांवकरी)

दि. १५ जुलै २०२६ रोजी नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (शेठ) ठाणावाला ट्रस्ट आणि आधार जनसेवा सामाजिक संस्था, कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय आश्रम शाळा, डोळवली (ता. खालापूर) येथे गरजू व होतकरू आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटपाचा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास ज्येष्ठ समाजसेवक समाजरत्न डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्यासह नगराध्यक्षा सौ. पुष्पाताई घोडके, श्री. राजेश शांतीलाल कोठारी, डॉ. एन. ए. कदम, अ‍ॅड. कैलास मोरे, श्री. राजेंद्र पांडे, डॉ. विजय म्हसकर, डॉ. सावळे, श्री. सुनील चव्हाण, श्री. के. डी. पाटील, श्री. सुभाष पाटील, श्री. अजय बळीराम पिंगळे, श्री. सुदर्शन पाटील, डॉ. पाटील, श्रीमती मालती मुदलियार, श्री. दयानंद चतुर, श्री. पाटील सर, श्री. महादेव म्हात्रे, श्री. बापू गाडे, श्री. अल्पेश मोरे, पत्रकार श्री. प्रकाश खराडे, पत्रकार श्री. नरेश जाधव, श्री. देवेंद्र भारती, श्री. केशव घरत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमादरम्यान अ‍ॅड. कैलास मोरे यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. "कठोर परिश्रम, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर विद्यार्थी अधिकारी, डॉक्टर, अभियंता, सनदी लेखापाल, आयएएस, आयपीएस यांसारख्या उच्च पदांवर पोहोचू शकतात. आम्ही सर्वजण तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत," असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांपैकी किमान पाच जणांना उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन व आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले.

समाजरत्न डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश देताना सांगितले, "आज तुम्ही विद्यार्थी आहात, पण उद्या देशाचे भविष्य आहात. शिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर अधिकारी बनून आई-वडिलांचे, गावाचे आणि जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करा. आज तुम्ही मान्यवरांसाठी टाळ्या वाजवत आहात; उद्या तुमच्या यशासाठी संपूर्ण समाज टाळ्या वाजवेल."

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांसाठी आणखी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. "शिक्षणाच्या प्रवासात तुमच्या किंवा तुमच्या कुटुंबातील कोणालाही वैद्यकीय मदतीची गरज भासल्यास आमच्या रुग्णालयात पूर्णपणे मोफत उपचार करण्यात येतील," असे आश्वासन देत त्यांनी शिक्षण, संस्कार आणि समाजसेवेचे महत्त्वही स्पष्ट केले. नगराध्यक्षा सौ. पुष्पाताई घोडके यांनी विद्यार्थ्यांना सातत्य, शिस्त, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर यश मिळविण्याचा संदेश दिला. उपस्थित सर्व मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच प्रसादाचे वितरण करण्यात आले. आधार जनसेवा सामाजिक संस्था, कर्जतचे अध्यक्ष श्री. गणेश कांबळे तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या विशेष प्रयत्नातून हा समाजोपयोगी व प्रेरणादायी उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांची गरज व्यक्त केली.

# प्रदेशाध्यक्षपदी भाग्यश्री विवेक ठाकरे यांची नियुक्ती

पुणे : (स. गांवकरी)



ग्रामगौरव फाउंडेशन या राज्यस्तरीय संस्थेशी संलग्न असलेल्या महाराष्ट्र ग्रामविकास परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी भाग्यश्री विवेक ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामीण विकास क्षेत्रातील त्यांची कार्यतत्परता, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत हा निर्णय जाहीर करण्यात आला. परिषदेचे संस्थापक प्रणेते विवेक ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थापक कार्याध्यक्ष सुभाष मराठे यांनी भाग्यश्री ठाकरे यांच्या ग्रामीण विकास क्षेत्रातील अभ्यास, कार्याची आवड आणि संघटन कौशल्याचा गौरव करत त्यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केली. महाराष्ट्र ग्रामविकास परिषद ही राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद यांच्या समन्वयातून ग्रामीण विकासासाठी कार्यरत असलेली संघटना आहे. शासनाच्या विकासाभिमुख धोरणांची प्रभावी अंमलबजावणी, शासन निर्णय, परिपत्रके आणि विविध कल्याणकारी योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचविणे तसेच पंचायतराज व्यवस्थेतील सर्व घटकांना संघटित करून त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी परिषद सातत्याने कार्यरत आहे.

# वारकऱ्यांच्या सेवेत समाजकार्याचा अनोखा वसा



डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

### लोणंद, सासवड व जेजुरी येथे लाखो भाविकांना महाप्रसाद, हरिपाठ, नेत्रतपासणी व मोफत चष्म्यांचे वाटप!

(स. गांवकरी)

आषाढी वारी निमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी लोणंद, सासवड आणि जेजुरी येथे भव्य सेवा उपक्रम राबविण्यात आला. या ठिकाणी वारकऱ्यांना महाप्रसाद, हरिपाठ, वही, पेन, सतरंजी, बॅग आदी साहित्याचे मोफत वितरण करण्यात आले. तसेच मोफत नेत्रतपासणी शिबिर आयोजित करून अनेक गरजू वारकऱ्यांना मोफत चष्म्यांचेही वाटप करण्यात आले.

या सेवा उपक्रमाचे नेतृत्व थोर समाजसेवक शेठ नानजीभाई खीमजी ठक्कर (ठाणावाला) यांनी केले. सकाळी सात वाजल्यापासून ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत हजारो वारकऱ्यांची सेवा करत प्रत्येक भाविकापर्यंत आवश्यक साहित्य पोहोचविण्यात आले. भक्तांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि आनंद हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले.






या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, आळंदी नगरपालिकेचे नगरसेवक मनोहर दिवाणे, नगरसेवक ज्ञानेश्वर रायकर, पुण्यातील नामांकित उद्योजक कृष्णा बिरादार, ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते कांतीराम बोराडे, माय माऊली सेंटरचे संस्थापक डॉ. विठ्ठलराव वरुडे पाटील, समाजसेवक डॉ. बाळासाहेब खरात, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र पांडे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना शेठ नानजीभाई ठक्कर म्हणाले की, "ही सेवा अनेक वर्षांपासून अखंड सुरू आहे. संपूर्ण हिंदुस्थानातून लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे पायी निघतात. भक्त आणि भगवान यांचे हे अनोखे मिलन असते. पंधरा दिवसांचा प्रवास करून पंढरीत पोहोचल्यानंतर भक्तांच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसतो, तो शब्दांत व्यक्त करता येणार नाही. वारकऱ्यांना काहीतरी देण्यामध्ये जो आनंद मिळतो, तोच माझ्या जीवनातील सर्वात मोठा आनंद आहे." ते पुढे म्हणाले की, एन.के. टी. चॅरिटेबल ट्रस्ट, दैनिक समर्थ गांवकरी समूह आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील विविध मार्गांवरून पंढरपूरकडे जाणाऱ्या पाच ते सहा लाख वारकऱ्यांना छत्री, रेनकोट, महाप्रसाद, हरिपाठ, सतरंजी, वही, पेन, बॅग तसेच इतर आवश्यक साहित्याचे वितरण करण्यात येत असून ही सेवा अखंड सुरू राहणार आहे. यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, "पत्रकार म्हणून समाजातील विविध घडामोडींचे वार्तांकन करत असताना वारकऱ्यांच्या सेवेत सहभागी होण्याची संधी मिळणे हे आमच्यासाठी भाग्याचे आहे. अनेक वर्षांपासून आम्ही या सेवाकार्यात सहभागी होत असून पंढरपूर, लोणंद, सासवड, जेजुरी आणि आळंदी मार्गावरील वारकऱ्यांना महाप्रसाद, भोजन तसेच विविध जीवनावश्यक साहित्याचे वितरण करत आहोत. वारकरी संप्रदायाची सेवा हीच खरी विठ्ठल सेवा असून या कार्यात सहभागी होण्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे." सेवा उपक्रमादरम्यान वारकऱ्यांसाठी मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. अनेक भाविकांच्या डोळ्यांची तपासणी करून त्यांना आवश्यकतेनुसार मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले. तसेच महाप्रसाद, हरिपाठ, वही, पेन, सतरंजी, बॅग आदी साहित्याचे नियोजनबद्ध वितरण करण्यात आले. वारकरी संप्रदायाच्या सेवेला वाहिलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकी, भक्ती आणि मानवतेचा सुंदर संगम ठरला. हजारो वारकऱ्यांनी आयोजकांचे मनापासून आभार मानत या सेवाकार्याचे कौतुक केले. महाराष्ट्रातील विविध भागांतून पंढरपूरकडे जाणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याच्या सेवेसाठी उभारलेले हे कार्य वारी परंपरेतील सेवाभावाची समृद्ध परंपरा अधिक दृढ करणारे ठरत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## पिरामल फायनान्सचा तिमाही नफा ६७ टक्क्यांनी वाढला

पुणे (स. गांवकरी) : पिरामल फायनान्स लिमिटेडने आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली असून कंपनीचा एकत्रित निव्वळ नफा 67 टक्क्यांनी वाढून 461 कोटी रुपये झाला आहे. मागील वर्षी याच तिमाहीत हा नफा 276 कोटी रुपये होता. कंपनीच्या रिटेल कर्ज वितरणात 44 टक्क्यांची वाढ होऊन ते 12,527 कोटी रुपये झाले, तर व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता (एयूएम) 25 टक्क्यांनी वाढून 1.07 लाख कोटी रुपये झाली आहे. कंपनीने देशभरात 780 शाखा उभारल्या असून सुमारे 60 लाख ग्राहकांना सेवा दिली जात आहे. दरम्यान, संचालक मंडळाने भागधारकांच्या मंजुरीच्या अधीन राहून 4,000 कोटी रुपयांपर्यंत निधी उभारण्यास मंजुरी दिली आहे. तसेच, गोल्ड लोन व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी चालू आर्थिक वर्षात 200 नवीन शाखा सुरू करण्याचे कंपनीने जाहीर केले आहे.

## ४० वर्षीय महिलेच्या अवयवदानातून चार जणांना मिळाले नवजीवन

पुणे (स. गांवकरी) : दौंड येथील ४० वर्षीय विमा प्रतिनिधी (इन्शुरन्स एजंट) महिलेच्या अवयवदानातून चार जणांना नवजीवन मिळाले आहे. मेंदूमृत घोषित झाल्यानंतर कुटुंबीयांनी अवयव दान करण्याचा धाडसी निर्णय घेतला. रस्ते अपघातात मेंदूला गंभीर दुखापत झाल्यानंतर या महिलेला उपचारासाठी ७ जुलै रोजी नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटर येथे दाखल करण्यात आले होते. तिला ९ जुलै रोजी मेंदूमृत घोषित करण्यात आले. या दुःखद प्रसंगी तिच्या कुटुंबीयांनी अवयवदानासाठी संमती दर्शवून आपल्या वैयक्तिक दुःखाचे रूपांतर इतरांसाठी आशेच्या किरणात केले. १० जुलै २०२६ रोजी अवयव काढण्याची (ऑर्गन रिट्रिव्हल) शस्त्रक्रिया करण्यात आली. नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरचे समूह कार्यकारी अधिकारी डॉ.संजय पठारे यांनी सांगितले की, दात्याचे फुफ्फुसे, यकृत आणि दोन्ही मूत्रपिंडे काढण्यात आली. यापैकी यकृत आणि एक मूत्रपिंडाचे प्रत्यारोपण नोबल हॉस्पिटलमध्ये करण्यात आले, तर दुसरे मूत्रपिंड आणि फुफ्फुसे झेडटीसीसीच्या माध्यमातून पुण्यातील इतर रुग्णालयात ग्रीन कॉरिडॉरच्या माध्यमातून पाठवण्यात आली.

## सिग्नेचर ग्लोबलची पूर्वविक्री २५ टक्क्यांनी वाढून १९.७ अब्ज रुपयांवर

- सरासरी विक्री प्राप्तीतही वाढ
- टोनिनो लॅम्बोर्गिनीसोबत ब्रँडेड निवासी प्रकल्प क्षेत्रात प्रवेश

पुणे (स. गांवकरी) : दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात मजबूत उपस्थिती असलेल्या आणि भारतातील आघाडीच्या स्थावर मालमत्ता विकासकांपैकी एक असलेल्या सिग्नेचर ग्लोबलने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत १९.७ अब्ज रुपयांच्या पूर्वविक्रीची नोंद केली आहे. मागील तिमाहीच्या तुलनेत ही वाढ २५ टक्के आहे. कंपनीच्या विविध प्रकल्पांना ग्राहकांकडून सातत्याने मिळणारी मागणी आणि अंमलबजावणीवर केंद्रित विकास धोरणामुळे ही कामगिरी साध्य झाल्याचे कंपनीने म्हटले आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत कंपनीचे संकलन ६.७ अब्ज रुपये राहिले, तर निव्वळ कर्ज ३.९ अब्ज रुपये नोंदविण्यात आले. याच कालावधीत कंपनीची सरासरी विक्री प्राप्ती प्रति चौरस फूट १७ हजार ९३ रुपये इतकी झाली. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ही सरासरी प्रति चौरस फूट १५ हजार २५० रुपये होती. त्यामुळे कंपनीच्या सरासरी विक्री प्राप्तीतही लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले आहे. कंपनीच्या या कामगिरीमागील प्रमुख कारणांपैकी एक म्हणजे 'टोनिनो लॅम्बोर्गिनी रेसिडेन्सेस'च्या माध्यमातून वेगाने विस्तारत असलेल्या ब्रँडेड निवासी प्रकल्पांच्या क्षेत्रात केलेला धोरणात्मक प्रवेश असल्याचे सांगण्यात आले आहे. प्रसिद्ध इटालियन ब्रँड टोनिनो लॅम्बोर्गिनी यांच्या सहकार्याने हा प्रकल्प विकसित करण्यात येत आहे.

## कालातीत स्विस कारागिरीचा अनुभव देणारे 'अटलांटिक सीवेव क्रोनो' सादर



पुणे (स. गांवकरी) : स्विस घड्याळ निर्मितीच्या १३५ वर्षांहून अधिक जुन्या परंपरेसाठी ओळखल्या जाणाऱ्या अटलांटिकने 'सीवेव क्रोनो - ग्रीन डायल विथ मेटल ब्रेसलेट' हे आकर्षक घड्याळ सादर केले आहे. अचूक अभियांत्रिकी, उत्कृष्ट कारागिरी आणि कालातीत रचना यांचा सुरेख संगम असलेले हे घड्याळ परिष्कृत शैली, विश्वासार्ह कार्यक्षमता आणि दैनंदिन वापरातील बहुपयोगितेला प्राधान्य देणाऱ्या पुरुषांसाठी तयार करण्यात आले आहे. अटलांटिकच्या समृद्ध स्विस घड्याळ निर्मितीच्या परंपरेचा वारसा पुढे नेणाऱ्या या घड्याळात पारंपरिक सौंदर्य आणि आधुनिक कार्यक्षमता यांचा समतोल साधण्यात आला आहे. ४० मिलिमीटर आकाराचे 'सीवेव क्रोनो' आधुनिक जीवनशैलीतील विविध प्रसंगांना अनुरूप ठरेल अशा पद्धतीने तयार करण्यात आले आहे. औपचारिक व्यावसायिक पोशाख असो, दैनंदिन आकर्षक वेशभूषा असो किंवा सुटीच्या दिवसातील सहज शैली असो, प्रत्येक प्रसंगात हे घड्याळ व्यक्तिमत्त्वाला वेगळी ओळख देणारे ठरते. स्वित्झर्लंडमध्ये निर्मित 'रोंडा आरझेड५० क्वार्ट्झ मूव्हमेंट'वर चालणारे हे घड्याळ अचूक आणि विश्वासार्ह कार्यक्षमता प्रदान करते. यामध्ये आकर्षक हिरव्या रंगाचा डायल देण्यात आला असून कालमापनाची अतिरिक्त सुविधा आणि तारीख दर्शविण्याची सोय उपलब्ध आहे. हाताने बसविण्यात आलेले निर्देशांक, अंधारात स्पष्ट दिसणारे काटे आणि हाताने बसविलेला अटलांटिकचा लोगो यामुळे घड्याळाच्या सौंदर्यात अधिक भर पडते.




## पुण्यात एसीएमएची पहिली क्लस्टर परिषद संपन्न

पुणे (स. गांवकरी) : एसीएमए मोबिलिटी फाउंडेशन तर्फे नुकतेच 'बिल्डिंग वर्ल्ड-क्लास ऑटोमोटिव्ह सप्लाय चेन - द एसीएमए वे' या संकल्पनेवर आधारित पहिल्या क्लस्टर परिषद 2026 चे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेद्वारे एसीएमए क्लस्टर मुव्हमेंटच्या 25 वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा गौरव करण्यात आला. या उपक्रमाने भारतीय ऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट उद्योगात कार्यक्षमतेत सातत्याने सुधारणा, उद्योगांमधील सहकार्य आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्यात मोलाचे योगदान दिले आहे. या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ह्युंदाई मोटर इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी तरुण गर्ग,विशेष अतिथी म्हणून स्विच मोबिलिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मणी तसेच एसीएमएचे अध्यक्ष विक्रमपती सिंघानिया, एसीएमएचे नियुक्त अध्यक्ष श्रीराम विजी आणि एसीएमएचे सरसंचालक विनी मेहता आदी मान्यवर उपस्थित होते.

# देवेंद्र फडणवीस सुख-दुःखात पाठीशी उभे राहणारे नेतृत्व

## भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण : शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गावागावातील शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांच्या अपेक्षा आणि स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असणारे नेतृत्व आहे. शेतकऱ्यांसह राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा, या उद्देशाने त्यांचे सरकार काम करत आहे. त्यामुळे राज्यातील तमाम शेतकरीवर्ग पूर्ण ताकदीने देवाभाऊ सरकारच्या पाठीशी उभा आहे, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले.

शेतकऱ्यांच्या पीक कर्जमुक्तीचा निर्णय घेतल्याबद्दल राज्यातील शेतकऱ्यांच्या वतीने भाजप किसान मोर्चातर्फे मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना रविंद्र चव्हाण यांनी राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या विविध निर्णयांचा आढावा घेतला.

शेतरस्ते आणि पाणंद रस्त्यांची कामे, जलयुक्त शिवार अभियान, शेतीला कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड तसेच कृषी पंपांना दिवसा मोफत वीजपुरवठा यांसारख्या विविध निर्णयांचा उल्लेख चव्हाण यांनी आपल्या भाषणात केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारने घेतलेल्या निर्णयांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक आणि आमूलाग्र बदल घडून येत असल्याचा दावाही त्यांनी केला.

या सोहळ्यादरम्यान भाजपचे प्रदेश सरचिटणीस आमदार संजय कुटे यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. उपस्थित शेतकऱ्यांनी हात उंचावून या ठरावाला प्रतिसाद दिला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या समर्थनार्थ घोषणाही देण्यात आल्या.

सत्काराला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा केवळ सत्कार सोहळा नसून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्याची संधी असल्याचे सांगितले. कोणतीही राजकीय निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून कर्जमुक्तीचा निर्णय घेतलेला नाही. शेतकऱ्यांचे हित हा सरकारसाठी राजकारणाचा विषय नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"अनेकांना वाटत होते की, सरकार कर्जमाफी करणार नाही आणि त्यासाठी आंदोलने करावी लागतील. मात्र हे महायुतीचे सरकार आहे, शेतकऱ्यांच्या देवाभाऊचे सरकार आहे," असे फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

### ४८ हजार कोटींचे जुने वीजबिल माफ करण्याची घोषणा

राज्यातील ७.५ अश्वशक्ती क्षमतेच्या कृषी पंपांना दिवसा मोफत वीज देण्यात येत असल्याचे सांगत, या कृषी पंपांशी संबंधित ४८ हजार कोटी रुपयांचे जुने वीजबिल माफ करण्यात येत असल्याची घोषणाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. "शेतकऱ्यांची पाटी कोरी झाली पाहिजे आणि त्याला त्या पाटीवर नव्याने इतिहास लिहिता आला पाहिजे, या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे," असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारकडून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजना आणि घेतल्या जाणाऱ्या निर्णयांबद्दल उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केल्याचे यावेळी सांगण्यात आले. या सोहळ्याला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, भाजप किसान मोर्चाचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार अनिल बोंडे, आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रवीण दरेकर, भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार संजय कुटे, भाजप महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या अध्यक्षा आमदार चित्रा वाघ, भाजप महाराष्ट्र प्रदेश किसान मोर्चाचे अध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्यासह अनेक आमदार, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# कॅलिफोर्निया बदाम ठरू शकतात रोगप्रतिकारक शक्तीसाठी उपयुक्त

पुणे : (स. गांवकरी)

पावसाळ्याच्या आगमनासोबत सर्दी, खोकला, ताप आणि इतर हंगामी संसर्गाचे प्रमाण वाढते. अशा काळात संतुलित आहार आणि पोषक अन्नपदार्थांचा समावेश केल्यास रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवण्यास मदत होऊ शकते. यासाठी कॅलिफोर्निया बदामांचा दैनंदिन आहारात समावेश करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. कॅलिफोर्निया बदामांमध्ये झिंक, तांबे, लोह, जीवनसत्त्व ई यांसह २४ महत्त्वाचे पोषक घटक असल्याचे सांगितले जाते. हे घटक शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीला आधार देण्यास मदत करतात. त्यामुळे लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांसाठी बदाम हा पोषक पर्याय ठरू शकतो. न्यूट्रिशन आणि वेलनेस सल्लागार शीला कृष्णस्वामी यांच्या मते, आहारातील सातत्यपूर्ण आणि योग्य सवयी रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. जीवनसत्त्व ई आणि पॉलीफेनॉल्ससारखे



अँटिऑक्सिडंट्स असलेले बदाम शरीराचे संरक्षण करण्यास मदत करतात. मॅक्स हेल्थकेअरच्या डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समद्दार यांनीही संपूर्ण धान्ये, कमी चरबीयुक्त प्रथिने आणि कॅलिफोर्निया बदामांचा संतुलित आहारात समावेश करण्याची शिफारस केली आहे. त्यांच्या मते, पावसाळ्यात संसर्गाचा धोका वाढत असल्याने पोषक आहाराला अधिक महत्त्व आहे.

अभिनेत्री सोहा अली खान यांनीही आपल्या दैनंदिन आहारात कॅलिफोर्निया बदामांचा नियमित समावेश करत असल्याचे सांगितले.

# वारीतील सहभागातून जेमिनीने आपले नाते अधिक केले दृढ

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



पंढरपूर वारीत सहभाग घेत जेमिनीने महाराष्ट्रातील स्थानिक समुदायांशी आपले नाते अधिक दृढ केले आहे आणि राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा सन्मान केला आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, पुण्याहून चार 'जेमिनी सेवा व्हॅन'ला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या व्हॅनमध्ये वारकऱ्यांसाठी मोबाईल चार्जिंगची सुविधा देण्यात आली असून, त्या पुण्यापासून पंढरपूरपर्यंत वारकऱ्यांसोबत प्रवास करतील. यामुळे भाविकांना त्यांच्या संपूर्ण यात्रेत आपल्या कुटुंबाशी संपर्कात राहणे सोयीचे होईल.

या यात्रेदरम्यान वारकऱ्यांना फराळ वाटप करणाऱ्या रेस्टॉरंट भागीदारांना कंपनीतर्फे 'जेमिनी शेंगदाणा तेल' (Gemini Groundnut Oil) पुरवले जाईल. याशिवाय, पावसाळ्यात मौल्यवान वस्तू सुरक्षित आणि कोरड्या ठेवण्यासाठी एक लाख पारदर्शक (ट्रान्सपरंट) युटिलिटी पाऊच, तसेच खिशात ठेवण्याजोगी 'पॉकेट आरती' आणि खास की-चेनचे वाटप केले जाईल, जे भाविकांसाठी यात्रेची एक उपयुक्त आठवण ठरेल.

या उपक्रमावर भाष्य करताना, सीनिअर डायरेक्टर, गो-टू-मार्केट रिटेल, कारगिल फूड साऊथ आशिया, शैलेश खुराणा म्हणाले: "अनेक दशकांपासून महाराष्ट्र हे जेमिनीचे घर राहिले आहे आणि गेल्या अनेक वर्षांत इथल्या घराघरांचा एक महत्त्वाचा भाग बनण्याचा बहुमान आम्हाला मिळाला आहे. पंढरपूरची वारी ही महाराष्ट्रातील सर्वात जिव्हाळ्याची परंपरा आहे, जी श्रद्धा, सेवा आणि सामाजिक एकतेचे उत्तम दर्शन घडवत लाखो भाविकांना एकत्र आणते. या वारीचा एक भाग होणे आणि पंढरपूरच्या वाटेवर भाविकांना मदत करणे हा आमचा सन्मान आहे. महाराष्ट्रातील जनता आणि समुदायांप्रती आमची बांधिलकी जपत, भाविकांचा हा प्रवास थोडा अधिक सुखकर करण्याची आमची इच्छा आहे. आमच्यासाठी, एक विश्वासार्ह ब्रँड असण्याचा अर्थ असाही आहे की ज्या क्षणांना मोठे सांस्कृतिक आणि भावनिक महत्त्व आहे, अशा प्रसंगी समाजासोबत खंबीरपणे उभे राहणे."

उपजीविका, सुरक्षितता आणि परवडणाऱ्या शहरी वाहतुकीसाठी

# दुचाकी टॅक्सी नियमनात देशव्यापी सुसंगतीची गरज : कट्स इंटरनॅशनल

- राज्यनिहाय विसंगत नियमांऐवजी पुराव्यांवर आधारित संतुलित नियामक चौकट तयार करण्याची मागणी

पुणे : (स. गांवकरी)




देशातील दुचाकी टॅक्सी सेवांसाठी विविध राज्यांमध्ये असलेल्या विसंगत नियमांऐवजी पुराव्यांवर आधारित, सुसंगत आणि संतुलित नियामक चौकट तयार करण्याची गरज असल्याचे मत भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते (आर्थिक विषय) गोपालकृष्ण अग्रवाल यांनी व्यक्त केले. देशातील शहरी वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ, परवडणारी आणि रोजगाराभिमुख करण्यासाठी दुचाकी टॅक्सी सेवांच्या नियमनात देशव्यापी सुसंगती असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कट्स इंटरनॅशनलच्या 'हार्मोनायझिंग बाईक टॅक्सी रेग्युलेशन्स : एव्हिडन्स-बेस्ड असेसमेंट अँड सजेस्टेड पाथवेज फॉर रिफॉर्म' या अहवालाच्या प्रकाशनप्रसंगी अग्रवाल बोलत होते.

"भारत नागरिकांचे जीवन अधिक सुलभ करण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना संपर्क व्यवस्था, रोजगारनिर्मिती, उत्पादकता आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी एकात्मिक शहरी वाहतूक व्यवस्था आवश्यक आहे," असे अग्रवाल यांनी यावेळी सांगितले. अहवालानुसार, दुचाकी टॅक्सी सेवा भारतातील शहरी वाहतूक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनत असून प्रवासाच्या सुरुवातीच्या आणि अंतिम टप्प्यातील संपर्क व्यवस्था मजबूत करण्यासाठी ती उपयुक्त ठरत आहे. मोटार वाहन कायदा, १९८८ आणि मोटार वाहन एकत्रित सेवा मार्गदर्शक तत्त्वे, २०२५ अंतर्गत या सेवांना कायदेशीर आधार असला, तरी विविध राज्यांमध्ये असलेल्या वेगवेगळ्या नियमांमुळे प्रवासी, असंघटित क्षेत्रातील कामगार, सेवा पुरविणाऱ्या कंपन्या आणि नियामक यांच्यामध्ये अनिश्चितता निर्माण होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. दुचाकी टॅक्सीचे भाडे प्रतिकिलोमीटर सुमारे ८ ते १० रुपये असल्याने रिक्षा आणि टॅक्सीच्या तुलनेत हा वाहतुकीचा अधिक परवडणारा पर्याय ठरू शकतो, असे अहवालात म्हटले आहे. विशेषतः शहरांमधील कमी अंतराच्या प्रवासासाठी तसेच सार्वजनिक वाहतूक केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी या सेवेचा उपयोग होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दुचाकी टॅक्सी सेवेमुळे युवक आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना तुलनेने कमी गुंतवणुकीमध्ये रोजगार आणि उत्पन्नाच्या संधी उपलब्ध होत असल्याकडेही अहवालात लक्ष वेधण्यात आले आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या चालकांना दरमहा सरासरी २५ ते ३० हजार रुपये निव्वळ उत्पन्न मिळू शकते, असा दावा अहवालात करण्यात आला आहे.

# विवोचा 'टी५ लाइट ४४ वॅट ५जी' भारतात सादर

नवी दिल्ली : (स. गांवकरी)




स्मार्टफोन क्षेत्रातील आघाडीची कंपनी विवो इंडियाने आपल्या टी मालिकेतील नवीन विवो टी५ लाइट ४४ वॅट ५जी हा स्मार्टफोन भारतीय बाजारात सादर केला आहे. दमदार ६,५०० एमएएच बॅटरी, ४४ वॅट जलद चार्जिंग, लष्करी दर्जाची टिकाऊ रचना, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुविधा आणि आकर्षक रचना या वैशिष्ट्यांमुळे हा स्मार्टफोन तरुण ग्राहकांसाठी उपयुक्त पर्याय ठरणार असल्याचा कंपनीचा दावा आहे.

कंपनीच्या माहितीनुसार, सतत प्रवास करणारे, ऑनलाइन शिक्षण घेणारे, विविध प्रकारचा आशय तयार करणारे तसेच मनोरंजनासाठी मोबाईलचा मोठ्या प्रमाणावर वापर करणाऱ्या ग्राहकांचा विचार करून हा स्मार्टफोन विकसित करण्यात आला आहे. दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि दैनंदिन वापरात अधिक सुरक्षितता देणारी मजबूत रचना ही या उपकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

या स्मार्टफोनमध्ये ६,५०० एमएएच क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली असून ती एकदा पूर्ण चार्ज केल्यानंतर तब्बल १५ दिवसांपर्यंत प्रतीक्षा स्थितीत राहू शकते, असा कंपनीचा दावा आहे. याशिवाय सुमारे ५४ तास संभाषण, ८० तास संगीत, ४८ तास स्थानिक व्हिडीओ प्लेबॅक, २० तास सामाजिक माध्यमांचा वापर आणि जवळपास १२.८ तास खेळांचा अनुभव मिळू शकतो.

# वारकऱ्यांसाठी 'वारी केअर कॅम्प'चे आयोजन

## रेनकोट, वैद्यकीय तपासणी व आरोग्य सहाय्य उपलब्ध

पुणे : (स. गांवकरी)



दरवर्षी लाखो वारकरी भगवान विठ्ठलांच्या दर्शनासाठी सुमारे ३०० किलोमीटरची पंढरपूर वारी पायी पूर्ण करतात. या पवित्र यात्रेदरम्यान वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने आणि समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी जपत अपोलो हॉस्पिटल्स पुणे, शंकर शेठ रोड, स्वारगेट यांच्या वतीने विशेष 'वारी केअर कॅम्प' आयोजित करण्यात आला. या उपक्रमाद्वारे वारकऱ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि कल्याणासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

या उपक्रमांतर्गत वारकऱ्यांना पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी रेनकोट (पॉन्चो) वितरित करण्यात आले. तसेच विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात अपोलो हॉस्पिटल्सच्या अनुभवी डॉक्टरांनी आणि आरोग्यसेवा तज्ज्ञांनी वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार, आवश्यक औषधांचे वाटप तसेच वैद्यकीय सल्ला दिला.

वारीदरम्यान होणारा शारीरिक ताण लक्षात घेऊन वारकऱ्यांना आरोग्य मार्गदर्शिका (हेल्थ बुकलेट) देखील वितरित करण्यात आली. या पुस्तिकेमध्ये वैयक्तिक स्वच्छता, पुरेसे पाणी पिणे, संतुलित आहार तसेच प्रवासादरम्यान घ्यावयाच्या आवश्यक आरोग्यविषयक खबरदारीबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली असून, वारकऱ्यांनी संपूर्ण प्रवासात स्वतःच्या आरोग्याची योग्य काळजी घ्यावी हा त्यामागील उद्देश आहे. याबाबत अपोलो हॉस्पिटल्स पुणेच्या टीमने सांगितले की, "आरोग्यसेवा ही केवळ रुग्णालयाच्या चार भिंतींपुरती मर्यादित नसते. महाराष्ट्राच्या सर्वात पवित्र आणि श्रद्धास्थानी असलेल्या वारी परंपरेत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करणे ही आमच्यासाठी सामाजिक बांधिलकी आहे. या उपक्रमाद्वारे प्रत्येक वारकरी उत्तम आरोग्य, आत्मविश्वास आणि मनःशांतीसह आपली पवित्र यात्रा पूर्ण करू शकेल, हीच आमची अपेक्षा आहे." 'वारी केअर कॅम्प' हा अपोलो हॉस्पिटल्स पुणेच्या समाजाभिमुख उपक्रमांचा एक महत्त्वाचा भाग असून, दर्जेदार आरोग्यसेवा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि प्रत्यक्ष वैद्यकीय सहाय्य यांच्या माध्यमातून प्रत्येक वारकऱ्याला वेळेवर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा रुग्णालयाचा प्रयत्न आहे.

# खासदारांच्या आवाजाचे सॅम्पल घेतले जातील

## कोणी कितीही मोठा असला तरी कारवाई होणार" पालकमंत्री जयकुमार गोरे




**सोलापूर : (स. गांवकरी)**

खासदारांच्या आवाजाचे सॅम्पल घेतले जातील; आणि कोणी कितीही मोठा असला तरी त्यांच्यावर कारवाई होईल"असे ठाम मत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी बोलून दाखवले.

खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या कथित व्हायरल कॉल रेकॉर्डिंग प्रकरणावर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुन्हा एकदा भाष्य करत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल, असे स्पष्ट केले. आवश्यक वाटल्यास खासदारांच्या आवाजाचे नमुने (व्हॉइस सॅम्पल) देखील घेतले जातील. तसेच, "कोणी कितीही मोठा असला तरी चौकशी करून दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल," असा इशाराही त्यांनी दिला.

पत्रकारांशी संवाद साधताना जयकुमार गोरे म्हणाले की, संबंधित कॉल कोणाच्या फोनवरून आला, त्यामध्ये कोणती छेडछाड झाली आहे का, याची सखोल तपासणी केली जाईल. सध्या पोलिसांकडे अत्याधुनिक सायबर यंत्रणा उपलब्ध असून, तांत्रिकदृष्ट्या संपूर्ण प्रकरणाची पडताळणी केली जाईल.

दरम्यान, खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि पंचायत समितीतील एका अधिकाऱ्यामधील कथित संभाषणाची ऑडिओ क्लिप काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना खासदार मोहिते पाटील यांनी तंत्रज्ञानाचा वापर करून ही ऑडिओ क्लिप तयार करण्यात आल्याचा दावा केला होता. याच दाव्यावर प्रतिक्रिया देताना पालकमंत्री गोरे म्हणाले की, तपासात सत्य समोर येईल. "जो दोषी नाही, त्याने स्पष्टीकरण देण्याची गरज नाही. मात्र, कोणीही कायद्यापेक्षा मोठा नाही. चौकशीअंती जे सत्य असेल त्यानुसार कारवाई केली जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले.



**शहापूर (प्रतिनिधी) :** NEET परीक्षेतील कथित गैरव्यवहार, विद्यार्थ्यांवरील अन्याय तसेच आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा, या मागण्यांसाठी समाजसेवक सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाला शहापूर तालुक्यातील पत्रकारांनी जाहीर पाठिंबा दर्शविला. या आंदोलनाला पाठिंबा दर्शवित पत्रकारांनी शहापूर तहसीलदार यांना निवेदन सादर करून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी केली.

## थोडक्यात बातम्या...



### भीषण अपघात; रुग्णाला घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेच्या चालकाचा मृत्यू

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील अहिल्यानगर कल्याण महामार्गावरील गायमुखवाडी येथे शुक्रवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात रुग्णाला उपचारासाठी आळेफाटा येथे घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिका चालकाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ओतूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुणाल तुकाराम डुंबरे (वय ३१, रा. डुंबरवाडी, ता. जुन्नर) हे रुग्णवाहिका (एमएच १४ एलबी ४३२९) चालवत खामुंडी येथील अपघातातील जखमी रुग्णाला आळेफाटा येथे उपचारासाठी घेऊन जात होते. रात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास गायमुखवाडी गावच्या हद्दीतील स्पीड ब्रेकरजवळ समोरून येणाऱ्या पिकअप (एमएच २४ बीडब्ल्यू २०९२) ने रुग्णवाहिकेला जोरदार धडक दिली. या अपघातात रुग्णवाहिका चालक कुणाल डुंबरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. अपघातात रुग्णवाहिकेचेही मोठे नुकसान झाले. याप्रकरणी शेखर तुकाराम डुंबरे (वय ३५, रा. डुंबरवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ओतूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिकअप चालक नीलकंठ फुलचंद गव्हाणे (रा. शिराळा, जि. लातूर) याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अपघातातील वाहने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. पोलिसांनी पिकअप चालकाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. पुढील तपास ओतूर पोलिस करीत आहेत.

### सायबर गुन्हेगारीबाबत पडघा पोलिसांची विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

भिवंडी (स. गांवकरी) : वाढत्या डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून इंटरनेट व सोशल मीडियाचा वापर करताना विद्यार्थ्यांनी अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर भिवंडी तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्याच्या वतीने पडघा येथिल आर. के. पालवी विद्यामंदिर इंग्रजी शाळेत विद्यार्थ्यांसाठी सायबर गुन्हेगारी जनजागृती व सायबर सुरक्षितता मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी तसेच पोलीस उपनिरीक्षक अनवर शेख यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, बनावट लिंक, ओटीपी फसवणूक, सायबर आर्थिक गुन्हे तसेच डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

## महाकवी कालिदास दिन साजरा; नरेंद्र पवार यांची उपस्थिती

**कल्याण : (स. गांवकरी)**



कल्याण शहरातील कल्याण (पश्चिम) येथील शारदा मंदिर संस्थेच्या शारदा मंदिर हायस्कूलमध्ये आषाढ शुद्ध प्रतिपदा या निमित्ताने नुकतच या शाळेच्या सभागृहात 'कालिदास दिन' अत्यंत उत्साहात आणि साहित्यिक वातावरणात साजरा करण्यात आला. संस्कृत साहित्याचे महाकवी कालिदास यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षणीय होता.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कल्याणचे माजी आमदार नरेंद्र पवार उपस्थित होते. तसेच शारदा मंदिर संस्थेचे कार्यकारिणी सदस्य आर.डी. पाटील हे देखील याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वतीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी महाकवी कालिदास यांच्या साहित्यावर आधारित नाटक सादरीकरण केले. या प्रसंगी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला "कालिदास हे केवळ संस्कृतचे कवी नव्हते, तर ते भारतीय संस्कृतीचे वाहक होते. त्यांच्या साहित्यातील मानवी मूल्यांचा अभ्यास करणे, हे आजच्या काळातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे." तसेच आपण आपली मराठी भाषा जपली पाहिजे हा विचार त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात या निमित्ताने बिंबवला

संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, माजी मुख्याध्यापक आर. डी. पाटील सर यांनी आपल्या मार्गदर्शनातून कालिदासांच्या 'मेघदूत' आणि 'अभिज्ञान शाकुंतल' यांसारख्या कालजयी कृतींचा गौरव केला आणि विद्यार्थ्यांना वाचनाची आवड जोपासण्याचे आवाहन केले. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली देशमुख यांनी विद्यार्थ्यांना कालिदासाची एक सुंदर गोष्ट सांगितली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षिका अपर्णा कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन शिक्षक भाग्यश्री ठाकूर, इंदुमती घाणे, पंढरीनाथ रोकडे व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी प्रतिनिधींनी केले होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उपस्थित मान्यवर आणि पालकांनी विशेष कौतुक केले. यावेळी घेतलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

## अतिवेगवान गती : सॅमसंगची नवीन ९९० एसएसडी भारतात

**पुणे : (स. गांवकरी)**

- अधिक ऊर्जा-बचत आणि दमदार कार्यक्षमतेची मेजवानी

संगणकाची कार्यक्षमता वाढवू इच्छिणाऱ्या गेमर्स, कंटेंट निर्माते आणि उच्च क्षमतेच्या स्टोरेजची गरज असलेल्या वापरकर्त्यांसाठी सॅमसंग इंडियाने नवीन सॅमसंग ९९० एसएसडी भारतात सादर केली आहे. ही नवीन स्टोरेज ड्राइव्ह १ टेराबाइट आणि २ टेराबाइट या दोन क्षमतांमध्ये उपलब्ध होणार असून अतिवेगवान माहिती वाचन-लेखन, कमी वीज वापर आणि विश्वासार्ह कामगिरी ही तिची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. नवीन ९९० एसएसडीमध्ये आधुनिक पीसीआय एक्सप्रेस ४.० तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक नँड मेमरीचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे मोठ्या आकाराच्या फाईल्सचे हस्तांतरण, उच्च दर्जाचे व्हिडीओ संपादन, प्रगत खेळांचा अनुभव आणि दैनंदिन संगणकीय कामे अधिक जलद आणि सुरळीत होतात. सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सच्या मेमरी ब्रँड उत्पादन विभागाचे उपाध्यक्ष टॉमी (ह्योंगसुक) क्वोन यांनी सांगितले की, वाढत्या स्टोरेज गरजा, जड कामाचा ताण, उच्च दर्जाचे खेळ आणि स्वतःचा संगणक तयार करणाऱ्या वापरकर्त्यांसाठी सॅमसंग ९९० एसएसडी हा अत्यंत उपयुक्त पर्याय ठरेल. २ टेराबाइट क्षमतेच्या मॉडेलमध्ये प्रति सेकंद ७,२५० मेगाबाइट इतका माहिती वाचनाचा वेग मिळतो, तर १ टेराबाइट मॉडेलमध्ये हा वेग ७,१५० मेगाबाइट प्रति सेकंद इतका आहे. दोन्ही मॉडेलमध्ये प्रति सेकंद ६,४५० मेगाबाइट इतका माहिती लेखनाचा वेग उपलब्ध असल्याने मोठ्या फाईल्स काही क्षणांत हस्तांतरित होतात आणि विविध अनुप्रयोग तसेच खेळांचे लोडिंग अधिक वेगाने पूर्ण होते.

## ६५० किलो गोवंशाचे मांस जप्त

**ओतूर : (स. गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील पोलिसांनी गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई करत ६५० किलो गोवंशाचे मांस व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली इको कार असा एकूण ३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ जुलै रोजी पहाटे १.२४ वाजण्याच्या सुमारास अहिल्यानगर-कल्याण महामार्गावरील डिंगोरे (ता. जुन्नर) गावाजवळील बसथांब्याजवळ संशयास्पदरीत्या उभ्या असलेल्या मारुती सुझुकी (क्रमांक एमएच ०२, ईसी ०७५६) वाहनाची माहिती पोलिस मित्र रविराज देवानंद चाळक यांनी रात्रगस्तीवरील पोलिस हवालदार सुरेश गेंगजे यांना दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये २४ बेकायदेशीररीत्या कत्तल केलेल्या गोवंशाचे मुंडके व मांस आढळून आले. वाहनातील मांसाचे वजन केले असता ६५० किलो गोवंशाचे मांस मिळून आले. त्याची किंमत १ लाख ३० हजार रुपये असून वाहनासह एकूण ३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी वाहन चालक इरफान गणी शेख (रा. दरोडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. तसेच वाहन मालक युसुफ इक्बाल शेख (रा. आळकुटी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पालकांनी स्वतःची जबाबदारी ओळखावी : डुंबरे

**ओतूर : (स. गांवकरी)**



जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्राम विकास मंडळ संचलित चैतन्य विद्यालयात दिनांक १४ जुलै ते १६ जुलै दरम्यान इयत्ता पाचवी ते दहावीच्या पालकांची सहविचार सभा आयोजित केली होती. या सहविचार सभा विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर व उपमुख्याध्यापक संजय हिरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाल्याची माहिती शिक्षक पालक संघाचे सचिव अजित डांगे यांनी दिली.

या सहविचार सभेत उपस्थित पालकांना शालेय शिस्त,संस्कार, विद्यार्थ्यांचा आहार, आरोग्याबाबत घ्यावयाची काळजी, अभ्यासाचे व वेळेचे नियोजन, विविध स्पर्धा परीक्षा, शालेय उपक्रम, व्यायाम, पालकांची पाल्याच्या प्रती असलेली जबाबदारी, विद्यार्थी सुरक्षा अशा अनेक विषयांवर विद्यालयातील प्रदीप गाढवे, पंकज घोलप, भाऊसाहेब खाडे, संतोष कांबळे, विशाल चौधरी, अमित झरेकर, शिल्पा भालेराव, सोनाली कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

पालकांच्या वतीने ह.भ. प. गंगाराम महाराज डुंबरे, संतोष ठिकेकर, विलास सुतार, भास्कर डुंबरे, सचिन ओतूरकर, पूजा घोलप, अश्विनी गोरे, रोशनी ढमाले, गणेश डुंबरे, बंडू बोऱ्हाडे, सुरेश महाले, स्वाती गायकर यांनी आपली मनोगते व्यक्त केली. मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, मुलांना परिस्थितीची जाणीव करून देणे, बदलत्या अभ्यासक्रमाचे पालकांना सुद्धा प्रशिक्षण मिळायला हवे, पाल्याची सर्व जबाबदारी शिक्षकांवर न देता पालकांनी आपली जबाबदारी विसरता कामा नये, पाल्याशी संवाद साधा, दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी उपाय योजना हवी, विद्यार्थ्यांना संघर्ष करू द्या, विद्यालय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी चांगल्या प्रकारचे उपक्रम व दर्जेदार शिक्षण देत आहे. त्याबद्दल सर्व पालकांच्या वतीने सर्व शिक्षकांचे कौतूक करावे तेवढे कमी आहे. या पालक सभेत विद्यालयातील भौतिक सुविधांसाठी ठिकेकर वाडीचे आदर्श सरपंच संतोष ठिकेकर यांनी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत दिली व उपस्थित सर्व पालकांना मदत करण्याचे आवाहन केले.

यावेळी जिल्हा शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत आलेले स्वराज गायकर व विराज क्षीरसागर या विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार करण्यात आला. या सहविचार सभा संपन्न होण्यासाठी राजाराम शिंदे, संतोष सोनवणे, प्रमोद जाधव, वनिता भोर, आसावरी गायकर, रसिका शेळके, सरस्वती भताने, दिनेश ताठे, ईश्वर ढमाले, अरविंद आंबरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच या सभेस बहुसंख्येने पालक उपस्थित होते.

# वीस वर्षांपासून लाखो वृद्धांना दृष्टीदान

## माय माऊली केअर सेंटरच्या सेवाकार्याचे डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून कौतुक!

- वीस वर्षांपासून लाखो वृद्धांना दृष्टीदान
- माय माऊली केअर सेंटरच्या सेवाकार्याला मान्यवरांची सलामी!

**(स. गांवकरी)**





समाजातील गरजू, निराधार व ज्येष्ठ नागरिकांना मोफत नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याचे गेल्या वीस वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेले कार्य म्हणजे पुणे शहरातील माय माऊली केअर सेंटर होय. सेवाभावी वृत्ती, आधुनिक उपचार पद्धती आणि रुग्णांप्रती असलेली आत्मीयता यामुळे या संस्थेने लाखो वृद्धांना पुन्हा दृष्टी मिळवून देण्याचा मान मिळवला आहे. या उल्लेखनीय सेवाकार्याची ग्रेनीज बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद होणे ही संस्थेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या सेवाकार्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी माय माऊली केअर सेंटरला सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेच्या विविध विभागांची पाहणी करून तेथील रुग्णांशी संवाद साधण्यात आला. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या मोफत उपचारांची तसेच संस्थेच्या व्यवस्थापनाची माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव वरुडे पाटील यांनी मान्यवरांना दिली. यावेळी बोलताना डॉ. वरुडे पाटील यांनी सांगितले की, गेल्या दोन दशकांपासून आर्थिकदृष्ट्या दुर्बल, निराधार आणि ग्रामीण भागातील वृद्धांना मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. या सेवेमुळे लाखो ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात पुन्हा प्रकाश आला असून, आजही हे कार्य अधिक व्यापक स्वरूपात सुरू आहे. दर आठवड्याला सुमारे २०० ते ३०० वृद्धांची मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया करण्यात येते. कोणताही आर्थिक मोबदला न घेता केवळ समाजसेवेच्या भावनेतून हा उपक्रम राबविला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थेच्या या सेवाभावी कार्याचे कौतुक करताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, समाजात आरोग्यसेवा ही प्रत्येकापर्यंत पोहोचली पाहिजे. माय माऊली केअर सेंटरने गेल्या वीस वर्षांत उभारलेले कार्य हे अनेक सेवाभावी संस्थांसाठी प्रेरणादायी आहे. हजारो नव्हे तर लाखो वृद्धांना दृष्टीदान करून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणारे हे कार्य खऱ्या अर्थाने मानवसेवेचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी गौरवोद्गार काढले.

या प्रसंगी माय माऊली केअर सेंटरचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव वरुडे पाटील यांच्या हस्ते डॉ. विश्वासराव आरोटे यांचा शाल, मोत्याची माळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच मान्यवरांनी संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत सामाजिक आरोग्यसेवेतील योगदानाबद्दल संस्थेचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमास आळंदी नगरपरिषदेचे नगरसेवक मनोहर दिवाणे, नगरसेवक संतोष रायकर, सामाजिक कार्यकर्ते कांतीराम बोराडे, संजय फुलसुंदर, राजेंद्र पांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी माय माऊली केअर सेंटरच्या सेवाभावी कार्याला अधिकाधिक बळ मिळावे, तसेच समाजातील गरजू नागरिकांना अशाच प्रकारे मोफत आरोग्यसेवा मिळत राहावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### पावसाची कृपा - सापुताऱ्यात दाट धुक्यात पर्यटकांची मजा

डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यात पावसाने काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा एकदा रिमझिम पावसाला सुरुवात झाली असून संपूर्ण जिल्ह्यात आल्हाददायक वातावरण निर्माण झाले आहे. विविध भागांत दिवसभर हलक्या सरी कोसळत असल्याने वातावरणात गारवा पसरला आहे. गुजरातचे प्रसिद्ध पर्यटनस्थळ सापुतारा येथे दाट धुके पसरल्यामुळे दृश्यमानता कमी झाली होती. त्यामुळे वाहनचालकांना हेडलाईट आणि इंडिकेटर सुरू ठेवून सावधगिरीने वाहने चालवावी लागली. पाऊस आणि धुक्याच्या नयनरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी आलेल्या पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. सापुतारा, शामगहान, बोरखल, गलकुंड, आहवा, लवचाली, सुबीर, सिंगाणा, बर्डीपाडा, कालीबेल, भेन्सकातरी, झावडा, वघई, साकरपातळ, चिंचली, गारखडी, पिपलाईदेवी तसेच पूर्व पट्टा आणि सीमावर्ती भागात शुक्रवारी दिवसभर रिमझिम पावसाची नोंद झाली.दरम्यान, पावसामुळे शेतीच्या कामांनाही वेग आला आहे. शेतांमध्ये पुरेसा ओलावा निर्माण झाल्याने डांग जिल्ह्यातील शेतकरी भाताच्या लागवडीच्या कामात व्यस्त झाले असून, यंदाच्या खरीप हंगामाबाबत आशादायक चित्र निर्माण झाले आहे.



### पंचवटीमध्ये रंगला जगन्नाथ रथ यात्रा उत्सव सोहळा

नाशिक (स. गांवकरी) : पंचवटी परिसरातील पंचमुखी हनुमान मंदिर परिसरात भगवान श्री जगन्नाथ रथयात्रेत 'जय जगन्नाथ'चा जयघोष करण्यात आला. पंचवटीतील श्री जगन्नाथपुरी रथयात्रा उत्सव समिती ट्रस्टतर्फे आयोजित भगवान श्री जगन्नाथ, बलभद्र आणि सुभद्रा माता यांच्या पारंपरिक रथयात्रेला पंचमुखी हनुमान मंदिर परिसरातून गुरूवारी (दि.१६) सकाळी प्रारंभ झाला. तत्पूर्वी सकाळी ८ वाजता मूर्तींना विधीवत अभिषेकानंतर तुळशी अर्चना करून खिचडी, दालमा व फळांचा नैवेद्य दाखवण्यात आला. नागपूरच्या भोसले घराण्याचे युवराज राजे जयसिंह मुधोजी भोसले यांच्या हस्ते महाआरती पार पडली. धार्मिक परंपरेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भाविकांना ७०० तुळशीची रोपटे आणि १ हजार कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. ५ तास चाललेल्या या यात्रेत १० हजार भाविक सहभागी झाले. महापौर हिमगौरी आडके, मनपा आयुक्त मनीषा खत्री, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, बाळासाहेब सानप, स्वामी सरस्वतीनंद महाराज, छावा भारत क्रांती मिशन चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलास पांगारकर, रामसिंग बावरी, रथयाचा उत्सव समिती अध्यक्ष नागेश चव्हाण, नरहरी उगलमुगले , पत्रकार अमोल सोनवणे उपस्थित आदी सह साधू महंत जगन्नाथ भक्त व नाशिककर मोठ्या सख्येने होते. भोसले घराण्याचा ऐतिहासिक वारसा १७५१ मध्ये रघुजी राजे भोसले यांनी बंगाल आणि ओरिसावर केलेल्या स्वारीनंतर तेथील मंदिराचा ताबा घेतला होता. त्यावेळी त्यांनी २२ धर्मशाळा बांधल्या, रस्ते व पूल उभारले. अन्नछत्रासाठी ४० लाखांचे दान दिले होते. या परंपरेचे स्मरण म्हणून यंदा नागपूरकर भोसले घराण्याचे युवराज जयसिंह राजे भोसले याच्या हस्ते रथाची आरती करण्यात आली. पारंपारिक परंपरेनुसार सर्वप्रथम झाडू मारत रथयात्रा सुरुवात करण्यात आली.

### नागरिकांनी एक झाड लावून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करू



शिवनेरी (स. गांवकरी) : किल्ले शिवनेरी च्या पायथ्याशी वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ॥ -- -- संत तुकाराम महाराज या अभंगाप्रमाणे जुन्नर एसटी स्टँड येथे नागरिकांनी एक झाड लावून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करूया असे सहाय्यक वाहतूक अधीक्षक उत्तम लांडे यांनी वृक्षारोपण करताना सांगितले . एसटी च्या ७८ व्या वर्धापन दिनाच्या औचित्य साधून एसटी महामंडळामार्फत वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आला असे वाहतूक नियंत्रक अमित खेडकर यांनी सांगितले. पंचायत समिती सभापती शेळकंदे , नगरसेवक आणि रोकडे समाजसेवक विश्वास ढोबळे यांनी वृक्षारोपण व स्वच्छता सुशोभीकरण याबाबत सहकार्य करणार असे याप्रसंगी सांगितले .वाहतूक नियंत्रक साबळे, वाहतूक नियंत्रक गाढवे , नागरिक व पोलीस पाटील उपस्थित होते.

# इंद्रायणीच्या महापुरात केंद्रे महाराज संस्थेचे लाखो रुपयांचे नुकसान

## नानजीभाई ठक्कर यांच्याकडून पाहणी, तातडीच्या नुकसान भरपाईची मागणी

आळंदी : (स. गांवकरी)



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील सर्वात मोठी आणि प्रतिष्ठेची मानली जाणारी 'दिंडी क्रमांक ४३' अर्थात श्री गोविंद महाराज केंद्रे संस्थेला ६ जुलै रोजी इंद्रायणी नदीला आलेल्या भीषण महापुराचा मोठा फटका बसला आहे. पुराचे पाणी संस्थेच्या इमारतीत आणि परिसरात घुसल्याने अन्नधान्य, रोख रक्कम, वाहने आदी मिळून लाखो रुपयांचे अतोनात नुकसान झाले आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष भूमिदता नानजीभाई ठक्कर यांनी नुकतीच या नुकसानग्रस्त परिसराची पाहणी केली असून, प्रशासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. या पाहणी दौऱ्यावेळी त्यांच्यासोबत 'दैनिक समर्थ गावकरी'चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे आणि माजी नगरसेवक मनोहर दिवाणे, नगरसेवक संतोष रायकर विश्वस्त दशरथ कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते. पाहणीनंतर कार्याध्यक्ष भूमिदाता ठक्कर यांनी आळंदी नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माधव खांडेकर यांच्याशी दूरध्वनीवरून थेट संवाद साधला आणि संस्थेवर ओढवलेल्या या नैसर्गिक आपत्तीची माहिती देत प्रशासनाने लवकरात लवकर जास्तीत जास्त नुकसान भरपाई मंजूर करावी, अशी आग्रही विनंती केली. संस्थेने प्रशासनाला दिलेल्या अधिकृत पत्रात आणि पंचनाम्याच्या अर्जात नुकसानीचा धक्कादायक तपशील दिला आहे. यामध्ये आगामी वारीसाठी सुमारे ६,००० वारकरी आणि भाविकांच्या २० दिवसांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये ७ लाख ६६ हजार ३९३ रुपये किमतीचा किराणा, १.५ टन गहू, २.५ टन तांदूळ, १.५ टन साखर, १ टन ज्वारी आणि तेल-तुपासह इतर साहित्य पुराच्या पाण्यात पूर्णपणे वाहून गेले.यासोबतच पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे मंदिराचे कंपाऊंड खचून मोठे स्ट्रक्चरल नुकसान झाले आहे. बाहेरील किचनशेड बुडाल्यामुळे गॅस शेगडी, फ्रिज, भांडी, साऊंड सिस्टिम, तसेच टाळ, पखवाज, मृदंग, वीणा आदी धार्मिक वाद्यांचे आणि ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथांचे मोठे नुकसान झाले आहे.

तर पिण्याच्या पाण्याची बोअरवेल चिखल व गाळाने पूर्णपणे बुजून निकामी झाली असून, १,००० लिटरच्या दोन पाण्याच्या टाक्या पुराच्या प्रवाहात वाहून गेल्या आहेत. मुख्य कार्यालयातील सर्व शासकीय कागदपत्रे, हिशेबाच्या फायली, पावती पुस्तके आणि संगणकासह फर्निचर गाळाने माखले आहे. तसेच, देणगी स्वरूपातील सुमारे ३ लाख ४० हजार रुपयांची रोख रक्कम पुराच्या पाण्यात वाहून गेली आहे.

पार्किंगमध्ये उभी असलेली संस्थेची बोलेरो गाडी (MH 38. 4343) पुराच्या पाण्यामुळे पूर्णपणे निकामी झाली आहे.

श्री गोविंद महाराज केंद्रे संस्था ही वारकरी संप्रदायात अविरतपणे सेवाभावी आणि धार्मिक कार्य करणारी अग्रणी संस्था आहे. अचानक आलेल्या या अस्मानी संकटामुळे संस्थेचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले असून, वारीचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. या भीषण संकटातून सावरण्यासाठी प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने शासकीय मदत द्यावी, अशी मागणी नानजीभाई ठक्कर व संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

नाशिक : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिवस त्याचबरोबर माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या पहिल्या जयंतीचे औचित्य साधून, राज्यातील सर्व मतदारसंघात महसूल विभागांअतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे अनुषंगाने नाशिक मधील देवळाली मतदारसंघात दि. २२ जुलै रोजी दाते लॉन्स, महिरावणी, त्र्यंबक रोड येथे सकाळी 10 वाजता आयोजन करण्यात आले आहे. महसूल विभागातील लोकाभिमुक पारदर्शक व गतिमान करण्यासाठी शासनाने विविध घेतलेल्या निर्णयाचे लाभ व ९ जुलै २०२६ च्या शासन निर्णयाचा लाभ तळागाळातल्या शेवटच्या माणसापर्यंत, शेतकऱ्यापर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्र शासन व प्रशासन प्रयत्न करत आहे. सदर कार्यक्रम देवळाली मतदार संघाच्या आमदार सरोजताई आहिरे यांच्या अध्यक्षतेखाली व नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांच्या प्रमुख उपस्थित होणार असून या कार्यक्रमासाठी नाशिक जिल्ह्याचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, हे देखील उपस्थित राहणार आहेत. तसेच सहा जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, यांचे मार्गदर्शनाखाली व तहसीलदार पंकजकुमार पवार हे तालुक्याचे नोडल तर नायब तहसीलदार सुनीता पाटील या समन्वयक म्हणून अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. त्याचबरोबर इतर सर्व शासकीय विभागाशी समन्वयक साधणार आहे. त्याचबरोबर सदर शिबिर यशस्वी होण्यासाठी गट विकास अधिकारी कारवाळ, उप भूमी अभिलेख प्रशांत अडांगळे, तसेच तालुका कृषी अधिकारी तुंबारे, व सब नाशिक प्रमोद वामन हे सूक्ष्म नियोजन करत आहेत.

## कालव्याचे बेकायदेशीर खोदकाम!

- ओतूर ग्रामपंचायतीला नोटीस, शेतकऱ्यांची कठोर कारवाईची मागणी

जुन्नर : (स. गांवकरी)

पिंपळगाव जोगा धरणाच्या डाव्या कालव्यामध्ये विनापरवानगी खोदकाम करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आल्यानंतर पाटबंधारे विभागाने ओतूर ग्रामपंचायतीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधितांवर केवळ नोटीस देण्याऐवजी कठोर दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



जुन्नर तालुक्यात काही दिवसांपूर्वी सलग दोन ते तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे परिसरातील पाणी कालव्यात खोदकाम करून सोडण्यात आले. अशा परिस्थितीत कालव्यामध्ये कोणत्याही प्रकारचे विनापरवानगी खोदकाम करणे किंवा पाईप टाकणे अत्यंत धोकादायक मानले जाते.

तज्ज्ञांच्या मते, कालव्यामध्ये अशा प्रकारचे अनधिकृत काम झाल्यास पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे निर्माण होऊ शकतात. परिणामी कालव्याच्या संरचनेवर ताण येऊन भविष्यात कालवा फुटण्यासारख्या गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यापूर्वीही पिंपळगाव जोगा परिसरात कालवा फुटल्याची मोठी दुर्घटना घडली होती. त्या घटनेत शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली होती. उभी पिके, शेतीची माती आणि सिंचन व्यवस्था यांचे मोठे नुकसान झाले होते. त्या दुर्घटनेच्या आठवणी अद्याप ताज्या असताना पुन्हा अशा प्रकारचे विनापरवानगी खोदकाम झाल्याने शेतकऱ्यांमध्ये भीती आणि नाराजी वाढली आहे.

दरम्यान, पाटबंधारे विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत ओतूर ग्रामपंचायतीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. संबंधित काम कोणाच्या परवानगीने करण्यात आले, त्यासाठी विभागाची मंजुरी घेण्यात आली होती का, तसेच नियमांचे पालन करण्यात आले होते का, याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले असल्याची माहिती मिळत आहे.

मात्र, केवळ नोटीस देऊन हा विषय संपवू नये, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. या प्रकरणातील दोषी अधिकारी, कर्मचारी किंवा संबंधित व्यक्तींवर सिंचन कायद्याअंतर्गत कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच ओतूर पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी संतप्त शेतकरी करीत आहेत.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, कालव्यासारख्या संवेदनशील सार्वजनिक मालमत्तेवर विनापरवानगी हस्तक्षेप करणे हा अत्यंत गंभीर प्रकार असून, अशा घटनांकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात मोठी जीवित व वित्तहानी होऊ शकते. त्यामुळे जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे.आता या नोटीसीनंतर ओतूर ग्रामपंचायतीकडून काय स्पष्टीकरण दिले जाते आणि पाटबंधारे विभाग पुढे कोणती भूमिका घेतो, याकडे परिसरातील शेतकरी व नागरिकांचे लक्ष लागले आहे. जर या प्रकरणात ठोस कारवाई झाली नाही, तर भविष्यात उद्भवणाऱ्या कोणत्याही गंभीर परिणामांची जबाबदारी संबंधित यंत्रणेवर राहील, अशी तीव्र भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

## "कळवण शहराच्या विकासाला गती साडेआठ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन, बदलत्या कळवणचे नव्हे पर्व



नाशिक (कळवण) : (स. गांवकरी)

कळवण शहराच्या विकासाला गती आमदार नितीन पवार यांच्या हस्ते शुक्रवार,17 जुलै 2026 रोजी 5 वाजता संपन्न नगरपंचायतीच्या हद्दीतील विविध भागातील विकासकामांचा भव्य भूमिपूजन सोहळा संपन्न . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष मा. कौतिक (महाराज) पगार हे होते. यावेळी उपनगराध्यक्ष, नगरसेवक नगरसेविका, मुख्याधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, कळवण शहरातील लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कळवण शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणारी अनेक पायाभूत विकासकामे या माध्यमातून सुरू होत आहेत. शहरातील सांडपाण्याचा कायमस्वरूपी प्रश्न सोडविण्यासाठी आधुनिक भूमिगत गटार व्यवस्था, विविध भागांतील काँक्रीट रस्ते, रस्त्यालगत पथदिवे, तसेच इतर नागरी सुविधा उभारण्याच्या कामांना यावेळी प्रारंभ करण्यात आला.

नगराध्यक्ष कौतिक (महाराज) पगार यांच्या नेतृत्वाखाली नगरपंचायतीने शहराच्या विकासासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांचे हे फलित असल्याचे आमदार नितीन पवार यांनी सांगितले, . "विकास म्हणजे केवळ घोषणा नव्हे, तर नागरिकांच्या जीवनात प्रत्यक्ष बदल घडविणारी कृती," हे या कामांमधून स्पष्ट होत असल्याचे अनेक मान्यवरांनी सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्था आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयामुळे विकासकामांना गती मिळत असून, कळवण शहर आधुनिक आणि नागरिकाभिमुख शहर म्हणून पुढे वाटचाल करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

> आमदार नितीनभाऊ पवार यांनीही कळवण शहरासाठी मोठ्या प्रमाणात विकासनिधी उपलब्ध करून देत नगरपंचायतीच्या विकास आराखड्याला भक्कम पाठबळ दिले आहे. - **नगराध्यक्ष कौतिक महाराज पगार कळवण**

भूमिपूजन सोहळ्यावेळी उपस्थित मान्यवरांनी नगरपंचायतीच्या कार्याचे कौतुक केले. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित, प्रकाशमान आणि मूलभूत सुविधांनी परिपूर्ण शहर देण्याचा नगरपंचायतीचा संकल्प या विकासकामांतून अधिक बळकट होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आज सुरू झालेली ही विकासकामे केवळ विटा, सिमेंट आणि लोखंडाची उभारणी नसून, ती कळवणच्या उज्वल भविष्यासाठी उभारला जाणारा विकासाचा मजबूत पाया आहे.

## इमर्जन्सी लोड सेटिंगमुळे मळ्यातील शेतकरी अंधारात

- महावितरणच्या निर्णयाविरोधात संताप
- लोकप्रतिनिधींनी हस्तक्षेप करण्याची कळवण तालुक्यातील नागरिकांची मागणी

कळवण : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यासह ग्रामीण भागातील कुंडाणे ओ सिरसमणी, जिरवाडे,भुसणी,नरुळ ओतूर,मेहदर,वडाळे,मुळाणे , आदी गावांतील मळ्यातील राहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये महावितरण कंपनीच्या इमर्जन्सी लोड सेटिंगच्या धोरणाबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी शेतातील घरांसाठी नियमानुसार स्वतंत्र वीजमीटर घेतले असूनही इमर्जन्सी लोड सेटिंगमुळे रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. त्यामुळे शेतकरी कुटुंबांचे दैनंदिन जीवन अक्षरशः अंधारात जात असल्याचे चित्र आहे. दिवसभर शेतात कष्ट करून सायंकाळी घरी परतणाऱ्या शेतकऱ्यांना स्वयंपाक, जेवण आणि इतर आवश्यक कामे अंधारात करावी लागत असल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे मळ्यातील घरांमध्ये लहान मुले, वृद्ध आई-वडील आणि महिला राहत असल्याने रात्री वीज नसणे ही केवळ गैरसोय नसून गंभीर सुरक्षेची बाब असल्याचेही मत व्यक्त होत आहे. शेतातील गोठ्यांमध्ये जनावरांना चारा-पाणी देणे, दूध काढणे, जनावरांची देखभाल करणे ही सर्व कामे रात्रीच्या वेळी करावी लागतात. मात्र वीज नसल्याने ही कामे धोकादायक ठरत आहेत. ग्रामीण भागात साप, विंचू, बिबट्या तसेच इतर वन्यप्राण्यांचा वावर वाढला असून अंधारामुळे जीविताला धोका निर्माण होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

# निसर्गकवितेचा अजरामर स्वर - ना. धों. महानोर

(स. गांवकरी)

प्रत्येक माणसाची नाळ निसर्गाशी घट्ट जोडलेली असते. निसर्ग हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. तो डोळ्यांना आनंद, मनाला प्रसन्नता आणि जीवनाला नवचैतन्य देतो. निसर्गातील प्रत्येक रंग, सुगंध, ऋतू आणि स्पंदन आपल्या शब्दांतून जिवंत करणारे, रानाला कवितेतून फुलविणारे आणि ग्रामीण जीवनाला मराठी साहित्यविश्वात अजरामर स्थान मिळवून देणारे ज्येष्ठ कवी म्हणजे ना. धों. महानोर. त्यांच्या लेखणीतून निसर्गाला शब्दांचे अद्वितीय सौंदर्य लाभले. शेती, माती, पाऊस, शेतकरी, ग्रामीण संस्कृती आणि मानवी भावविश्व यांचे त्यांनी अत्यंत प्रभावी चित्रण केले. त्यामुळे त्यांना मराठी साहित्यविश्वात 'रानकवी' म्हणून मानाचे स्थान प्राप्त झाले. सन १९७७



मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जैत रे जैत' या चित्रपटाने मराठी चित्रपटसृष्टीत इतिहास घडविला. या चित्रपटातील 'नभ उतरू आलं', 'मी रात टाकली', 'आम्ही ठाकर ठाकर', 'जांभूळ पिकल्या झाडाखाली' आणि 'डोंगर काठाडी ठाकरवाडी' यांसारखी गीते आजही रसिकांच्या मनात तितक्याच प्रेमाने जपली जातात. बालपण आणि शिक्षण : ना. धों. महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी जळगाव जिल्ह्यातील पळसखेड या गावातील एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांचे निसर्ग, शेती आणि ग्रामीण संस्कृतीशी अतूट नाते जुळले. त्यांचे प्राथमिक शिक्षण मूळ गावी झाले, तर माध्यमिक शिक्षण शेंदुर्णी येथे पूर्ण झाले. पळसखेड, पिंपळगाव आणि शेंदुर्णी येथील शाळांमध्ये त्यांनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर जळगाव येथील मूळजी जेठा महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेतला. मात्र, प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्यासाठी त्यांना महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडावे लागले. त्यानंतर त्यांनी शेतीची धुरा सांभाळत साहित्यसेवेला वाहून घेतले आणि आपल्या कष्ट, जिद्द व संवेदनशीलतेच्या बळावर मराठी साहित्यविश्वात स्वतंत्र स्थान निर्माण केले. रानकवी म्हणून ओळख : ना. धों. महानोर हे मराठी साहित्यातील श्रेष्ठ 'रानकवी' म्हणून ओळखले जातात. निसर्ग, शेती, माती, पाऊस, ऋतू, पक्षी आणि ग्रामीण जीवनाचे त्यांनी आपल्या कवितांमध्ये अत्यंत जिवंत आणि हृदयस्पर्शी चित्रण केले. त्यांच्या कविता वाचताना निसर्ग प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभा राहिल्याचा अनुभव येतो.

त्यांनी निसर्गाला केवळ कवितेचा विषय मानले नाही, तर तो माणसाचा जिवलग सखा आणि जीवनाचा अविभाज्य भाग असल्याचा विचार आपल्या लेखणीतून प्रभावीपणे मांडला. त्यांच्या कवितांनी असंख्य रसिकांना निसर्गावर प्रेम करायला शिकवले. चित्रपट गीतलेखनातील योगदान : ना. धों. महानोर यांनी अनेक गाजलेल्या मराठी चित्रपटांसाठी गीतलेखन केले. त्यांच्या शब्दांनी सजलेली गीते आजही रसिकांच्या ओठांवर तितक्याच प्रेमाने गुणगुणली जातात. जैत रे जैत, सर्जा, मुक्ता, अबोली, दोघी, एक होता विदूषक, अजिंठा, यशवंतराव चव्हाण – बखर एका वादळाची, मालक, उरूस आणि थांग या चित्रपटांमधील त्यांच्या गीतांनी मराठी चित्रपटसृष्टी समृद्ध केली. त्यांच्या गीतांनी चित्रपटांना केवळ लोकप्रियता मिळवून दिली नाही, तर मराठी संगीतविश्वाला अजरामर ठेवा दिला. दिग्गज गायक आणि संगीतकार : ना. धों. महानोर यांच्या गीतांना आशा भोसले, लता मंगेशकर, उषा मंगेशकर, सुरेश वाडकर, रवींद्र साठे, चंद्रकांत काळे, निशिकांत सादाफुळे, देवकी पंडित, शुभांगी केदार, अरुण इंगळे, मधुरी करमरकर आदी नामवंत गायकांनी स्वर दिले. तसेच पं. हृदयनाथ मंगेशकर, आनंद मोडक, अशोक पत्की, कौशल इनामदार, नंदू होनप यांसारख्या संगीतकारांनी त्यांच्या गीतांना अविस्मरणीय चाली दिल्या. शब्द, स्वर आणि संगीत यांचा अप्रतिम संगम साधल्यामुळे ही गीते मराठी संगीतविश्वात अजरामर ठरली. गाजलेली गीते : घन ओथंबून येती, चिंब पावसानं रान झालं आबादानी, मी काट्यातून चालून थकले, नभ उतरू आलं, मी रात टाकली, आम्ही ठाकर ठाकर, जांभूळ पिकल्या झाडाखाली, तुझ्या वाटेला ओले, गोऱ्या देहावरती, हा ढोलिया, डोंगर काठाडी ठाकरवाडी, असं एखादं पाखरू वेल्हाळ, अवेळीच केव्हा दाटला अंधार, आज उदास उदास दूर, किती जिवाला राखायचं, कुठे तुम्ही गेला हत्ता, कोण्या राजानं राजानं, गडद जांभळं भरलं आभाळ, गाव कोसळा पाण्यात, चांद केवड्याच्या रात, जाई-जुईचा गंध, जालिमंदी झोंबतोय गारवा, तुम्ही जाऊ नका हो रामा, त्या माझिया देशातले, दूरच्या रानात केळीच्या, पक्ष्यांचे लक्ष थवे, पीक करपलं, पुरबी सूर्य उडेला जी, बालगू कशाला व्यर्थ कुणाची, भर तारुण्याचा मळा यांसारख्या त्यांच्या असंख्य गीतांनी मराठी रसिकांच्या मनात कायमचे स्थान मिळवले आहे.

राजकीय आणि सामाजिक कार्य : ना. धों. महानोर यांची १९७८ मध्ये साहित्यिक व कलावंत प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्र विधान परिषदेवर नियुक्ती करण्यात आली. त्यांनी १९७८ ते १९८४ आणि १९९० ते १९९५ या दोन कार्यकाळांत विधान परिषद सदस्य म्हणून काम केले. या काळात त्यांनी साहित्याबरोबरच शेती, जलसंधारण, पाणी व्यवस्थापन, फळबाग विकास, ठिबक सिंचन आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठवला. त्यांच्या अनेक सूचना आणि प्रस्तावांना सभागृहाची मान्यता मिळाली.

मराठी साहित्याचा अमूल्य ठेवा: ना. धों. महानोर यांनी आपल्या कविता आणि गीतांच्या माध्यमातून मराठी साहित्याला अमूल्य योगदान दिले. निसर्गाची अद्वितीय देणगी, मातीचा सुगंध, ग्रामीण जीवनातील संघर्ष आणि मानवी संवेदना त्यांनी आपल्या लेखणीतून अत्यंत प्रभावीपणे शब्दबद्ध केल्या. त्यांच्या प्रत्येक कवितेत निसर्गावरील प्रेम, माणुसकी, ग्रामीण संस्कृती आणि जीवनाचे वास्तव प्रतिबिंबित होते. त्यामुळे त्यांच्या साहित्यामुळे निसर्ग आणि माणूस यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ झाले. सन २०२३ मध्ये वयाच्या ८१ व्या वर्षी या महान कवीची प्राणज्योत मालवली. मात्र, त्यांची कविता, गीते आणि साहित्यसंपदा आजही मराठी मनात जिवंत आहे. त्यांच्या शब्दांचा सुगंध, निसर्गावरील प्रेम आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. मराठी साहित्यविश्वात 'रानकवी' ना. धों. महानोर यांचे नाव अजरामर राहील.

**लेखक - मिलिंद सुरेश जाधव**
**पडघा, भिवंडी - ८६५५५६९४३६**

## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रशासन जीवितहानी होण्याची वाट पाहते का ? - अर्चना निलेश पाटील

ठाणे (स. गांवकरी) : दिवा प्रभागातील धोकादायक इमारतींच्या प्रश्नाकडे ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत नगरसेविका अर्चना निलेश पाटील यांनी महापालिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वारंवार लेखी व तोंडी सूचना देऊनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. नगरसेविका अर्चना पाटील यांनी ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समिती प्रशासनाकडे अनेक वेळा धोकादायक इमारतींबाबत तक्रारी करूनही प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे या इमारतींमध्ये राहणाऱ्या व सदर धोकादायक इमारतींच्या शेजारी राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः दिव्यातील तिरुपती बालाजी अपार्टमेंट (कोकणरत्न परिसर, साबे), सदगुरु आर्केड (साबे रोड) आणि एकवीरा अपार्टमेंट (वैभव ढाबा परिसर) या इमारती धोकादायक अवस्थेत असून सदर धोकादायक इमारतींमध्ये व शेजारी राहणाऱ्या नागरिकांचे प्रथम सुरक्षित ठिकाणी तात्पुरते स्थलांतर करण्यात यावे आणि त्यानंतर संबंधित इमारतींबाबत नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. ठाणे महापालिका प्रशासनाने या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष केल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरोधात ठाणे महापालिकेच्या महासभेत प्रश्न उपस्थित करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करणार असल्याचा इशारा नगरसेविका अर्चना निलेश पाटील यांनी दिला आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित अशा गंभीर प्रश्नांवर तातडीने निर्णय घेऊन संभाव्य दुर्घटना टाळावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून देखील होत आहे.

### कल्याण पंचायत समितीत घरकुल योजनेबाबत जनजागृतीचा अभाव




ठाणे (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने दि. १७ एप्रिल २०२६ रोजी राज्यातील सर्व पंचायत समिती कार्यालयांच्या आवारात घरकुल योजनांमधील अनियमितता, दलालगिरी व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जनजागृती फलक लावण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, कल्याण पंचायत समिती कार्यालयात अद्याप या आदेशाची अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विशाल शांताराम कुरकुटे यांनी केला आहे. यासंदर्भात विशाल कुरकुटे यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कल्याण यांना लेखी निवेदन सादर करून शासनाच्या निर्देशानुसार तात्काळ जनजागृती फलक उभारण्याची मागणी केली आहे. सदर निवेदनात नमूद केल्याप्रमाणे घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणालाही पैसे देऊ नयेत, दलालांपासून सावध राहावे तसेच तक्रारींसाठी संबंधित अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक स्पष्टपणे दर्शविण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच शासनाच्या आदेशाची त्वरित अंमलबजावणी करून करण्यात आलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती देण्याचीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनाची दखल घेत पंचायत समिती प्रशासन शासनाच्या निर्देशांची तातडीने अंमलबजावणी करते का ? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### श्री जे. आर. गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूलचे दैदिप्यमान यश



आळेफाटा (स. गांवकरी) : श्री जे.आर. गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, आळेफाटा येथील विद्यार्थ्यांनी मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आणि उत्कृष्ट शैक्षणिक परंपरेची पुन्हा एकदा साक्ष दिली. या परीक्षेसाठी शाळेतील ८५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी स्वराज डोंगरे, मनवा शेळके, स्वराज पाटील, सक्षम डोंगरे, सिद्धी गोडे आणि संजित सूर्यवंशी यांनी विशेष प्राविण्य मिळवून शाळेच्या यशात मोलाची भर घातली. तसेच ३० विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरावर, ४९ विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर आणि ६ विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर यश संपादन करून शाळेचा गौरव वाढविला. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक डॉ. प्रदीप गुंजाळ, सचिव डॉ. अनुजा गुंजाळ, जयहिंद नर्सिंग कॉलेजचे कार्यकारी अधिकारी ऋषिकेश खर्डे, विद्यालयाचे प्रशासक विठ्ठल म्हस्के तसेच प्राचार्या सौ. सोनल कानडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान कामगिरीमुळे परिसरात श्री जे.आर. गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूलच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची पुन्हा एकदा दखल घेतली जात असून सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### विजयी एनसीसी विद्यार्थी व फर्स्ट ऑफिसर दत्ता बारसे यांचा भव्य सत्कार

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या सीएटीसी-७१६ (Combined Annual Training Camp) मध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर येथील एनसीसी एअर विंगच्या कॅडेट्स तसेच 'फर्स्ट ऑफिसर' पदावर पदोन्नती मिळालेल्या असोसिएट एनसीसी ऑफिसर दत्ता बारसे यांचा शाळेत विशेष सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. सीएटीसी-७१६ शिबिरात महात्मा फुले हायस्कूलच्या कॅडेट्सनी उत्कृष्ट शिस्त, नेतृत्व आणि संघभावनेचे प्रदर्शन करत प्रतिष्ठेच्या मुख्य ड्रिल (संचलन) स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून विजेतेपदाची ट्रॉफी मिळवली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेसह नांदेड जिल्ह्याचा गौरव झाला. याच शिबिरादरम्यान एनसीसी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत असोसिएट एनसीसी ऑफिसर दत्ता बारसे यांना 'सेकंड ऑफिसर' वरून 'फर्स्ट ऑफिसर' पदावर पदोन्नती देण्यात आली. ३ महाराष्ट्र एअर स्क्वाड्रन एनसीसी, पुणेचे कमांडिंग ऑफिसर विंग कमांडर एस. एस. मराठे तसेच विंग कमांडर अर्पण चंदा यांच्या हस्ते त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला. या यशानिमित्त आयोजित सत्कार समारंभात शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव रावसाहेब शेंदारकर, खजिनदार ॲड. उदयरावजी लिंबाळकर, मुख्याध्यापिका सौ. सुरेखा कदम, पर्यवेक्षक एस. व्ही. जाधव, खानझोडे सर यांच्या हस्ते विजयी कॅडेट्स व दत्ता बारसे यांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# बदनामी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

## महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



बिलोली : (स. गांवकरी)

राज्यातील ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाची सोशल मीडियाच्या माध्यमातून होत असलेली बदनामी थांबवून वादग्रस्त रविराज साबळे यांच्या विरुद्ध तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी ठाम मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन (डी.एन.ई.-136), जिल्हा शाखा नांदेड यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या एका व्हिडिओमध्ये राज्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी संवर्गावर अत्यंत बेजबाबदार, अपमानास्पद, अश्लील आणि बदनामीकारक स्वरूपाची वक्तव्ये करण्यात आली आहेत. कोणताही ठोस पुरावा न देता संपूर्ण ग्रामपंचायत यंत्रणेला भ्रष्ट ठरविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप युनियनने केला आहे. अशा प्रकारच्या विधानांमुळे राज्यभरातील हजारो प्रामाणिक ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या प्रतिमेला धक्का बसत असून समाजामध्ये शासन यंत्रणेबाबत अविश्वासाचे वातावरण निर्माण होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. युनियनच्या मते, ग्रामपंचायत अधिकारी हे ग्रामीण विकासाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणारे महत्त्वाचे घटक आहेत. मात्र काही व्यक्तींकडून संपूर्ण संवर्गाला लक्ष्य करून केले जाणारे बेछूट आरोप, शिवीगाळ व बदनामीकारक भाषा ही केवळ अधिकाऱ्यांचा अपमान नसून शासनाच्या प्रशासन व्यवस्थेची प्रतिमाही मलिन करणारी आहे. या प्रकरणातील व्हिडिओची तसेच इतर डिजिटल पुराव्यांची तातडीने तपासणी करून रविराज साबळे यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच लागू असलेल्या माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून संबंधित बदनामीकारक व आक्षेपार्ह व्हिडिओ तात्काळ हटविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनने स्पष्ट केले आहे की, काही अपवादात्मक घटनांच्या आधारावर संपूर्ण अधिकारी वर्गाला बदनाम करणे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई केल्यास प्रशासनाविषयी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल आणि भविष्यात अशा प्रकारच्या बेजबाबदार व बदनामीकारक कृत्यांना आळा बसेल, अशी अपेक्षा युनियनने व्यक्त केली आहे.यावेळी जिल्हाध्यक्ष अमृतराव शिंदे, सरचिटणीस धम्मानंद धोत्रे, कार्याध्यक्ष श्रीनिवास मुगावे,शेख नजीर,ग्रामविकास अधिकारी सुनील हाळदेवाड,पी डी वाघमारे, उत्तरवाड यांच्यासह युनियन च्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## जुन्नर पोलीस ठाणे हद्दीत २७० किलो गोमांस जप्त

शिवनेरी : (स. गांवकरी)

जुन्नर येथील माई मोहल्ला या ठिकाणी गोवंश कत्तल करून एका खोलीमध्ये ठेवले असल्याबाबत गोपनीय माहिती जुन्नर पोलीस स्टेशनला मिळाली सदर बाबत पडताळणी करण्यासाठी धनंजय पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे आदेशाने दत्तात्रय गुंड. पोलीस निरीक्षक,पो. स. ई. ऋषिकेश टिटमे व पथक स्थापन करून पाळत ठेवली असता एका खोलीमध्ये सुमारे २७० किलो गोमांस मिळून आलेले आहे. सदरची खोली ही इसम नामे फुरकान इब्राहिम बेपारी याची असून त्याच्यावर गोवंश बाबत यापूर्वीचे सुद्धा गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्ह्यामध्ये रेहान दस्तगीर कुरेशी , अदनान अल्ताफ बेपारी ,आतिक अहमद कुरेशी सर्व रा. माई मोहल्ला/ शिपाई मोहल्ला जुन्नर , मुजम्मिल मुतम्मिल कुरेशी , बिलाल दस्तगीर कुरेशी, समीर सोहेल कुरेशी व शरीन इब्राहिम बेपारी सर्व रा. माई मोहल्ला आरोपींना ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर आरोपीतांवर यापूर्वी सुद्धा असेच गोवंश बाबत गुन्हे दाखल असून सदरचे आरोपी अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहेत. सदरची कारवाई करत असताना जुन्नर पोलीस ठाणे गु. र.क्र. १७० / २६ यु / एस १८९ ( २ ), १८९(४), १९१ ( २ ) सह ४, २५ आर्म ऍक्ट मधील आरोपी मोहसिन इकबाल अत्तार वर्ष,यांस अटक करून न्यायालयात हजर केले आहे. पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांनी जुन्नर पोलीस ठाणे हद्दीत गोमांस व गोवंश कत्तल याबाबत कठोर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत अशीच कारवाई यापुढे सुद्धा सुरू होणार आहे.

## अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक भवनाच्या जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यात येईल

- पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आश्वासनंतर धनगर समाजाचे आंदोलन स्थगित

सोलापूर : (स. गांवकरी)



राजमाता अहिल्या देवी होळकर सांस्कृतिक भवनाच्या जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यात येईल असे आश्वासन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिले. पोलीस अधीक्षक यांचे आश्वासनंतर धनगर समाजाचे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

पंढरपूर येथील धनगर समाजाच्या शिष्टमंडळासोबत सोलापूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक मा. अतुलजी कुलकर्णी साहेबांची बैठक झाली आणि धनगर समाजाच्या मागणी बद्दल सकारात्मक निर्णय घेण्यात आला.

पंढरपूर येथील पु.अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक भवनाच्या आरक्षित जागेवरती बेकायदेशीर अतिक्रमण व इतर मागण्यां यासंदर्भात आंदोलन करण्याचा एक निर्णय समाजाच्या बैठकीमध्ये झाला होता त्या संदर्भात पोलीस संकुल येथे धनगर समाजाच्या शिष्टमंडळासोबत बैठक झाली या बैठकीत पोलीस अधीक्षक साहेबांनी सकारात्मक चर्चा करत धनगर समाजाच्या भावना तीव्र आहेत परंतु आषाढी वारीमध्ये आंदोलन करणे योग्य नाही प्रचंड संख्येने भाविक पंढरपुरात येत असतात पोलिसांवर प्रचंड ताण असतो त्यामुळे आपले आंदोलन आपण स्थगित करावे व आपल्या मागण्या संदर्भात आपण चर्चा करू अशी विनंती केली असता पुढील मागण्या तात्काळ मान्य करण्यात आल्या आरक्षित जागेवरती बेकायदेशीर अतिक्रमण झालेले नगरपालिका विभाग व पोलीस विभागाच्या माध्यमातून तात्काळ काढण्याचे मान्य केले तसेच पंढरपूर कॉरिडॉर मध्ये वाराणसी व इतर कॉरिडॉर च्या धरतीवरती पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक केले जाईल अशा प्रकारची चर्चा जिल्हाधिकारी सो पालकमंत्री , मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याशी चर्चा करून हा निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिल्यानंतर पुढील होणारे आंदोलन स्थगित करण्याचे समाजबांधवांच्या वतीने लेखी देण्यात आले. या बैठकीस सोमनाथ ढोणे पंकज देवकते प्रशांत घोडके संजय लवटे विक्रम तरंगे यांच्यासह धनगर समाज बांधव उपस्थित होते.

## नगरसेवकांनी शहर विकासाच्या दृष्टीने प्रशासनाशी समन्वय साधत काम करावे

ठाणे : (स. गांवकरी)



विशेष प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

लोकशाही व्यवस्थेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका अधिक प्रभावी आणि नागरिकाभिमुख करण्याच्या उद्देशाने प्रजा फाउंडेशनच्या वतीने ठाणे महानगरपालिकेतील नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत नगरसेवकांना महानगरपालिकेचे कामकाज, कायदेशीर तरतुदी, विकासकामांचे व्यवस्थापन, नगरसेवकांनी शहर विकासाच्या दृष्टीने प्रशासनाशी समन्वय साधून काम करणे तसेच लोकप्रतिनिधी म्हणून असलेल्या जबाबदाऱ्या सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. ठाणे महापालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या आदेशानुसार महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रजा फाऊंडेशनाच्या माध्यमातून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त व महापालिका सचिव मनिष जोशी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या सुरूवातीला आयुक्त सौरभ राव यांनी या कार्यशाळेचा उद्देश नमूद केला. प्रशासन आणि सभागृह यांच्या कोणत्याही प्रकारचा संघर्ष नसून दोन्ही घटक शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करतात ही भावना दृढ करण्यासाठी या प्रशिक्षणांचा उपयोग होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कायदे, नियम आणि प्रक्रियांची माहिती घेताना प्रशासनाचा दृष्टीकोन आणि लोकप्रतिनिधींचा दृष्टीकोन समजून घेणे आवश्यक आहे. एकमेकांच्या मर्यादा, जबाबदाऱ्या आणि अधिकारांचा आदर राखत समन्वयाने काम केल्यास शहराच्या विकासाला अधिक गती मिळेल असेही आयुक्तांनी नमूद केले. कार्यशाळेच्या प्रारंभी प्रजा फाऊंडेशन व्यवस्थापक प्रतीक्षा देवळेकर यांनी संस्थांमधील लोकप्रतिनिधींची भूमिका आणि जबाबदाऱ्या याविषयी मार्गदर्शन केले. नगरसेवकांनी शहर विकासाच्या दृष्टीने प्रशासनाशी समन्वय साधून काम करणे, नागरिकांच्या समस्या प्रभावीपणे मांडणे आणि त्यांचे वेळेत निराकरण करण्यासाठी पाठपुरावा करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## विक्रेत्यांना कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्या

शिवनेरी : (स. गांवकरी)



जुन्नर शहरातील इतिहासकालीन दादोजी कोंडदेव बुरुंजवळील भाजी विक्रेत्यांना कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी . १५ दिवसात पर्यायी जागा न दिल्यास नगरपालिका कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल व ८५ भाजी विक्रेते नगरपालिकेला घेरावा घालून बसतील होणाऱ्या परिणामाची जबाबदारी मुख्याधिकारी चरण कोल्हे यांची राहील असे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हाध्यक्ष मकरंद पाटील भाजी विक्रेत्यांच्या सह्या घेऊन सांगितले आहे . निवेदनात असे म्हटले आहे की , बुरूज जवळी जागेत २ वर्षापासून भाजीपाला व्यवसाय सुरु आहे. या जागेत शहरातील सामाजिक घटकांना विविध कार्यक्रमाला व ट्रॅफिक यांचे कुठल्याही प्रकारचे उल्लंघन न करता भाजी विक्रेते व्यवसाय करीत होते . मागील आठवड्यात झालेल्या पावसामुळे बुरुंज थोड्या प्रमाणात ढासळला . मुख्याधिकारी चरण कोल्हे यांनी भाजी विक्रेत्यांना येथील जागा सोडण्यास सांगितले.

८५ विक्रेतांना दुसरी पर्याय जागा नसल्यामुळे व्यवसाय बंद करण्याशिवाय पर्याय उरला नाही . मुख्याधिकारी कोल्हे यांनी २ वर्षांपूर्वी बैलबाजार येथील तोंडी पर्याय जागा दिली , पण जुन्नर न्यायालयीन कोर्टाने या जागेवर बसण्यासाठी बंदी घातली . त्यावेळी विक्रेत्यांवर अन्याय झाला .

# गोगावच्या रस्त्यांसाठी ₹१ कोटी ५ लाखांचा निधी मंजूर

- सरपंच सौ. वनिता सुरवसे यांच्या पाठपुराव्याला आले यश
- आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे मानले मनःपूर्वक आभार

अक्कलकोट : (स. गांवकरी)



अक्कलकोट तालुक्यातील गोगाव ग्रामपंचायतीच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत गावातील दोन प्रमुख रस्त्यांच्या कामांसाठी तब्बल ₹१ कोटी ५ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी मंजूर होण्यासाठी गोगावच्या सरपंच सौ. वनिता मधुकर सुरवसे आणि उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी सातत्याने पाठपुरावा करून संबंधित विभागाकडे वारंवार मागणी लावून धरली होती. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून, ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंजूर निधीनुसार चौदा मैल ते अंबाबाई मंदिर रस्त्यासाठी ₹८० लाख, तर गोगाव ते पडसलगी रस्त्यासाठी ₹२५ लाख असा एकूण ₹१ कोटी ५ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या दोन्ही रस्त्यांच्या कामांमुळे गावातील वाहतूक अधिक सुरक्षित, सुलभ आणि गतिमान होणार असून शेतकरी, विद्यार्थी, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सरपंच सौ. वनिता मधुकर सुरवसे यांनी सांगितले की, “गोगावच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. गावातील प्रलंबित रस्त्यांची कामे पूर्ण व्हावीत, यासाठी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या सहकार्याने सातत्याने पाठपुरावा केला. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी ग्रामस्थांच्या मागण्यांची दखल घेत सकारात्मक भूमिका बजावली आणि विकासाभिमुख निर्णय घेत हा महत्त्वपूर्ण निधी मंजूर करून दिला. याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत.”

यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी सांगितले की, “गावातील रस्त्यांचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. ग्रामस्थांच्या मागणीनुसार सरपंच सौ. वनिता सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी आमच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत निधी मंजूर करून दिला. या निधीमुळे गोगावच्या विकासाला निश्चितच नवी गती मिळेल आणि नागरिकांच्या दैनंदिन प्रवासातील अडचणी दूर होतील.”

गोगाव ग्रामपंचायतीच्या वतीने गावाच्या विकासासाठी भविष्यातही विविध पायाभूत सुविधांची कामे मार्गी लावण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. मंजूर निधीमुळे दोन्ही रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण होऊन ग्रामीण भागातील विकासाला चालना मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी गोगाव ग्रामपंचायत, सरपंच सौ. वनिता मधुकर सुरवसे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थांच्या वतीने आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. या निधीमुळे गोगावच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून ग्रामस्थांनी या निर्णयाचे उत्स्फूर्त स्वागत केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष ओमप्रकाश पत्रे महाराज यांचे निधन



■ शनिवारी सकाळी १० वाजता अर्धापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार

अर्धापूर (स. गांवकरी) : अर्धापूर येथील ज्येष्ठ पत्रकार संघ नांदेड जिल्हा उपाध्यक्ष ओमप्रकाश दिगंबरआप्पा पत्रे महाराज (वय ७४ वर्षे) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दि.१७ शुक्रवारी दुपारी १ वाजता निधन झाले आहे.त्यांच्यावर दि.१८ शनिवारी रोजी सकाळी दहा वाजता अर्धापूर येथील जंगम समाज समशानभूमी पोलीस ठाण्यासमोर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. माजी उपसरपंच,संचालक से.स.सो. अर्धापूर,पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष ओमप्रकाश दिगंबरआप्पा पत्रे यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते संतोष ओमप्रकाश पत्रे,माजी शहरप्रमुख सतीश ओमप्रकाश पत्रे,पोलीस कर्मचारी सुनील ओमप्रकाश पत्रे यांचे वडील होत.



### बं गटातून संचालक पदी शिवराम लुटे बिनविरोध

नवीन नांदेड (स. गांवकरी) : नाजिमसंह बॅकेचा निवडणुकीत पगारदार कर्मचारी पतसंस्था बं गटातुन शिवराम लुटे हे बिनविरोध निवड झाली असून निवडीबद्दल विघापिठ कर्मचारी सह पत संस्था विष्णुपुरी यांच्या वतीने व मित्र मंडळ यांनी अभिनंदन करून सत्कार केला असून नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघातील एकमेव बिनविरोध संचालक म्हणून मान मिळाला आहे. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वा खाली नाजीमसह बॅक निवडणूक साठी पगारदार कर्मचारी पतसंस्था बं गटातून निवडणूक लढविण्या साठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता, उमेदवारी मागे घेण्याचा शेवटच्या दिवशी प्रतिस्पर्धी यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला या मुळे या गटात केवळ एकमेव अर्ज राहिल्याने बिनविरोध निवड झाली आहे. नांदेड दक्षिण मतदार संघातील विष्णुपुरी येथील रहिवासी तथा विष्णुपुरी येथील स्वारातीम कर्मचारी विघापिठ पतसंस्थेच्या संस्थापक तथा माजी अध्यक्ष असलेले शिवराम लुटे यापूर्वी याच मतदारसंघातून सन 21-25 संचालक मंडळ निवडणुकीत ते प्रचंड मताधिक्याने निवडून येऊन विजयी झाले होते. याही वर्षी पंचवार्षिक निवडणूक साठी सुरू असलेल्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटच्या दिवशी पगारदार कर्मचारी पतसंस्था बं गटातून आकरा उमेदवारी अर्ज दाखल होते, यात अनेक गटाचे दिग्गज उमेदवाराचा सहभाग होता,यात दहा जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने एकमेव अर्ज राहिल्याने बिनविरोध निवड झाली आहे. सर्व सामान्य कुटुंबातील कार्यकर्ते यांना पुन्हा उमेदवारी देऊन या गटातुन बिनविरोध काढून न्याय दिला असल्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्ये आभार मानले असून बिनविरोध निवड झाल्याबद्दल विघापिठ कर्मचारी सहकारी पतसंस्था विष्णुपुरी यांच्या वतीने जनसंपर्क अधिकारी अशोक कदम, गोविंद हंबर्डे चेअरमन, ॲड.जयसिंग हंबर्डे, विजय पल्लेवाड, गजानन लुटे,बाळु मोरे, नारायण कदम,मामीलवाड खरवडकर यांनी अभिनंदन केले आहे.

### विकासकामे गुणवत्तापूर्ण व गतीने पूर्ण करावेत - पालकमंत्री अतुल सावे

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जिल्ह्यात शेती, आरोग्य, शिक्षण, वीज, पाणीपुरवठा, रस्ते व अन्य पायाभूत सुविधांची विकासकामे गुणवत्तापूर्ण व गतीने पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे. विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजना 2026-27 च्या 867.59 कोटींच्या नियोजनास बैठकीत मान्यता देण्यात आली. शाळांमधील शौचालये, अतिरिक्त वर्गखोल्या, स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देणे आणि मूलभूत सुविधांवर प्राधान्याने खर्च करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. तसेच जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) सन 2025-26 च्या 790.57 कोटीच्या खर्चास मान्यता आणि 867.59 कोटीच्या खर्चाचे नियोजनास मान्यता दिली.




### विद्यार्थी स्पर्धेत टिकावे यासाठी सेमी शाळा सुरू : सरपंच सरिताताई काकडे

अर्धापूर (स. गांवकरी) : तालुक्यातील रोडगी गावचे विद्यार्थी स्पर्धे टिकण्यासाठी जि.प.प्रा. शाळा रोडगी येथील सरपंच सौ. सरिताताई काकडे यांनी पहिली ते आठवीच्या सेमी इंग्रजी माध्यमात शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना सरपंच सौ. सरिताताई दगडूजी काकडे यांच्यातर्फे स्वखर्चाने शैक्षणिक साहित्याचे वाटप दि.१७ शुक्रवारी रोजी करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू करण्यासाठी सरपंच सौ.सरिताताई काकडे यांनी पुढाकार घेत सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत केली. यावेळी आरोग्य विभागाचे दगडू काकडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष काकडे, उपाध्यक्ष विठ्ठल काकडे, उपसरपंच सरस्वतीबाई काकडे,शिक्षणप्रेमी तुकाराम सितापराव, सुधीर किरकन,राजू सीतापराव,मुख्याध्यापक राजाराम राठोड,शिक्षक सचिन काळे,अरुण बोबडे, श्रीमती धोंगडे यांच्यासह गावकरी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन एल. जी. वाघमारे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सचिन काळे यांनी मानले.

### 'हॅपीनेस प्रोग्राम'चे श्रीरामपूरात २० जुलैपासून आयोजन

वडाळा महादेव (स. गांवकरी) : आधुनिक धकाधकीच्या जीवनशैलीत वाढता ताण, चिंता आणि मानसिक अस्वस्थता यांवर मात करून आनंदी, निरोगी व संतुलित जीवन जगण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग, श्रीरामपूरच्या वतीने 'Happiness Program (आनंद अनुभूती शिबिर)' आयोजित करण्यात आले आहे. हे पाच दिवसीय शिबिर दि. २० ते २४ जुलै २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ४.०० ते ७.०० या वेळेत हॉटेल गुरु तेज, नेवासा रोड, श्रीरामपूर येथे संपन्न होणार आहे.

# नांदेड जिल्ह्यात नाविन्यपूर्ण उपक्रमाला सुरुवात

## जिल्हाधिकारी कार्यालयात "ईव्ही फास्ट चार्जिंग" स्टेशनचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना देण्यासाठी आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत उभारण्यात आलेल्या ईव्ही फास्ट चार्जिंग स्टेशनचे उद्घाटन आज जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते झाले.







यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, किनवटचे आमदार भीमराव केराम, आमदार राजेश पवार, आमदार आनंद तिडके-बोंढारकर, आमदार श्रीजया चव्हाण, महापौर कविता मुळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री अतुल सावे यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा नियोजन समितीमार्फत हा नाविन्यपूर्ण उपक्रम साकारण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील सर्व 15 तालुक्यांतील तहसील कार्यालयांमध्ये ईव्ही चार्जिंग स्टेशन कार्यान्वित करण्यात येत आहेत.

या केंद्रांवर 60 किलोवॅट क्षमतेचे फास्ट चार्जर बसविण्यात आले असून त्याद्वारे एकाच वेळी दोन इलेक्ट्रिक वाहने चार्ज करता येणार आहेत. सर्वसामान्य नागरिकांना माफक दरात ही सेवा उपलब्ध होणार असून इलेक्ट्रिक वाहनधारकांसाठी हा उपक्रम मोठा दिलासा ठरणार आहे. महाराष्ट्रात जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अशा प्रकारे सर्व तालुक्यांमध्ये ईव्ही चार्जिंग सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा पहिलाच प्रयोग असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमामुळे इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला चालना मिळण्याबरोबरच पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि हरित ऊर्जेला प्रोत्साहन मिळणार आहे.

हा उपक्रम जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविण्यात आला असून नांदेड जिल्हा हरित व शाश्वत विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले.

## कर्मचाऱ्यांसाठी राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण



आळंदी : (स. गांवकरी)

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या आदेशान्वये आळंदी नगर परिषदेमार्फत आज फ्रूटवाले धर्मशाळा, आळंदी येथे छत्रपती संभाजीनगर व पुणे विभागातील नगरपरिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी एकदिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणास दोन्ही विभागांतील विविध नगरपरिषदांमधील सुमारे ३०० अधिकारी व कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी देवीदास टेकाडे, सहायुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, चंद्रकांत खोसे, सहायुक्त, पुणे विभाग, मच्छिंद्र घोलप, सहायुक्त, पुणे जिल्हा नगरपालिका प्रशासन विभाग, माधव खांडेकर, मुख्याधिकारी, आळंदी नगर परिषद यांच्यासह, आळंदी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर नगरसेविका वैजंताताई उमरगेकर नगरसेवक, विविध नगरपरिषदांचे अधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षणासाठी ऑर्गनायझेशन फॉर डिझास्टर मॅनेजर्स (ODM) संस्थेचे अध्यक्ष डॉ. विनोद भारद्वाज व त्यांच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या टीमने मार्गदर्शन केले.

## पालकमंत्री अतुल सावे यांनी विष्णुपुरी उड्डाणपुलाच्या घटनेची केली पाहणी

### दोषींवर होणार कठोर कारवाई



नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड-लातूर राष्ट्रीय महामार्गावरील विष्णुपुरी येथे श्री गुरुगोबिंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरील उड्डाणपुलाच्या बाजूचा खालचा भाग अचानक कोसळल्याच्या घटनेची राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी आज घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

या घटनेची शासनाने गांभीर्याने दखल घेतली असून, केंद्रीय उच्चस्तरीय तज्ज्ञ पथकाने दोन दिवसांपूर्वी घटनास्थळी भेट देऊन उड्डाणपुलाच्या संरचनेची सखोल तांत्रिक तपासणी केली आहे. चौकशीत बांधकामातील त्रुटी, निकृष्ट दर्जाचे साहित्य, कामातील निष्काळजीपणा अथवा संबंधित यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारची हयगय झाल्याचे आढळल्यास दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे पालकमंत्री सावे यांनी स्पष्ट केले.

पालकमंत्री अतुल सावे यांनी उड्डाणपुलाच्या कोसळलेल्या भागाची पाहणी करून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI), संबंधित बांधकाम संस्था आणि जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून घटनेची सविस्तर माहिती घेतली. उड्डाणपुलाच्या उर्वरित संरचनेची सुरक्षितता, स्थिरता आणि गुणवत्तेची तपासणी करून आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

उड्डाणपुलाच्या बांधकामाची गुणवत्ता, वापरण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा, संरचनात्मक मजबुती तसेच तांत्रिक बाबींची सखोल तपासणी करण्यासाठी आयटीची टीम बोलावणार असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या आवश्यक ती दुरुस्ती, सुधारणा आणि पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परिसरात पर्यायी मार्गाने वाहतूक सुरळीत सुरू ठेवण्यासाठी दक्षता घ्यावी. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा मोठी दुखापत झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला. भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी संपूर्ण उड्डाणपुलाची तांत्रिक तपासणी करण्यात येत असून चौकशी अहवालाच्या आधारे जबाबदारी निश्चित करून दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली.

यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार भीमराव केराम, आमदार राजेश पवार, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, संबंधित तांत्रिक अधिकारी, जिल्हा प्रशासन व पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## सिडको हडको परिसरातील विविध भागातील एसआयआर मोहीमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### लोकप्रतिनिधी सह सामाजिक कार्यकर्ते सहभागी

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

नांदेड तहसील कार्यालय व मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 17 जुलै रोजी सिडको परिसरातील स्वामी समर्थ केंद्र, विठ्ठल रूक्मिणी मंदिर हडको,जेतवन बुध्द विहार यासह विविध ठिकाणी आयोजित एसआयआर मोहीमेला नागरीकांनी

उस्फुर्त प्रतिसाद दिला असुन लोकप्रतिनिधी सह सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार यांनी सहकार्य केले.एसआयआर मोहीमे अंतर्गत मनपा आयुक्त डॉ.डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको क्षेत्रीय कार्यालय सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग,व तहसील प्रशासनाचे व्यवस्थापक सुरज स्वामी, सहाय्यक शिवाजी इंगळे यांनी 17 जुलै रोजी सिडको परिसरातील स्वामी समर्थ केंद्र,जेतवन बुध्द विहार परिसर गुरूवार बाजार, हडको येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिर यासह विविध भागात एस आय आर मोहीम अंतर्गत मतदान गणना पत्र अर्ज नोंदणी करून घेतले यावेळी नगरसेवक संजय पाटील घोगरे, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख,सतिश बसवदे,राजु लांडगे, यांच्या सह भाजपा मंडळ अध्यक्ष सचिन रावका,शितल खांडील,राजन जोजारे, देविदास कुलकर्णी,छोटु लांडगे, यांच्या सह पत्रकार रमेश ठाकूर,किरण देशमुख, तिरूपती पाटील घोगरे यांनी सहकार्य केले.

मोहीम अंतर्गत अविनाश शिनगारे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचा मार्गदर्शनाखाली सुपर वायजर एस.एम.देवरे, जाधव के.एस, जगदीश जोगदंड,शिवराज हने,अमर बयास,गजाने एस.एन, पुरी रामराव,सुभाष पवार,त्र्यंबक कदम, दवणे , बालाजी जागुतकर, शिंदे, मोरे, क्षिरसागर, साखरे करनिरीक्षक प्रकाश दर्शने,वंसत कल्याणकर, नारायण आठवले, संजय नागापूरकर ,विठ्ठल अंबटवार, राजकिरण दवणे, बालाजी पाटोळे,दिलीप कानापुरे, सोनाजी काकडे,आशा वर्कर्स पुष्पा केशवराव डोंगरे,राजेश्वरी राजेश करडखेले,असिमता निवडंगे, प्रतिभा वाघमारे,शितल लोखंडे, यांनी मोहीमेला सहकार्य केले.



## विकासाला गती देण्यासाठी समन्वयाने काम करा




ठाणे : (स. गांवकरी)

ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागाचा समतोल, सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास साधण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश खासदार तथा जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) चे अध्यक्ष डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिले. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे यांच्या वतीने आज (दि. १७ जुलै) नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. बैठकीत जिल्ह्यातील विविध विकासकामे, केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची अंमलबजावणी, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि लोककल्याणकारी योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

# स्मारकासाठी एक कोटी रुपयांच्या निधीची घोषणा

## तामसा येथील स्मारक उभारणीसंदर्भात पालकमंत्री अतुल सावे यांची सकारात्मक भूमिका

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी सरसेनापती नेताजी पालकर यांच्या हदगाव तालुक्यातील तामसा येथील ऐतिहासिक समाधी स्थळाचा विकास करून भव्य स्मारक उभारण्यात येणार असून, त्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केली.



तामसा येथील समाधी स्थळाच्या विकासासाठी छावा मराठा संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री अतुल सावे यांनी आंदोलकांच्या शिष्टमंडळाशी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात चर्चा केली. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण व मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी तामसा परिसराचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करत स्मारक उभारणीसाठी शासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी केली. यावेळी शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक सल्लागार समिती, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन व आढावा समिती स्थापन करणे, स्मारकाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणे तसेच प्रकल्प व्यवस्थापन समिती (पीएमसी) गठीत करण्याबाबत मागणी केली.

शिष्टमंडळाच्या निवेदनाची दखल घेत पालकमंत्री अतुल सावे यांनी स्मारक उभारणीबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून स्मारकाच्या उभारणीस गती देण्यात येईल. तसेच यासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार भीमराव केराम, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीस किशोर चव्हाण, डॉ. राजेंद्र दाते पाटील, इंजि. तानाजी हुस्सेकर, कामाजी पवार, सुनंदा जोगदंड, डॉ. प्रभाकर जाधव, दीपक पावडे, दीपक राजुरकर, कैलास शिंदे, बबन पाटील, संजय हंबर्डे, सुनील कदम, दशरथ कपाटे, शिवानंद पाटील, विश्वजीत जाधव यांच्यासह शिवप्रेमी उपस्थित होते.


ARNOTE Dental Clinic
smile more..live more..
डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 | शनिवार दि. १८ जुलै २०२६

आवृती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी




दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २१८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## नाशिक शहरातील पाणीपुरवठा सुरळीत राहणार, धरण साठ्यात वाढ झाल्याने पाणी कपात रद्द

नाशिक (समर्थ गांवकरी)

यंदा पाऊस कमी होणार असल्याच्या चर्चामुळे आणि नाशिकला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे नाशिक शहरात जून आणि जुलै महिन्यात तसेच आगस्टमध्ये दर दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय नाशिक महापालिकेने घेतला होता. मात्र आता गंगापूर धरणातील पाणीसाठा वाढल्याने उद्या शनिवारी पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याचा निर्णय मनपाने घेतला आहे.



नाशिक महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापौर हिमगौरी आहेर-आडके त्यांच्या अध्यक्षतेखाली आज शुक्रवारी पार पडली. ही सभा सुरू असताना सभासदांनी शहरामध्ये दर शनिवारची सुरू असलेली पाणी कपात रद्द करण्याची मागणी केली. या मागणी वरती सभेमध्ये चर्चा करताना नगरसेवक गुरमित बग्गा, दिनकर पाटील, अजय बोरस्ते, हेमलता पाटील, राहुल दिवे आणि अन्य सदस्यांनी धरणाची एकूणच परिस्थिती बघता पाणी पातळी वाढलेली आहे, त्यामुळे पाणी कपात रद्द करण्यात यावी अशी मागणी केली.

# एसटीचा प्रवास महागला

## १३.५६ टक्के भाडेवाढ; डिझेल दरवाढीसह वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर निर्णय

मुंबई (समर्थ गांवकरी)

ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बस प्रवासाच्या तिकिटांचे दर आता वाढणार आहेत. राज्य परिवहन प्राधिकरणाने एसटी महामंडळाच्या १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावाला अंतिम मान्यता दिली आहे. अखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, कर्मचाऱ्यांच्या भत्त्यांमधील वाढ आणि गाड्यांच्या देखभालीचा वाढता खर्च यांमुळे हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी दिली. या नव्या निर्णयामुळे प्रवाशांच्या खिशाला झळ बसणार असली, तरी यापूर्वी लागू केलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



वाढत्या खर्चाचा भार सहन करत राज्यातील लाखो प्रवाशांना अविरत सेवा देणाऱ्या एसटीच्या दैनंदिन कामकाजावर प्रचंड आर्थिक ताण निर्माण झाला होता. त्यामुळे ही सार्वजनिक सेवा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाला अखेर दरवाढीचा निर्णय घ्यावा लागला आहे. ही भाडेवाढ करताना प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडेल, याची काळजी घेण्यात आल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. त्यासोबतच एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ, वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यामुळे महामंडळाचा एकूणच परिचालन खर्च वाढला आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन प्राधिकरणाने एसटी महामंडळाच्या १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिस्थितीमुळे डिझेल, सुटे भाग आणि टायर यांच्या किमती वाढल्याने ही वाढ अपरिहार्य ठरली. राज्यातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित आणि अखंडित सेवा देण्यासाठी तसेच एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. प्रवाशांनी एसटीवर दाखविलेला विश्वास नेहमीप्रमाणे कायम ठेवावा.- प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री

## कुटुंबांच्या आरोग्यनोंदी होणार डिजिटल

### पंतप्रधान फॅमिली केअर ट्रॅकर’

नवि दिल्ली (समर्थ गांवकरी)

आरोग्यसेवांचे डिजिटलीकरण करण्यासाठी आता ‘पंतप्रधान फॅमिली केअर ट्रॅकर’ योजना महत्त्वाची ठरणार आहे. केंद्र सरकारने ‘पंतप्रधान फॅमिली केअर ट्रॅकर’ योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ‘पंतप्रधान फॅमिली केअर ट्रॅकर’ या प्रकल्पाची सुरुवात केली. या योजनेचा उद्देश्य काय ?

**योजनेचा उद्देश्य**

संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्याची माहिती एकाच मंचावर उपलब्ध करून देणे, उपचारादरम्यान आवश्यक नोंदी शोधण्याच्या त्रासातून सामान्यांची मुक्तता करणे, महिला आणि मुलांच्या आरोग्य योजनांचे सुसूत्रीकरण करणे

**योजनेचा फायदा काय ?**

अनेक कुटुंबांच्या वैद्यकीय नोंदी आजही वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये किंवा कागदी फायलींमध्ये विखुरलेल्या असतात. त्यामुळे तातडीची वैद्यकीय गरज निर्माण झाल्यावर अचूक माहिती गोळा करणे कठीण होते. त्यामुळे ‘पंतप्रधान फॅमिली केअर ट्रॅकर’ (Family Care Tracker Scheme) या समस्येचे मोठ्या प्रमाणावर निराकरण करू शकतो. ‘पंतप्रधान फॅमिली केअर ट्रॅकर’




प्रणाली एखाद्या कुटुंबातील जन्मनोंदणी क्रमांक किंवा ‘आभा आयडी’ (BH ID) यांच्याशी जोडली जाईल. विविध सरकारी डेटाबेसमधील (जन्म नोंदणी, आरोग्य, पोषण आणि शिक्षण) माहितीही एकत्रित करेल. यात गर्भावस्थेतील अर्भकांना एक विशिष्ट आयडी दिला जाईल. ज्याद्वारे त्या मुलाच्या-युवकाच्या १८ वर्षांपर्यंत त्यांच्या आरोग्याची आणि सरकारी योजनांच्या माहितीचा डिजिटल मागोवा घेणे शक्य होईल. यामुळे देशातील कुटुंबांतील सदस्यांची आरोग्य प्रोफाइल, उपचारांच्या नोंदी आणि इतर महत्त्वाची माहिती एकाच ठिकाणी डिजिटल स्वरूपात उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

कसा मिळेल लाभ ?

डिजिटल नोंदींमुळे आपत्कालीन उपचारात होणारा विलंब टळेल

रुग्णाचा दीर्घकालीन आजार आणि वैद्यकीय इतिहास समजून घेणे डॉक्टरांना सोपे होईल.

## अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणुकीला उच्च न्यायालयात आव्हान, निवडणूक प्रक्रियेवर अनिश्चिततेचे सावट

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)




जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल करण्यात आली आहे. न्या. एस. जी. चपळगावकर यांच्या एकल पीठासमोर १५ जुलै रोजी या याचिकेची सुनावणी झाली. न्यायालयाने सर्व प्रतिवादी संस्थांना नोटीस बजावत या प्रकरणी एका आठवड्यानंतर पुढील सुनावणी घेण्याचे आदेश दिले आहेत.

श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथील शेतकरी व सहकारी संस्थेचे सभासद सतीश मांजबापू नाईक यांनी ही याचिका दाखल केली आहे. त्यांच्यावतीने ॲड. अजित काळे यांनी न्यायालयात मांडणी केली. याचिकेत याचिकाकर्त्यांनी निवडणूक प्राधिकरणाने दि. १५ जून २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाला आव्हान दिले असून त्यात म्हटले की, या परिपत्रकात थकबाकीदार संस्थांनी आपल्या संचालकांऐवजी बिगर थकबाकीदार सदस्याचा प्रतिनिधी म्हणून ठराव करण्याची अट घालण्यात आली आहे.

याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, सहकार कायद्यातील कलम ७३सीए(१)(आय) हे केवळ व्यक्तीला अपात्र ठरवते, संस्थेला नव्हे. परिपत्रकातून नवी अपात्रता निर्माण करण्यात आली आहे, जी कायद्याच्या विरोधात आहे.

निवडणूक प्राधिकरणाला कायद्याचा अर्थ लावण्याचा अधिकार नसल्याचे ॲड. अजित काळे यांनी म्हटले. निवडणूक प्राधिकरणाला कायद्याचा अर्थ लावण्याचा किंवा नव्या अपात्रता निर्माण करण्याचा कोणताही अधिकार नाही. हा अधिकार केवळ राज्य शासनाला किंवा न्यायालयांना आहे. कर्जमुक्ती योजना २०२६ चा संदर्भ देवून या योजनेमुळे थकबाकीदार शेतकरी व संस्था कर्जमुक्त होऊन पात्र ठरू शकतात. मात्र, योजना अंमलात येण्यापूर्वीच निवडणूक घेऊन ७०-८० टक्के संस्थांना वंचित ठेवणे हे लोकशाही तत्त्वांच्या विरोधात असल्याचे याचिकेत म्हटले आहे.

या प्रकरणी ॲड. व्ही. एच. दिघे यांनी प्रतिवादी क्र. १ व २ (राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी) यांची बाजू मांडण्यासाठी नोटीस स्वीकारली. न्यायालयाने सर्व प्रतिवादी संस्थांना नोटीस बजावत ही बाब एका आठवड्यानंतर पुढील सुनावणीसाठी ठेवली आहे. या आदेशामुळे जिल्हा बँक निवडणुकीच्या प्रक्रियेवर अनिश्चिततेचे सावट आले आहे.

## जय जगन्नाथ’च्या जयघोषात खाकीदास बाबा मठात रथोत्सव उत्साहात

### ‘श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी...‘व ’हरे कृष्ण हरे राम’च्या भक्तिरसात लालटाकी परिसर न्हाऊन निघाला

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

लालटाकी रोडवरील खाकीदास बाबा मठात भगवान जगन्नाथांचा पारंपरिक रथोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त सत्यनारायणजी गोवर्धनजी झंवर व डॉ. नंदलाल तोष्णीवाल यांनी सपत्नीक हस्ते भगवान जगन्नाथांची मंगल आरती केली. त्यानंतर भगवान जगन्नाथ, बलराम व सुभद्रा यांच्या रथाची मंदिर परिसरातून भक्तिमय मिरवणूक काढण्यात आली.

जय जगन्नाथ... जय जगन्नाथ..., हरे कृष्ण हरे राम, हरे राम हरे कृष्ण, श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी, हे नाथ नारायण वासुदेव तसेच अच्युतम् केशवं कृष्ण दामोदरम् या भक्तिगीतांच्या सुरावटींनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या अखंड घोषात भाविकांनी रथ ओढून भगवान जगन्नाथांचे दर्शन घेतले.

वातावरणात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला.

या प्रसंगी चेअरमन दीपक काबरा, शिवदास डागा, चंद्रकांत काबरा, जितेंद्र बिहाणी, प्रवीण बजाज, रमेश आसावा, मनोज मुंदडा, सुनील मुंदडा,



जगदीश दरक, श्रीकुमार सोनी, श्रीकांत काकाणी यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खाकीदास बाबा मठात दरवर्षी भगवान जगन्नाथांचा रथोत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. यानिमित्त मंदिर परिसरात दिवसभर धार्मिक कार्यक्रम, आरती, भजन-कीर्तन आणि दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

ओडिशातील जगन्नाथ पुरी येथे सुरू असलेल्या जागतिक कीर्तीच्या रथयात्रेच्या निमित्ताने नगरातही हा उत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात आला. भगवान जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांच्या नगरभ्रमणाच्या परंपरेचे प्रतीक म्हणून काढण्यात आलेल्या या मिरवणुकीने लालटाकी परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

# पंढरीच्या वाटेवर पुन्हा सज्ज सेवाभावाचा महायज्ञ

प्रतिनिधी-विनोद गायकवाड (समर्थ गांवकरी)

- परीते येथे १९ ते २२ जुलैदरम्यान नीलेश लंके प्रतिष्ठानचे अन्नछत्र
- खासदार नीलेश लंके यांची माहिती

**लाखो वारकऱ्यांसाठी अन्नदान, आरोग्यसेवा व विविध सुविधा**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाही सोलापूर जिल्ह्यातील परीते येथे भव्य अन्नछत्र व आरोग्य सेवा केंद्र उभारण्यात येणार आहे. नीलेश लंके प्रतिष्ठान आणि ’आपला मावळा’ सामाजिक संघटनेच्या संयुक्त विद्यमाने १९ ते २२ जुलै या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येणार असून, चार दिवसांत सुमारे तीन ते चार लाख वारकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. यासंदर्भातील माहिती खासदार नीलेश लंके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदा सलग पाचव्या वर्षी हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. विठ्ठलभक्तांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत अन्नदानाबरोबरच आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, चहा, नाश्ता आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वारीच्या मार्गावरून जाणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला आवश्यक त्या क्षणी मदत मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे लंके यांनी सांगितले.

वारकऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेत परीते येथे २५ ते ३० डॉक्टरांचे पथक, प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी आणि रुग्णवाहिका चारही दिवस कार्यरत राहणार आहेत. प्रवासादरम्यान उद्भवणाऱ्या विविध आरोग्य समस्यांवर तातडीने उपचार केले जाणार असून, कोरोना काळात आरोग्य व्यवस्थापनाचा मिळालेला अनुभव या सेवेत उपयोगी पडणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

या संपूर्ण सेवायज्ञासाठी सुमारे ५०० स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत. अन्नपदार्थांचे वितरण, पाण्याची व्यवस्था, साहित्याची ने-आण, वारकऱ्यांना मार्गदर्शन, स्वच्छता, वाहतूक नियोजन अशा सर्व कामांची स्वतंत्र जबाबदारी स्वयंसेवकांवर सोपविण्यात आली आहे. विशेष म्हणजे अन्न तयार करण्याव्यतिरिक्त इतर कोणतेही काम कंत्राटदार किंवा केटरिंग व्यावसायिकांकडून करून घेतले जात नाही. प्रतिष्ठानचे कार्यकर्ते आणि स्वयंसेवक स्वतः सर्व कामे निःस्वार्थपणे पार पाडतात. या सेवेकडे आम्ही कधीही राजकारण म्हणून पाहत नाही. येथे मी खासदार म्हणून नव्हे, तर वारकरी आणि त्यांच्या सेवकाच्या भूमिकेत सहभागी होतो. विठ्ठलभक्तांची सेवा करणे हेच आमच्यासाठी सर्वात मोठे भाग्य आहे, असे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.

वारीदरम्यान होणाऱ्या अपघातांबाबत चिंता व्यक्त करताना त्यांनी वारी मार्गावर इतर वाहतुकीस पूर्ण बंदी घालण्याची गरज व्यक्त केली. वारीत सहभागी होणाऱ्या वाहनचालकांच्या परवान्यांची तपासणी, अल्पवयीनांकडून वाहन चालविण्याचे प्रकार रोखणे तसेच प्रत्येक वारकऱ्याचा शासनाने विमा उतरविणे आवश्यक असल्याची मागणी त्यांनी पुन्हा केली. यासंदर्भात गेल्या दोन वर्षांपासून शासनाशी सातत्याने पत्रव्यवहार सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

नाशिक ते पंढरपूर दिंडी मार्गाच्या उभारणीसाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत असून, २२ जुलैपासून सुरू होणाऱ्या लोकसभेच्या अधिवेशनात हा प्रश्न पुन्हा उपस्थित करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गावर



अनेक सेवाकेंद्रे कार्यरत असतात. मात्र नाशिक, नगर आणि उत्तर महाराष्ट्रातून येणाऱ्या दिंड्यांच्या मार्गावर अशा सुविधांची संख्या तुलनेने कमी असल्याने परीते येथे सेवा केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे लंके यांनी सांगितले.

यंदाच्या वारीतही सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेचा संदेश जपत लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी नीलेश लंके प्रतिष्ठान आणि ’आपला मावळा’ सामाजिक संघटना सज्ज झाली असून, सर्व तयारी पूर्ण

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; नगर तालुक्यातील घटना गुन्हा दाखल

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील एका गावात अल्पवयीन (वय १५) शाळकरी मुलीवर वेळोवेळी अत्याचार झाल्याने ती गर्भवती राहिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गेल्या बुधवार (दि.१५ जुलै) रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसंत गहिनीनाथ चौधर (रा. आढाववाडी, पिंपळगाव माळवी, ता. अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मे २०२६ पासून संशयित वसंत चौधर याने फिर्यादी अल्पवयीन मुलीला आपल्या राहत्या घरी बोलावून घेतले. तिने नकार दिला असता, वसंत याने तिला जीवे मारण्याची धमकी दिली. तिचे तोंड दाबून तिच्या इच्छेविरूध्द वेळोवेळी अत्याचार केला.

काही दिवसांनंतर पीडित मुलीचे पोट दुखू लागल्याने नातेवाईकांनी तिला उपचारासाठी एमआयडीसी येथील खासगी रूग्णालयात दाखल केले. तेथील महिला वैद्यकीय अधिकार्यांनी तपासणी केली असता ती गरोदर असल्याचे समोर आले. यानंतर तात्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात आणि पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली.

पीडितेच्या जबाबानंतर पोलिसांनी संशयित आरोपीविरूध्द अत्याचार, पोक्सो आदी कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक मोंढे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# लेकीच्या अश्रूंनी वितळले बापाचे मन

## लिंगदेवमध्ये दारू विक्रीला कायमचा रामराम







लिंगदेव (समर्थ गांवकरी)

**दारू विकणाऱ्याची मुलगी अशी शाळेत होणारी हेटाळणी एका चिमुरडीला सहन झाली नाही. घरी आल्यानंतर तिने आपल्या वडिलांना, बाबा, दारू विकू नका... अशी भावनिक विनंती केली. लेकीच्या अश्रूंनी आणि निरागस शब्दांनी एका बापाचे मन हेलावले. त्यांनी अवैध दारू विक्रीचा व्यवसाय कायमचा बंद करून स्वाभिमानाने मासे विक्रीचा नवा व्यवसाय सुरू केला. अकोले तालुक्यातील लिंगदेव येथे घडलेली ही घटना समाजपरिवर्तनाचा प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.**

काही दिवसांपूर्वी लिंगदेव येथे गावातील अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी ग्रामसभा व दारूबंदी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत महिलांनी दारूमुळे उद्ध्वस्त होत असलेल्या संसाराचे वास्तव मांडले. त्याचवेळी संबंधित दारू विक्रेत्याच्या मुलीला शाळेत दारू विकणाऱ्याची मुलगी म्हणून हिणवले जात असल्याचे समोर आले. या गोष्टीने व्यथित झालेल्या मुलीने घरी येऊन वडिलांना दारू विक्री बंद करण्याची विनंती केली.

या भावनिक प्रसंगानंतर पिनू (शंकर) आढाव यांनी तत्काळ अवैध दारू विक्री बंद करण्याचा निर्णय घेतला आणि मासे विक्रीचा नवा व्यवसाय सुरू केला. त्यांच्या या निर्णयाचे गावभर स्वागत करण्यात आले.

नव्या व्यवसायाचे उद्घाटन आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या सौभाग्यवती पुष्पा लहामटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दारूबंदी चळवळीच्या वतीने हेरंब कुलकर्णी यांनी पिनू आढाव, त्यांच्या पत्नी आणि मुलीचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी बोलताना पुष्पा लहामटे म्हणाल्या, एका लहान मुलीने आपल्या वडिलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणला. हा निर्णय अनेक कुटुंबांसाठी प्रेरणादायी ठरेल.

दारूबंदी चळवळीचे प्रणेते हेरंब कुलकर्णी यांनी तालुक्यातील सर्व अवैध दारू विक्रेत्यांना दारू विक्री सोडून प्रामाणिक व्यवसाय स्वीकारण्याचे आवाहन केले. दारू विक्री सोडणाऱ्यांचा गावागावात सार्वजनिक सत्कार करण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली.

प्रा. मच्छिंद्र देशमुख यांनी समाजाने अवैध दारू विक्रीला कोणत्याही प्रकारचे सामाजिक पाठबळ देऊ नये, असे आवाहन केले.

अकोले तालुका दारूबंदी चळवळीच्या अध्यक्षा विमल मुंढे यांनी महिलांना मार्गदर्शन करताना ठाम भूमिका मांडली. त्या म्हणाल्या, आजपासून तालुक्यातील प्रत्येक महिला ही माझ्या कुटुंबातील सदस्य आहे. कोणत्याही महिलेवर अन्याय, अत्याचार किंवा दारूमुळे होणारा छळ सहन केला जाणार नाही. प्रत्येक महिलेला न्याय मिळावा यासाठी मी स्वतः लक्ष देईन. महिलांच्या प्रत्येक लढ्यात मी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहीन. दारूमुक्त, सुरक्षित आणि सन्मानाने जगणारा समाज घडविण्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने काम करूया. त्यांच्या या आवाहनाचे उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

ग्रामपंचायत सदस्या कल्पना फापाळे यांनी पिनू (शंकर) आढाव यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना भावनिक शब्दांत सांगितले, पिनूभाऊ, आपण घेतलेला हा निर्णय केवळ आपल्या कुटुंबासाठी नाही, तर संपूर्ण लिंगदेव गावासाठी ऐतिहासिक ठरणार आहे. आपल्या धाडसी निर्णयामुळे गावाचा इतिहास बदलण्यास सुरुवात झाली आहे. भगवान लिंगेश्वरानेच आपल्याला ही सद्बुद्धी दिली असावी, याची मला खात्री आहे. आपल्या या परिवर्तनातून इतरांनाही प्रेरणा मिळेल आणि लिंगदेव लवकरच पूर्णपणे दारूमुक्त गाव म्हणून ओळखले जाईल. या निर्णयासाठी आपण आणि आपल्या कुटुंबाचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार.

या कार्यक्रमाला दारूबंदी चळवळीचे प्रणेते हेरंब कुलकर्णी, जिल्हा कार्यकारिणी सदस्य प्रा. मच्छिंद्र देशमुख, लिंगेश्वर देवस्थानचे अध्यक्ष डी. बी. फापाळे, आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या सौभाग्यवती पुष्पा लहामटे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुका अध्यक्षा नीता आवारी, लिंगदेवचे सरपंच अमित घोमल, रुंभोडीचे सरपंच रविंद्र मालुंजकर, डोंगरगावचे सरपंच दशरथ उगले, जालिंदर बोडके, ज्ञानगंगा वाचनालयाचे अध्यक्ष सदाशिव कानवडे, कैलास आरोटे, गोपीनाथ हाडवळे, ग्रामपंचायत सदस्या कल्पना फापाळे, लता गावडे, नंदा कातोरे, विमल मुंढे ,सरपंच प्रशांत बंदावणे, गणेश पवार, कैलास आरोटे,यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात ग्रामपंचायत सदस्या कल्पना फापाळे आणि हरिभाऊ फापाळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिभाऊ फापाळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जगदीश आढाव यांनी मानले.

एका चिमुकल्या लेकीच्या निरागस आग्रहातून सुरू झालेला हा बदल आज संपूर्ण लिंगदेवसाठी प्रेरणादायी ठरला आहे. अवैध दारू विक्री सोडून स्वाभिमानाने नवा व्यवसाय स्वीकारण्याचा संदेश या घटनेतून समाजासमोर गेला असून, दारूमुक्त गावाच्या दिशेने लिंगदेवने टाकलेले हे पाऊल सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा दाखवणारे ठरत आहे.

# रेसिडेन्शिअल हायस्कूलचा शिष्यवृत्ती परीक्षेत मानाचा तुरा; ३ राज्य गुणवत्ताधारक, ५२ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर येथे इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. रामचंद्र दरे साहेब होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव श्री. मुकेश मुळे तसेच खजिनदार ड. दीपलक्ष्मी म्हसे मॅडम उपस्थित होत्या. यावर्षी इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाचे ३ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवण्यात यशस्वी झाले असून २१ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. तसेच इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाचे ३१ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचा, पालकांचा व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य श्री. जाधव व्ही. व्ही. यांनी

प्रास्ताविक करत शिष्यवृत्ती परीक्षेचा सविस्तर लेखाजोखा मांडला.विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून यशामागील परिश्रम, नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख पाहुणे श्री. मुकेश मुळे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व समजावून सांगितले. भविष्यातील तंत्रज्ञानाच्या गरजा लक्षात घेऊन

लवकरच संस्थेमार्फत विद्यार्थ्यांसाठी कोडींग शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची आनंददायी घोषणा त्यांनी केली. अध्यक्षीय सम रोपात श्री. रामचंद्र दरे साहेब यांनी विद्यालयाने शिष्यवृत्ती परीक्षेतील उज्वल निकालाची परंपरा कायम राखल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या यशामागील शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन,

विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य यांचे कौतुक करत सर्वांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाला विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री. पवार बी. एम., पर्यवेक्षक श्री. म्हस्के डी. सी., श्री. शरद सोनवणे, सौ. मरकड व्ही. के., सौ. वैशाली दारकुंडे तसेच शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रवींद्र देवढे यांनी प्रभावीपणे केले, तर उपप्राचार्य श्री. वांढेकर सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना श्री नारळे जे. एन.,श्री कुटे एच.डी.,सौ मरकड व्ही. के , श्रीम ठुबे एम. यू, श्रीम. काळदाते जे. एस. श्रीम. चव्हाणके ए. सौ. धामणे जे. एस., श्री पाटील पी. ए., सौ दरे एस. बी., सौ. हराळ एम.पी., श्रीम म्हस्के पी. बी.,सौ साठे एस. पी., सौ निवडुंगे जे. एस., श्री अमृते पी. एम. श्री गावडे आर. आर.यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करणारा हा प्रेरणादायी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## कलम १९ अधिसूचनेचा मसुदा

उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. १
पाचवा मजला जिल्हाधिकारी कार्यालय, छ.संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ४१४००३
जा.क्र./कार्या/भूसंक्र. ३ १/ २०२६ अहिल्यानगर दिनांक २५/०६/२०२६

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

**संदर्भ–** १) मा. जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचेकडील आदेश क. भूस/कार्या/१६–अ/०६/२०२४ अहिल्यानगर दि. २३/०९/२०२४
२) मौजे– कर्जत , ता. कर्जत, जि– अहिल्यानगर येथील एस आर क्र. १३/१९९८

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अहिल्यानगर जिल्हयाच्या अधिकाऱ्याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) त्यांच्या कलम ११च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना गुरुवार ते बुधवार, जुलै ३–९, २०२५ अन्वये कलम ११ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे, आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि त्याअर्थी, अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्यांची खात्री पटली आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) तरतुदीन्वये, उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशील वार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (७) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका–यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१) पाचवा मजला जिल्हाधिकारी कार्यालय छ.संभाजीनगर रोड, अहिल्यानगर यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची – एक** **जमीनीचे वर्णन**

गाव कर्जत तालुका कर्जत जिल्हा अहिल्यानगर

| अ. क्र. | गट नंबर | आवश्यक जमिनीचे अदमासे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | १५९१/१ | १.४१ |
| २ | १५९९/२ | |
| ३ | १३६ | ०.९६ |
| ४ | १४८/१ | ०.५४ |
| ५ | १४८/२ | |
| ६ | १४८/३ | |
| ७ | १४८/४ | |
| ८ | १५३/२–अ | ०.७० |
| एकुण | | ३.६१ |

**अनुसुची – दोन** **सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :–** कर्जत, ता. कर्जत जि. अहिल्यानगर येथील कुकडी डावा कालव्याच्या कर्जत शाखा कालवा कि.मी. ६, ७ व ८ च्या कामासाठी भूसंपादन

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :–** भूसंपादन प्रस्ताव कर्जत, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर येथील एस. आर. क्र. १३/१९९८ कुकडी डावा कालव्याच्या कर्जत शाखा कालवा कि.मी. ६, ७ व ८ च्या कामासाठी भूसंपादन

**संपादन यंत्रणेचा तपशील :–** कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम विभाग कोळवडी **समाजाला मिळणारे लाभ :–** सिंचन सुविधा

**अनुसुची – ३** **पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

गाव कर्जत तालुका कर्जत जिल्हा अहिल्यानगर

| अ.क्र. | भूमापन क्र. किंवा गट नंबर | क्षेत्र हेक्टर मध्ये |
|---|---|---|
| निरंक | | |

**अनुसूची – ४ (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश) लागू नाही–**

टीप उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १) पाचवा मजला जिल्हाधिकारी कार्यालय, छ. संभाजीनगर रोड, अहिल्यानगर पिन ४१४००३ यांचे कार्यालयात निरिक्षण करता येऊ शकेल.

दिनांक – / /२०२६
ठिकाण – अहिल्यानगर

**अतुल चोरमारे**
**उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. १**
**अहिल्यानगर**

**जिमाका / नगर / जाहि /६५/२०२६**

# वीस वर्षांपासून लाखो वृद्धांना दृष्टीदान

## माय माऊली केअर सेंटरच्या सेवाकार्याचे डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून कौतुक!

पुणे (समर्थ गांवकरी)

समाजातील गरजू, निराधार व ज्येष्ठ नागरिकांना मोफत नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याचे गेल्या वीस वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेले कार्य म्हणजे पुणे शहरातील माय माऊली केअर सेंटर होय. सेवाभावी वृत्ती, आधुनिक उपचार पद्धती आणि रुग्णांप्रती असलेली आत्मीयता यामुळे या संस्थेने लाखो वृद्धांना पुन्हा दृष्टी मिळवून देण्याचा मान मिळवला आहे. या उल्लेखनीय सेवाकार्याची ग्रेनीज बुक ऑफ रेकॉर्ड्र्समध्ये नोंद होणे ही संस्थेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

या सेवाकार्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी माय माऊली केअर सेंटरला सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेच्या विविध विभागांची पाहणी करून तेथील रुग्णांशी संवाद साधण्यात आला. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या मोफत उपचारांची तसेच संस्थेच्या










व्यवस्थापनाची माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव वरुडे पाटील यांनी मान्यवरांना दिली.

यावेळी बोलताना डॉ. वरुडे पाटील यांनी सांगितले की, गेल्या दोन दशकांपासून आर्थिकदृष्ट्या दुर्बल, निराधार आणि ग्रामीण भागातील वृद्धांना मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. या सेवेमुळे लाखो ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात पुन्हा प्रकाश आला असून, आजही हे कार्य अधिक व्यापक स्वरूपात सुरू आहे. दर आठवड्याला सुमारे २०० ते ३०० वृद्धांची मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया करण्यात येते. कोणताही आर्थिक मोबदला न घेता केवळ समाजसेवेच्या भावनेतून हा उपक्रम राबविला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थेच्या या सेवाभावी कार्याचे कौतुक करताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, समाजात आरोग्यसेवा ही प्रत्येकापर्यंत पोहोचली पाहिजे. माय माऊली केअर सेंटरने गेल्या वीस वर्षांत उभारलेले कार्य हे अनेक सेवाभावी संस्थांसाठी प्रेरणादायी आहे. हजारो नव्हे तर लाखो वृद्धांना दृष्टीदान करून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणारे हे कार्य खऱ्या अर्थाने मानवसेवेचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी गौरवोद्गार काढले.

या प्रसंगी माय माऊली केअर सेंटरचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव वरुडे पाटील यांच्या हस्ते डॉ. विश्वासराव आरोटे यांचा शाल, मोत्याची माळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच मान्यवरांनी संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत सामाजिक आरोग्यसेवेतील योगदानाबद्दल संस्थेचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमास आळंदी नगरपरिषदेचे नगरसेवक मनोहर दिवाणे, नगरसेवक संतोष रायकर, सामाजिक कार्यकर्ते कांतीराम बोराडे, संजय फुलसुंदर, राजेंद्र पांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी माय माऊली केअर सेंटरच्या सेवाभावी कार्याला अधिकाधिक बळ मिळावे, तसेच समाजातील गरजू नागरिकांना अशाच प्रकारे मोफत आरोग्यसेवा मिळत राहावी,

# सामाजिक प्रश्नांवर संघर्ष अधिक तीव्र करणार

## संघर्ष क्रांती सेवा संघाची राज्यभर विस्ताराची घोषणा

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

संघर्ष क्रांती सेवा संघाची आढावा बैठक नुकतीच श्रीगोंदा शहरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी बी. टी. गिरमकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाऊसाहेब काळे यांनी केले.

यावेळी संघर्ष क्रांती सेवा संघाचे अध्यक्ष प्रशांत दरेकर यांनी संघटनेच्या गेल्या पाच वर्षांच्या कार्याचा आढावा घेत भविष्यातील वाटचाल स्पष्ट केली. ते म्हणाले, सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या उद्देशाने पाच वर्षांपूर्वी संघर्ष क्रांती सेवा संघाची स्थापना करण्यात आली. या कालावधीत कुकडी व घोड प्रकल्पाच्या पाण्याचे प्रश्न, वीजपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, विद्यार्थ्यांच्या नॉन–क्रिमिनल प्रमाणपत्रांचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या फेरफार व रेकॉर्ड रूममधील प्रलंबित कामांसह विविध विषयांवर आंदोलने करून प्रशासनाचे लक्ष वेधले. तसेच सामाजिक बांधिलकी जपत अनेक गरजू नागरिक व विद्यार्थ्यांना मदतीचा हातही दिला.



युवकांच्या बेरोजगारीच्या प्रश्नावरही संघटना शासनाचे लक्ष वेधणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी संघटनेने यापूर्वी आंदोलने केली असून, आगामी काळातही जनहिताच्या प्रश्नांवर संघर्ष सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

येत्या काळात संघटनेची व्यापक सभासद नोंदणी मोहीम राबविण्यात येणार असून, क्रियाशील कार्यकर्त्यांची फळी उभारली जाणार आहे. पुढील बैठकीत संघटनेची विस्तृत कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असून, संघटनेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रभर असल्याने विविध जिल्ह्यांमध्ये पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही केल्या जाणार आहेत. समाजाभिमुख कार्याला प्राधान्य देत सुमारे दहा हजार युवकांची सक्षम संघटना उभारण्याचा संकल्प असल्याचेही प्रशांत दरेकर यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, जुन्नर आंबेगाव, उपविभागीय मंचर (पुणे) यांचे कार्यालय..**

क्र. फौज जन्म–मृत्यू/एसआ/२९०/२६ दिनांक: १४/०७/२०२६

प्रति, मा.संपादक

**विषय–** जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम कायदा (सुधारणा) २०२३ कलम १३ (२) (३) अन्वये किरकोळ अर्ज नं २९०/२६मधील जाहिर नोटीस प्रसिध्द करणे बाबत.

अर्जदार नामे **श्री महमंदशफी इस्माईल मियाँ शेख, रा. जुन्नर** ता जुन्नर जि पुणे (अपिलार्थी) यांनी दि.२०.५.२०२६ रोजी जन्म–मृत्यू अधिनियम कायदा कलम १३(३) अन्वये अर्जदार यांनी जन्म नोंदणी करणेकामी आदेश मिळणेबाबत किरकोळ अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

सोबत उपरोक्त फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२९०/२६मधील जाहिर नोटीस प्रसिध्द करणे करीता आपल्या दैनिकांकडे पाठवित आहोत. तरी सदरहू जाहीर नोटीस प्रसिध्द करावी व सदरहू प्रसिध्द झालेल्या जाहीर नोटीसच्या दोन मुद्रीत प्रती आमच्या न्यायालयात पाठविण्याची व्यवस्था करावी.

जाहीर नोटीसचे शुल्क अर्जदार हे रोखीने भरण्यास तयार आहेत.

**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर – आंबेगाव उपविभागीय मंचर (पुणे)**

**प्रत– श्री महमंदशफी इस्माईल मियाँ शेख रा.जुन्नर ता जुन्नर जि पुणे यांना माहितीसाठी.**

आपले अर्जाच्या अनुषंगाने जन्म–मृत्यू नोंदीसाठी जाहीर नोटीस देणेकामी उक्त पत्रान्वये संपादक यांना कळविले आहे. त्या प्रमाणे आपण सदर कार्यालयाशी संपर्क करुन त्याकामी आवश्यक ती होणारी फी जमा करुन जाहीर नोटीस १५ दिवसात प्रसिध्द करणेची कार्यवाही करावी. तसेच जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यानंतर तसे तात्काळ या कार्यालयास ३० दिवसात लेखी स्वरुपात कळविणेत यावे. प्रस्तुत प्रकरण हे अर्धन्यायिक स्वरुपाचे असल्याने प्रकरणी मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी आपणाकडून जाहीर नोटीस प्रसिध्द न केलेस प्रकरणी आपणास स्वारस्य नाही असे समजून प्रकरण निकाली काढणेत येईल याची नोंद घ्यावी.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## जुन्नर एसटी स्टँड येथे नागरिकांनी एक झाड लावून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करू



शिवनेरी (समर्थ गांवकरी)

किल्ले शिवनेरी च्या पायथ्याशी वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।। संत तुकाराम महाराज या अभंगाप्रमाणे जुन्नर एसटी स्टँड येथे नागरिकांनी एक झाड लावून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करूया असे सहाय्यक वाहतूक अधीक्षक उत्तम लांडे यांनी वृक्षारोपण करताना सांगितले .

एसटी च्या ७८ व्या वर्धापन दिनाच्या औचित्य साधून एसटी महामंडळामार्फत वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आला असे वाहतूक नियंत्रक अमित खेडकर यांनी सांगितले.

पंचायत समिती सभापती शेळकंदे , नगरसेवक आणि रोकडे समाजसेवक विश्वास ढोबळे यांनी वृक्षारोपण व स्वच्छता सुशोभीकरण याबाबत सहकार्य करणार असे याप्रसंगी सांगितले .

वाहतूक नियंत्रक साबळे , वाहतूक नियंत्रक गाढवे , नागरिक व पोलीस पाटील उपस्थित होते.

## अमृतवाहीनीज निडो इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची हिमालयातील पातालसू शिखरावर यशस्वी चढाई

शिवनेरी (समर्थ गांवकरी)



अमृतवाहीनीज निडो इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी राजवीर सौरभ कासार आणि त्याचा लहान भाऊ राजदीप सौरभ कासार यांनी हिमालयातील १३,८९५ फूट उंचीचे पातालसू शिखर यशस्वीपणे सर केले. अवघ्या ८ वर्षांच्या राजवीरने आणि ४ वर्षांच्या राजदीपने कमी वयात हा आव्हानात्मक ट्रेक पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधले, अशी माहिती अमृतवाहीनीज निडो इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या अंजली कन्नावार मॅडम यांनी दिली.

या मोहिमेद्वारे दोन्ही भावांनी साहसासाठी वय नव्हे, तर जिद्द आणि उत्साह महत्त्वाचा असतो हे सिद्ध केले असे कुटुंबीयांनी सांगितले. अशा साहसी उपक्रमांमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, सहनशीलता आणि निसर्गप्रेम विकसित होते. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्य, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त सौ.शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री .अनिल शिंदे, डायरेक्टर ऑफ अकॅडमिक्स डॉ. जे .बी . गुरव, निडो स्कूलच्या प्राचार्या अंजली कन्नावार, सर्व शिक्षक यांनी दोघा भावांडांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षक आणि पालकांकडून राजवीर व राजदीप यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटनेची त्रैमासिक बैठक अहिल्यानगरमध्ये संपन्न



अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटनेची त्रैमासिक बैठक अहिल्यानगर येथील लक्ष्मी नारायण मंगल कार्यालयात नुकतीच पार पडली

सभेच्या अध्यक्षस्थानी भाऊसाहेब पठाण होते. प्रमुख पाहुणे म्हणून बाबाराव कदम,राज्य संघटनेचे अध्यक्ष मुकुंदराव तुरे, संदीप चौधरी, जिल्हाध्यक्ष निलेश गाडेकर, कार्याध्यक्ष अशोक काळापहाड,राज्य उपाध्यक्ष सागर आगरकर,कार्याध्यक्ष ऋषिकेश बनकर, अनिल येनगुल अंजली अमृत, संदीप विधाते, अनघा कुलकर्णी, अनिता साठे,विजय वाबळे, शाम शेळके, हैबत भांगरे, इंद्रभान गावडे, सुरेश माळवदे, किरण खेडकर, प्रकाश धोत्रे, राहुल साळवे, भरत शेंडगे, संजय दिवाण, शितल साठे,निर्मला गोरे, अश्विनी आगरकर, दादा बरबडे,ओंकार पानमळकर, संजय गायकवाड,पंकज बारवकर,योगेश नजन, ताराबाई साळुंके,सुरेश भोजणे आदी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला मागील सभेचे इतिवृत्त वाचन करून मंजुरी देण्यात आली. प्रास्ताविकात कार्याध्यक्ष अशोक काळापहाड यांनी संघटनेच्या कामकाजाचा आढावा आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणींचा आढावा घेतला.

अध्यक्षीय भाषणात भाऊसाहेब पठाण यांनी शासन स्तरावरील मागण्या मांडल्या. जिल्हा परिषदेतील सर्व विभागातील रिक्त असलेली चतुर्थ श्रेणीची पदे तातडीने सरळ सेवेने भरावी.

# संत वामनभाऊंच्या पालखीचे जामखेडला पहिले गोल रिंगण उत्साहात संपन्न

जामखेड (समर्थ गांवकरी)

जामखेड शहरालगत असलेल्या जमादारवाडी येथील संत वामनभाऊ गड येथे गुरुवारी (ता.१६) दुपारी तीन वाजता संत वामनभाऊ महाराज यांच्या पालखीचे पहिले गोल रिंगण मोठ्या उत्साहात संपन्न झाले. वारकरी संप्रदायाचे मूळ उगमस्थान म्हणून गहिनीनाथ गडाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे या पालखी सोहळ्याला विशेष मानाचे स्थान आहे. गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी श्रीक्षेत्र गहिनीनाथगड येथून संत वामनभाऊ महाराज यांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ झाला.

गहिनीनाथ गड, निवडुंगा, वाहली, सावरगाव, केकानवस्ती, वनवेवाडी,मतकुळी असा प्रवास करत गुरुवारी जामखेड तालुक्यातील जांबवाडी येथे सकाळी दाखल झाली. जामखेड शहरात आगमन होताच, तपनेश्वर येथे श्रीनागेश्वर भजनी मंडळाने टाळ मृदंग विना घेऊन भजन करत सामोरे जाऊन, दिंडीचे स्वागत केले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिंडीचे स्वागत करत सहभागी झाले.

दरम्यान शहरात ठिकठिकाणी पालखी मार्गावर सडा रांगोळी काढून महिलांनी स्वागत केले. ठिकठिकाणी वारकऱ्यांना नागरिकांनी फळे, चहा बिस्किट, नास्ता औषधे, पाणी व्यवस्था केली होती. शहरातील श्रीविठ्ठल मंदिरात श्रीविठ्ठल भजनी मंडळाच्या वतीने दिंडीचे स्वागत करण्यात आले. तेथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर जगदाळेवस्ती येथे पंगत झाली .

जमादारवाडी येथील संत वामनभाऊ मंदिर येथे पालखीचे आगमन झाले. यावेळी जमादारवाडी ग्रामस्थ व पंचक्रोशीच्या वतीने जामखेडचे नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी व अमित चिंतामणी यांच्या हस्ते श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांचा सन्मान करण्यात आला व रिंगण सोहळा सुरू झाला. यावेळी आष्टीचे माजी आमदार भिमराव धोंडे तसेच परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मंदिराच्या भव्य प्रांगणात मध्यभागी पालखी रथ उभा करण्यात आला. पताकाधारी वारकरी, विणेकरी टाळ मृदंगाच्या तालावर पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... गहिनीनाथ महाराज की जय, संत वामनभाऊ महाराज की जय, या जयघोषात भरधाव वेगाने पालखीला प्रदक्षिणा करू लागले. यावेळी भाविकांनी एकच जय जयकार केला. वारकरी परंपरेचे खेळिया प्रकरणातील अभंग झाले. यावेळी महंत विठ्ठल महाराज यांनी स्वतः अभंग गायले या अभंगाच्या चालीवर वारकरी वेगवेगळे खेळ खेळले. अनेक पुरुष व महिला भक्तांनी फुगडीचा आनंद लुटला. यावेळी जमादारवाडी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भक्तगण मोठ्या



संख्येने उपस्थित होते. रिंगण सोहळ्या दरम्यान या ठिकाणी नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली होती.

जामखेड परिसरातून पंढरपूरला दररोज अनेक दिंड्या जातात. मात्र संत वामनभाऊ महाराज पालखी सोहळा हा सर्वात भव्य दिव्य सोहळा अनुभवास येतो. जमादारवाडी येथे होणारे रिंगण हे एकमेव आहे. त्यामुळे या परिसरातील भक्तगणांसाठी ही पर्वणीच ठरते. राज्यभरातून लाखो संख्येने वारकरी हे या सोहळ्यात सहभागी झाले आहेत. या रिंगण सोहळ्यानंतर पुढे जमादारवाडी येथे भोजन करून सारोळा येथे ही दिंडी मुक्कामी पोहोचली.

## राष्ट्रीय सरपंच संसदेच्या पदाधिकाऱ्यांची पिंपळगाव (खडकी) येथे सदिच्छा भेट; ग्रामविकास उपक्रमांचे कौतुक

मंचर/संतोष वळसे पाटील (समर्थ गांवकरी)





आंबेगाव तालुक्यातील आदर्शगाव म्हणून ओळख असलेल्या पिंपळगाव (खडकी) येथे एमआयटी, पुणेच्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट अंतर्गत कार्यरत राष्ट्रीय सरपंच संसदेचे कार्याध्यक्ष व प्रमुख समन्वयक योगेश पाटील तसेच उपाध्यक्ष व सह–समन्वयक प्रकाशराव महाले यांनी बुधवार दि.१५ रोजी सदिच्छा भेट देऊन ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांची पाहणी केली.

युवासेना कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर यांनी मान्यवरांचे स्वागत करून लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या विकासकामांची माहिती दिली. यावेळी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, अंगणवाडी, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत करण्यात आलेली कामे, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, पाणीपुरवठा योजना तसेच गावातील विविध विकासकामांची पाहणी करण्यात आली. या उपक्रमांचे कौतुक करत पिंपळगाव (खडकी) हे ग्रामीण विकासाचे प्रेरणादायी मॉडेल असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेलाही भेट देऊन विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या अभिनव शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका मंगलादेवी पवार तसेच राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षिका मृणालताई गांजाळे यांचा राष्ट्रीय सरपंच संसदेच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी डॉ. राहुल कराड यांनी स्थापन केलेल्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट, एमआयटी रुरल इमर्शन प्रोग्राम आणि राष्ट्रीय सरपंच संसदेच्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांवर चर्चा झाली. सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत पोखरकर, ग्रामस्थ, शिक्षकवृंद व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## चणकापूर आश्रमशाळा ठरली स्वच्छतेची पाठशाळा !

**विद्यार्थ्यांनी घेतली स्वच्छ भारताची शपथ डॉ. मस्के आणि स्वच्छता दूत चेतन हिरे यांच्या मार्गदर्शनाने चणकापूर आश्रमशाळेत आरोग्य जागर**



कनाशी (समर्थ गांवकरी)

कळवण तालुक्यातील चणकापूर शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी स्वच्छता व आरोग्य या विषयावर विशेष जनजागृती व्याख्यान उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमात प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ. दीपक मस्के आणि स्वच्छता दूत चेतन हिरे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

**स्वच्छता हीच आरोग्याची गुरुकिल्ली**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक बी. एन. देवरे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, चणकापूर आश्रमशाळा ही केवळ शिस्तप्रिय शाळा नसून स्वच्छ, सुंदर आणि आदर्श शाळा म्हणून ओळख निर्माण करत आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेचे संस्कार रुजविणे ही आजच्या काळाची गरज आहे.

पाणी बचतीवर आधारित प्रेरणादायी कवितेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्प दिनानिमित्त जनजागृती आणि शपथ कार्यक्रमादरम्यान १६ जुलै जागतिक सर्प दिनानिमित्त सापांविषयी असले गैरसमज दूर करून सापांचे पर्यावरणातील महत्त्व पटवून देण्यात आले. साप दिसल्यास घाबरून न जाता वन विभागाची मदत घेण्याचे आवाहन करण्यात आले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी वैयक्तिक

मार्गदर्शन करताना डॉ. दीपक मस्के म्हणाले, स्वच्छता हा केवळ अभ्यासाचा विषय नसून ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील संस्कार आहे. ज्या विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या चांगल्या सवयी असतात, ते नेहमी निरोगी आणि आनंदी राहतात. पावसाळ्यातील डेंग्यू, मलेरिया, अतिसार यांसारख्या आजारांपासून बचावासाठी स्वच्छ पाणी पिणे, परिसर स्वच्छ ठेवणे, हात धुणे आणि पौष्टिक आहार घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

**खेळीमेळीतून स्वच्छतेचा संदेश**

स्वच्छता दूत चेतन हिरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद, कविता आणि प्रश्नोत्तरांद्वारे वैयक्तिक स्वच्छता, प्लास्टिकमुक्त परिसर, कचरा व्यवस्थापन आणि पाणी बचतीचे महत्त्व पटवून दिले. स्वच्छ शाळा, स्वच्छ गाव आणि स्वच्छ भारत हा संदेश त्यांनी कृतीतून उतरवण्याचे आवाहन केले.

स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि पाणी बचत यासाठी सामूहिक शपथ घेतली. या यशस्वी आयोजनासाठी उपशिक्षक प्रशांत खालकर, प्रभात पालवी, मनोहर सोनवणे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## वडगाव आनंद ग्रामपंचायत च्या माध्यमातून महिलांसाठी ‘आरी वर्क (भरतकाम)’ प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

आळेफाटा (समर्थ गांवकरी)

महिलांच्या कौशल्य विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत ग्रामपंचायत वडगाव आनंद च्या वतीने युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था’ यांच्या माध्यमातून वडगाव आनंद, पादिरवाडी, आळेफाटा येथील ग्रामस्थ महिलांसाठी आरी वर्क (भरतकाम) प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम भारत सरकार व महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त उपक्रम असून नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या मार्गदर्शनाने राबविण्यात येत आहे.

या प्रशिक्षण उपक्रमाचा उद्देश महिलांना स्वावलंबी बनविणे व त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. या प्रशिक्षणात महिलांना आधुनिक भरतकाम तंत्रज्ञान, डिझाईन तयार करणे, तसेच घरबसल्या व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन दिले जाणार आहे.

इच्छुक महिलांची नावे ग्रामपंचायत कार्यालयात नोंदवून घेण्यात आली असून या प्रशिक्षणात १०० पेक्षा अधिक महिलांनी सहभाग घेतल्याचे दिसत आहे. प्रशिक्षणाची



सुरुवात दि. २९ जून २०२६ रोजी झाली. हे प्रशिक्षण श्रीमती रेऊबाई बाळाजी देवकर, विद्यालय दुसरा मजला, या ठिकाणी चालू आहे, या उपक्रमाचे आयोजन सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, सदस्य, ग्रामपंचायत वडगाव आनंद यांच्या वतीने करण्यात येत असून परिसरातील महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय : खोटा दावा करून स्थगिती मिळवणाऱ्या याचिकाकर्त्यांची रिट याचिका निकाली

## जामखेडच्या १० याचिकाकर्त्यांवर प्रत्येकी ₹५० हजारांचा दंड

जामखेड (समर्थ गांवकरी)

चार वर्षे झाली जामखेड शहरातील रोड चे काम रखडले होते.. याचीका करणाराना चपराक. रस्ता रुंदीकरणाचे काम मार्गी लागेल.. नागरिकांनी हायकोर्ट निकालाचे स्वागत केले आहे. आनंद व्यक्त केला आहे. जामखेड शहरातील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईस स्थगिती मिळविण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायालयाने याचिकाकर्त्यांनी न्यायालयासमोर चुकीची व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याचे निदर्शनास आल्याने रिट याचिका निकाली काढत संबंधित १० याचिकाकर्त्यांवर प्रत्येकी ₹५० हजारांचा खर्च (Cost) लावला आहे.

जामखेड नगरपरिषदेतर्फे अतिक्रमण हटविण्यासाठी बजावण्यात आलेल्या नोटिशींविरोधात १८ जणांनी ही रिट याचिका दाखल केली होती. यापूर्वी ४ मार्च २०२६ रोजी न्यायालयाने याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकून अंतरिम स्थगिती दिली होती. सुनावणीदरम्यान जामखेड नगरपरिषदेच्या वतीने ड. सुहास राजेंद्र शिरसाट यांनी प्रभावी युक्तिवाद करत न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, याचिकेत सर्व १८ जण यापूर्वीच्या न्यायालयीन प्रक्रियेत सहभागी असल्याचा दावा करण्यात आला होता.

मात्र प्रत्यक्षात त्यापैकी केवळ ८ जणच पूर्वीच्या याचिकांमध्ये सहभागी होते, तर उर्वरित १० जण प्रथमच न्यायालयात आले होते. त्यामुळे याचिकेतील हा दावा वस्तुस्थितीविरुद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नगरपरिषदेचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने संबंधित याचिकाकर्त्यांनी चुकीची माहिती देऊन अंतरिम स्थगिती मिळवल्याचे नमूद केले. त्यानुसार आशाबाई संतोष बाफना, अशोक जगन्नाथ बोरा, सदाशिव महादेव उतेकर, लेखीचंद चंदमल बाफना, नारंगीबाई सुरजमल सुराणा, रमेश हरकचंद गुगळे, किसन रामभाऊ पेचे, सुनील बाबासाहेब उगले, अशोक चंपालाल बाफना आणि मंजूरअली अमीर सय्यद या १० याचिकाकर्त्यांवर प्रत्येकी ₹५० हजारांचा खर्च (Cost) लावण्यात आला असून ही रक्कम चार आठवड्यांच्या आत ॲडव्होकेट्स असोसिएशन, उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर येथे जमा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

सदर प्रकरणाची सुनावणी मा. न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी व मा. न्यायमूर्ती आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठासमोर पार पडली. या निर्णयामुळे न्यायालयाची दिशाभूल करून कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर करणाऱ्यांना कठोर संदेश मिळाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून जामखेडच्या विकासासाठी, राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी आम्ही सातत्याने लढा दिला. या लढ्यात जामखेडकर नागरिक ठामपणे आमच्या पाठीशी उभे राहिले, तर पत्रकार बांधवांनीही या जनहिताच्या प्रश्नाला सातत्याने वाचा फोडून सत्य जनतेसमोर मांडले. विधान परिषदेचे सभापती मा. राम शिंदे यांनीही वेळोवेळी पाठपुरावा करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत मोलाचे सहकार्य केले. उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे हे स्पष्ट झाले आहे की, खोट्या माहितीच्या आधारे विकासकामांना अडथळा निर्माण करणे योग्य नाही. आता कोणताही कायदेशीर अडथळा नसल्याने प्रशासनाने तातडीने राष्ट्रीय पमहामार्गावरील अतिक्रमण हटवून रखडलेले रस्त्याचे काम सुरू करावे, हीच जामखेडकरांची अपेक्षा आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### वसुंधरा अकॅडेमीचा यशराज कदम या विद्यार्थ्याने आषाढी एकादशी निमित्त अकोले ते पंढरपूर सायकलवारी यशस्वीरित्या पूर्ण केली




**अकोले (समर्थ गांवकरी)**

अभिनव शिक्षण संस्था संचालित वसुंधरा अकॅडेमी, अकोले येथील इयत्ता दहावीचा विद्यार्थी कु. यशराज विनायक कदम याने आषाढी एकादशी निमित्त अकोले ते पंढरपूर हा सुमारे २२० किलोमीटरचा पवित्र वारीचा प्रवास अवघ्या दोन दिवसांत सायकलवर पूर्ण करून उल्लेखनीय काम गिरी केली. जिद्द, चिकाटी, शिस्त, सहनशक्ती आणि विठ्ठल भक्तीच्या बळावर त्याने ही कठीण मोहीम यशस्वीपणे पूर्ण केली. त्याच्या या कठीण मोहिमेबद्दल शाळेच्या सकाळच्या असेंब्लीमध्ये त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. यशराजने प्रतिकूल हवामान, दीर्घ अंतर आणि शारीरिक थकवा यांवर मात करत ध्येय गाठले. त्याची ही कामगिरी केवळ साहसी प्रवास नसून कठोर परिश्रम, आत्मविश्वास, सातत्य आणि दृढनिश्चय यांचा उत्कृष्ट संगम असल्याचे प्रतिपादन शाळेच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी केले. सत्कार प्रसंगी त्यांनी यशराजच्या जिद्द, चिकाटी, शिस्त, सहनशक्ती आणि विठ्ठल भक्तीचे विशेष कौतुक करत, यशराजची कामगिरी प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी आहे. यावेळी अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर नवले, सचिव विक्रम नवले, सहसचिव अल्फोन्सा डी., उपप्राचार्या राधिका नवले, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी यशराजचे कौतुक केले.

### ज्येष्ठ सहकार नेते प्रेमकाका भोयटे यांचे दुःखद निधन

#### अहिल्यानगर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील संयमी नेतृत्व हरपले

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंदा तालुक्यातील भिमानदी काठावरील सांगवी दुमाला येथील रहिवासी, ज्येष्ठ सहकार नेते व शांत, संयमी व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित असलेले कै. प्रेमकाका दगडू भोयटे यांचे बुधवार (दि. १५ जुलै) रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ८५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

प्रेमकाका भोयटे यांनी सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. त्यांनी अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक, तसेच सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक म्हणून जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या. निधनापर्यंत ते सांगवी दुमाला विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते.

शेतकरी हिताला नेहमीच प्राधान्य देत त्यांनी कर्जमाफी, वेळेवर कर्जपुरवठा आणि गरजू शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. गोरगरीबांचा कैवारी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या शांत, संयमी व सर्वसमावेशक स्वभावामुळे त्यांना समाजात विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले होते. त्यांच्यावर सायंकाळी ५ वाजता सांगवी दुमाला येथे घोड व भिमा नदीच्या संगमावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील विविध राजकीय, सहकार आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. प्रेमकाका भोयटे यांच्या निधनाने सहकार क्षेत्रातील एक अनुभवी, अभ्यासू आणि सेवाभावी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना व्यक्त होत असून, त्यांच्या जाण्याने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

### मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत श्री जे.आर.गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूलचे दैदिप्यमान यश




**आळेफाटा (समर्थ गांवकरी)**

श्री जे. आर. गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, आळेफाटा येथील विद्यार्थ्यांनी मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आणि उत्कृष्ट शैक्षणिक परंपरेची पुन्हा एकदा साक्ष दिली.

या परीक्षेसाठी शाळेतील ८५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी स्वराज डोंगरे, मनवा शेळके, स्वराज पाटील, सक्षम डोंगरे, सिद्धी गोडे आणि संजित सूर्यवंशी यांनी विशेष प्राविण्य मिळवून शाळेच्या यशात मोलाची भर घातली. तसेच ३० विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरावर, ४९ विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर आणि ६ विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर यश संपादन करून शाळेचा गौरव वाढविला.

# जुलै फॉर काइंडनेस मधून तालुक्यात विविध उपक्रमांनी आदरभाव वाढला

- यशोधन काइंडनेस ट्री उपक्रमांनी भरली
- डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून सर्वांनी दयाळूपणा अधिक जोपासला

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**



समाजामध्ये वाढलेली नकारात्मकता दूर होऊन एकमेकांप्रती आदरभाव जिव्हाळा आत्मीयता निर्माण व्हावी यासाठी कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून संगमनेर तालुक्यात सुरू झालेल्या मंथ ऑफ काइंडनेस अंतर्गत तालुक्यात व शहरात विविध उपक्रमांमधून आत्मीयता जिव्हाळा जोपासला जात असून यशोधन मध्ये निर्माण केलेल्या काइंडनेस ट्री विद्यार्थ्यांनी केलेल्या उपक्रमांनी बहर आला आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन जनसंपर्क कार्यालयात जुलै फॉर काइंडनेस या उपक्रमांतर्गत काइंडनेस ट्रि बनवण्यात आली असून यावर विद्यार्थी व विविध युवकांनी दिवसभरात राबवलेल्या दयाळूपणाच्या उपक्रमांची पान चिटकवण्यात आली आहे. यामध्ये चिमणी व पाखरांना त्यांचा खाऊ देणे. वृद्ध माणसांना मदत करणे. आई – वडिलांना घर कामात मदत करणे. प्रत्येकाशी आत्मियतेने बोलणे. शक्य होईल तितके एकमेकांना मदत करणे. आजी आजोबांशी गप्पा मारणे. पक्षी प्राणी यांच्या प्रती कृतज्ञता व दयाळूपणा दाखवत जिव्हाळा जपणे असे अनेक उपक्रम प्रत्येक गावात राबवले गेले आहे यामध्ये विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग असून या सुखद अनुभवाने पालकांमध्ये वेगळी अनुभूती निर्माण झाली आहे.

यशोधन मधील काइंडनेस ट्री वर याबाबतचे उपक्रम चिटकवण्यात आले आहे. यामध्ये पर्यावरणवादी नेते सोनम वांगचुक यांना पाठिंबासह अनेक सेवाभावी उपक्रम पाहायला मिळत आहे.

याबाबत डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, सकाळी टीव्ही चालू केला की ब्रेकिंग न्यूज च्या नावाखाली निगेटिव्ह बातम्यांचा मारा होतो. सोशल मीडिया उघडला की निगेटिव्ह बातम्या पाहायला मिळतात. एकमेकांप्रती द्वेष भावना पसरवली जाते. अमेरिका इराण युद्ध सह सध्या सर्वत्र नकारात्मकता पसरवली जात असून यामधून समाजामध्ये जिव्हाळा व अस्मिता वाढवण्यासाठी संगमनेर तालुक्यामध्ये मंथ ऑफ काइंडनेस हा उपक्रम राबवण्यात आला आहे. या अंतर्गत समाजामध्ये एकमेकांप्रती आदरभाव वाढावा. त्याचप्रमाणे पर्यावरण संवर्धन व्हावे,शाळा, महाविद्यालय व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता निर्माण व्हावी. छोट्या छोट्या गोष्टींमधून मोठा आनंद निर्माण करावा. हा या संकल्पनेचा उद्देश असून संगमनेर तालुक्यात व शहरात युवक नागरिक व विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात जुलै फॉर काइंडनेस मध्ये सहभाग घेतला आहे. महाराष्ट्राचे माजी महसूल व कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्याने कायम राज्याला विकासासह सहकार व विविध क्षेत्रांमध्ये दिशादर्शक काम केले आहे. एकात्मता मानवता आणि समभाव वाढवणारा संदेश दिला आहे त्याचप्रमाणे डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या मंथ ऑफ काइंडेनेस ही संकल्पना अभिनव व दिशादर्शक ठरणारी झाली आहे.

## महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक उत्साहात संपन्न

### NEP-२०२० अंतर्गत लोकशाही मूल्यांचा अनुभव; विद्यार्थ्यांनी गुप्त मतदानातून निवडले प्रतिनिधी

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**



रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूल, श्रीगोंदा येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) अंतर्गत प्रगत शिक्षण पद्धतीचा अवलंब करत विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाची निवडणूक लोकशाही पद्धतीने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये, नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना आणि मतदानाचे महत्त्व रुजविण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

निवडणूक प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. उमेदवारांनी आपल्या भूमिका, उद्दिष्टे आणि विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देत प्रचार केला. त्यानंतर नियोजित वेळेनुसार मतदान प्रक्रियेस प्रारंभ झाला. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध रांगेत उभे राहून गुप्त मतदानाद्वारे आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मतदानाचा हक्क बजावला.

संपूर्ण मतदान प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. शिक्षकांनी निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडत संपूर्ण प्रक्रियेचे नियोजन व देखरेख केली. मतदानानंतर मतमोजणी करण्यात आली आणि विजयी उमेदवारांची घोषणा करण्यात आली.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शेख एस. ए. यांनी विजयी विद्यार्थी प्रतिनिधींचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचे तसेच लोकशाही मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन केले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे नेतृत्व क्षमता, निर्णयक्षमता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विकसित होत असल्याचे सांगितले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लोकशाही प्रक्रियेचा अनुभव मिळाला. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) मध्ये अपेक्षित असलेल्या अनुभवाधारित, सहभागात्मक आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी झाल्याचे समाधान शाळा प्रशासनाने व्यक्त केले.

## पुणे-नाशिक महामार्गाच्या कामांची प्रकल्प संचालक सचिन गौतम यांच्याकडून पाहणी; स्थानिकांच्या मागण्यांची दखल

**मंचर/संतोष वळसे पाटील (समर्थ गांवकरी)**



**पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील विविध प्रलंबित कामे, सेवा रस्ता, अंडरपास, विस्थापन व जमिनींच्या दरातील तफावत याबाबत प्रकल्प संचालक सचिन गौतम यांच्यासमोर ग्रामस्थांनी भूमिका मांडली.दिलीपराव मेदगे,समन्वय पुणे-नाशिक महामार्ग.**

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाचे प्रकल्प संचालक म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर सचिन गौतम यांनी आंबेगाव तालुक्यातील तांबडेमळा ते कळंब या महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित कामांचा आढावा घेतला.यावेळी पुणे-नाशिक महामार्गाचे समन्वय दिलीपराव मेदगे, प्रकल्प व्यवस्थापक अंकित यादव व तांत्रिक सल्लागार दिलीप शिंदे उपस्थित होते.

पेठ गावात अंडरपास, सेवा रस्ता, धोकादायक विहीर आणि वाढत्या अपघातांबाबत नागरिकांनी मागण्या मांडल्या. पंचायत समितीचे सदस्य संजय पवळे, माजी सरपंच संतोष धुमाळ, राजेंद्र धुमाळ, पांडुरंग एरंडे, राजू जेवढे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.नंदी चौक ते तांबडेमळा सेवा रस्त्याचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे तसेच प्रस्तावित वळणामुळे नागरिकांचे विस्थापन टाळण्यासाठी तांत्रिक बदल करावेत,अशी मागणी प्रकल्प समन्वयक दिलीपराव मेदगे, सुदेश भोर व किरण भोर यांनी केली.पूर्व व पश्चिम बाजूच्या जमिनींच्या दरातील तफावत दूर करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. यावेळी सर्विस रोडचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरू असून याला गती द्यावी किंवा सदर एजन्सी चे काम काढून घेऊन दुसऱ्या ठेकेदाराला द्यावे,अशी मागणी ग्रामस्थांनी केली.पाहणीनंतर ग्रामस्थांच्या हस्ते सचिन गौतम यांचा सत्कार करण्यात आला.

## मोतीबिंदूमुक्त दृष्टीसाठी नीलेश लंके प्रतिष्ठानचा पुढाकार

**प्रतिनिधी-विनोद गायकवाड (समर्थ गांवकरी)**

- ३२ जेष्ठ नागरिक व माता-भगिनी पुण्याकडे रवाना
- गरजू नागरिकांना मोफत शस्त्रक्रिया, प्रवास व उपचाराची संपूर्ण जबाबदारी



समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि जेष्ठ नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली नीलेश लंके प्रतिष्ठानने लौकिकाप्रमाणे समाजोपयोगी उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत गुरुवारी ३२ जेष्ठ नागरिक तसेच माता-भगिनींना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पुणे येथे रवाना करण्यात आले. आर्थिक अडचणींमुळे उपचार घेऊ न शकणाऱ्या नागरिकांसाठी हा उपक्रम मोठा दिलासा ठरत असून, लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा स्पष्ट दृष्टी मिळण्याची आशा दिसून येत होती.

मोतीबिंदूमुळे अनेक जेष्ठ नागरिकांची दृष्टी कमी होत असल्याने त्यांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होतो. मात्र शस्त्रक्रियेचा खर्च परवडत नसल्यामुळे अनेकजण उपचारांपासून वंचित राहतात. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन निलेश लंके प्रतिष्ठानने गरजू लाभार्थ्यांची निवड करून त्यांना पुण्यातील तज्ज्ञ नेत्ररोगतज्ज्ञांकडून मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व लाभार्थ्यांच्या प्रवासाची व्यवस्था, शस्त्रक्रियेचा खर्च, आवश्यक तपासण्या, औषधोपचार तसेच इतर वैद्यकीय सुविधांची संपूर्ण जबाबदारी प्रतिष्ठानने स्वीकारली आहे. त्यामुळे आर्थिक अडचणी उपचारांमध्ये अडथळा ठरू नयेत, याची काळजी घेण्यात आली आहे.

खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली नीलेश लंके प्रतिष्ठान आरोग्य, शिक्षण, सामाजिक विकास आणि जनकल्याणाच्या विविध क्षेत्रांत सातत्याने कार्यरत आहे. ग्रामीण भागातील गरजू कुटुंबांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे, गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मदत करणे, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम राबविणे अशा विविध माध्यमांतून प्रतिष्ठान सामाजिक बांधिलकी जपत आहे. मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा हा उपक्रमही त्याच सेवाभावी कार्याचा एक महत्त्वाचा भाग मानला जात आहे.

## आश्रमशाळेच्या आठवी वर्गाला मान्यता द्यावी; आंबे ग्रामस्थांचे सामूहिक उपोषण

**मंचर/संतोष वळसे पाटील (समर्थ गांवकरी)**



जुन्नर तालुक्यातील आंबे येथील आश्रमशाळेच्या नैसर्गिकरित्या सुरू असलेल्या आठवीच्या वर्गाला मान्यता द्यावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी गुरुवार दि.१६ रोजी घोडेगाव येथील आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प कार्यालयासमोर सामूहिक उपोषण सुरू केले. याबाबतचे निवेदन प्रकल्प अधिकाऱ्यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, जुन्नर तालुक्यातील अतिदुर्गम भागात जिल्हा परिषद किंवा खासगी शाळांची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आंबे आश्रमशाळेतील आठवीचा वर्ग सुरू ठेवणे अत्यावश्यक आहे.आदिवासी विकास विभागाने सन २००३ मध्ये ही शाळा सुरू केली होती. २००३ ते २०१३ या कालावधीत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिक्षणाची व्यवस्था होती. दहावीच्या निकालात शाळेने सलग दोन वर्षे ५८ टक्के यश मिळविल्याचाही उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.ग्रामस्थांनी शाळेसाठी तीन इमारती तब्बल २३ वर्षे विनामूल्य उपलब्ध करून दिल्या असून, यंदाही त्या विनामूल्य देण्याची तयारी दर्शविली आहे. आठवी ते दहावीचे वर्ग पुन्हा सुरू करण्यासाठी अनेक वर्षांपासून घोडेगाव व ठाणे कार्यालयांशी पत्रव्यवहार आणि अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.घोडेगाव कार्यालयातून वरिष्ठ कार्यालयाकडे चुकीची माहिती पाठविल्यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन आठवीच्या वर्गाला मान्यता द्यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

छायाचित्र मजकूर : आंबे येथील आश्रमशाळेच्या आठवीच्या वर्गाला मान्यता द्यावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी घोडेगाव येथील प्रकल्प कार्यालयासमोर सामूहिक उपोषण सुरू केले.

## जुन्नर पोलीस ठाणे हद्दीत २७० किलो गोमांस जप्त

### तीन आरोपी अटकेत

**शिवनेरी (समर्थ गांवकरी)**

जुन्नर येथील माई मोहल्ला या ठिकाणी गोवंश कत्तल करून एका खोलीमध्ये ठेवले असल्याबाबत गोपनीय माहिती जुन्नर पोलीस स्टेशनला मिळाली

सदर बाबत पडताळणी करण्यासाठी धनंजय पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे आदेशाने दत्तात्रय गुंड. पोलीस निरीक्षक,पो. स. ई. ऋषिकेश टिटमे व पथक स्थापन करून पाळत ठेवली असता एका खोलीमध्ये सुमारे २७० किलो गोमांस मिळून आलेले आहे. सदरची खोली ही इसम नामे फुरकान इब्राहिम बेपारी याची असून त्याच्यावर गोवंश बाबत यापूर्वीचे सुद्धा गुन्हे दाखल आहेत.

सदर गुन्ह्यामध्ये रेहान दस्तगीर कुरेशी , अदनान अल्ताफ बेपारी ,आतिक अहमद कुरेशी सर्व रा. माई मोहल्ला/ शिपाई मोहल्ला जुन्नर, मुजम्मिल मुतम्मिल कुरेशी , बिलाल दस्तगीर कुरेशी , समीर सोहेल कुरेशी व शरीन इब्राहिम बेपारी सर्व रा. माई मोहल्ला आरोपींना ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर आरोपीतांवर यापूर्वी सुद्धा असेच गोवंश बाबत गुन्हे दाखल असून सदरचे आरोपी अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहेत. सदरची कारवाई करत असताना जुन्नर पोलीस ठाणे गु. र.क्र. १७० / २६ यु / एस १८९ ( २ ), १८९(४), १९१ ( २ ) सह ४, २५ आर्म ऍक्ट मधील आरोपी मोहसिन इकबाल अत्तार वर्ष,यांस अटक करून न्यायालयात हजर केले आहे .

पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांनी जुन्नर पोलीस ठाणे हद्दीत गोमांस व गोवंश कत्तल याबाबत कठोर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत अशीच कारवाई यापुढे सुद्धा सुरू होणार आहे. सदरची कारवाई डॉ. शुभम कुमार,अपर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, धनंजय पाटील,उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी दत्तात्रय गुंड, पोलीस निरीक्षक जुन्नर पोलीस ठाणे , पोसई टिटमे पो. ह.सागर शिंदे, मालवणकर,पठारे ,पो. शि. कैलास केंद्रे,भागवत,शंभू निरडे. दादा पावडे,आर सी पी पथक जुन्नर उपविभाग यांचे पथकाने केलेली आहे.